# सातपुडयातील आदिवासी तडवी

## सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक चालिरिती

**अजीज रशिद तडवी**

**आदिवासी तडवी संस्कृतीचे अभ्यासक व लेखक**

१२ बंगला, स्टेट बॅक रोड, महावीर लॅब जवळ,
कीर्ती बंगल्याच्या समोर मालेगांव शहर, किराणा दुकानाशेजारी,
मालेगांव शहर, जिल्हा नाशिक ग्रामीण
–

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695



**सातपुडयातील आदिवासी तडवी**

सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक चालिरिती

© अजीज रशिद तडवी, मोबाईल-९९२३२९३९८५

❖ **Publisher :**
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126

❖ **Page design & Cover :**
Shaikh Jahurodden

❖ **Edition: June 2016**

ISBN 978-93-85882-30-2

❖ **Price : 200/ -**


आम्हा
मनी विठ्ठलु
ध्यानी विठ्ठलु
एका जनार्दनी
अवघा
विठ्ठलु

# अनुक्रमणिका

**प्रकरण १** ०६
आदिवासी तडवी भिल्लांची व्याख्या व ऐतिहासिक मागोवा
**प्रकरण २** १९
सातपुडयातील आदिवासी तडवी भिल्ल जमातीची विवाह परंपरा
**प्रकरण ३** २९
तडवी विवाहातील *वधूमुल्य* देण्याची सामाजिक परंपरा व धारणा
**प्रकरण ४** ३२
आदिवासी तडवी जमात : त्रिसंस्कृती जतन करणारी निधर्मी समाजजीवन
**प्रकरण ५** ४४
आदिवासी म्हणजे कोण. तडवी कोण.व्याख्या
**प्रकरण ६** ६४
भारतातील व सातपुडयातील गुप्त भाषा व सांकेतिक भाषेची परंपरा
**प्रकरण ७** ७२
सातपुडयातील आदिवासी व तडवी भिल्लाची व्दिभाषिक लोकसंस्कृती
**प्रकरण ८** ७८
आदिवासी तडवीची *बारकरी* समाजपंचायत
**प्रकरण ९** ८३
आदिवासी तडवी भिलांचा सामाजिक मागोवा व पार्श्वभूमी
**प्रकरण १०** ९१
आदिवासी तडवी कुळाचार व कुलप्रतिकवाद
**प्रकरण ११** १००
तडवी भिल्लांची सामाजिक म्हणी
**प्रकरण १२** ११२
तडवी भिल्लांची लोकगीते
**संदर्भसूची** १२०



प्रकरण १

# आदिवासी तडवी भिल्लांची व्याख्या व ऐतिहासिक मागोवा

**१.तडवी समाज व व्याख्याः**

सातपुडयाच्या पायथ्याशी आदिवासी भिल्लांची वस्ती दिसून येते. 'भिल्ल लोकांना भिल्ल हे नांव द्रविडियन भाषेवरुन पडलेले आहे. धनुष्याला द्रविडियन भाषेत *बील* असे म्हटले जाते.बील म्हणजे धनुष्य धारण करणारे ते *भिल्ल* अशी त्यांच्या नांवाची व्युत्पत्ती सांगण्यात येते. धुळे,जळगांव,नंदूरबार या भागात तसेच डांग,सुरत,भडोच,पंचमहाल,जिल्हे व मध्यप्रदेश व राजस्थानचे काही जिल्हे यात भिल्ल बाहुल प्रदेश हे प्रामुख्याने दिसून येतात.सातपुडयाच्या पायथ्याशी राहणा-या भिल्ल आदिवासी जमातीना तडवी, तडवी पठाण, पावरा,वसावा, वळवी,मावची,धानका,मथवाडी,गावीत,कोटले, या नांवानी ते ओळखले जातात. त्यांचे जीवन हे कष्टमय असून त्यांची एक वेगळी व स्वतंत्र आदिवासी संस्कृती दिसून येते.तडवी भिल्ल ,तडवी पठाण, भिल्ल, व मुंडा, या आदिवासी जमाती

हया लध्वय्यी व युध्दात भाग घेणारे तांडव करणारे शूर योध्दा म्हणून ते ओळखले जातात.तसेच ते भिल्लांचे वंशज म्हणून सुपरिचित आहेत. या जमातीतील तडवी भिल्ल व भिल्ल महिला देखील प्रत्यक्ष युध्दात भाग घेत असत व आपले तलवार चालविण्याचे कसब दाखवून पराक्रम दाखवित असत. इतिहासात तडवी,भिल्ल व त्यांच्या महिलाच्या शौर्याची त्रोटक नोंदी हया इतिहासकारांनी व संशोधकांनी घेतलेल्या आहेत. त्यांचे गौरवगाथाची सविस्तर माहिती ही कोठेही लिहीलेले नाही व नोंदी दिसत नाही .हे भारताचे दुदैव्य आहे.त्याचेबाबतची सविस्तर माहितीचा धांडोळा हा सामाजिक ,सांस्कृतिक उत्खननातून व त्यांचे लोकसंस्कारातून लोकगीतातून लोककथातून,म्हणी,उखाणे,किस्से या लोकसाहित्यातून व वयोवृध्द महिला पुरुषांकडून माहिती संकलित करुन त्याचप्रमाणे त्याचे विविध बोली भाषेतून त्यांचे श्रध्दा,आस्थावाईक निसर्गपूजक जिवनसरणीतून आचारणातून संकलित करुन सदरची माहिती ही घेण्यांत येते. तसेच ती देण्यांत येते.

पुरा पाषाण काळात आदिवासी भिल्लांचे अस्तित्व दिसून येते. इसापूर्व ३०० ते १७५०-१८०० च्या दरम्यान आदिवासी संस्कृती ही या भारतात व जगात अस्तित्वात होती यांचे पुरावे हे संशोधकांना व मानववंशसंशोधकांना मिळालेले आहेत.प्राचीन भारतीय धार्मिक व पौराणिक दंतकथेतूनही आदिवासी भिल्लांचे उल्लेख दिसतात. यात निषाद ,शबर,नाग,किरोत ,द्रविड, पुलिंद,अभिर या आदिम जमातीचा उल्लेख दिसून येतात. यात प्रामुख्याने रामायण-महाभारताचा उल्लेख करावा लागेल. यात आदिवासी *शबरी* व महाभारतातील द्रोणाचार्याला आपला आंगुठा कापून देणा-या *एकलव्य*चा उल्लेख दिसतो. तसेच अर्जुन याचा आदिवासी कन्या *चित्रागंदा* हिचेशी विवाह केलेचा उल्लेख आहे. तसेच भीम याचा आदिवासी पुत्र *घटोस्कोच* चा उल्लेख दिसून येतो. आदिवासीची संस्कृती व समाजिक जीवन हे पुरा पाषाण काळात होते कारण याचा काळात लोह घुंघरु नसतांना गांडा ठाकूर यांनी नागदिवाळी या सणाच्या वेळी कोंबळीचे पिले ही पायाला बांधून नृत्ये केले होते. परंतु संशोधक हे प्रमाण माणक मानीत नाही कारण हया दंतकथा मिथक म्हणून भारतीय सामाजिक जिवनमानात विदयमान आहेत.संशोधकांना संशोधनात सबळ व परिस्थितीजन्य सर्वमान्य पुरावे हे या पौराणिक ग्रंथाबाबत मिळालेले नाहीत.



*तडवी* हे एक विशेषनाम आहे. भिल्ल संस्कृतीतून एक समूह,कबिला हा वेगळा झाला व तो पुढे स्वतंत्रपणे सामाजिक जिवन जगु लागला. परंतु भिल्लांचे प्राचीन सांस्कृतिक संस्कार त्यानी त्याग केलेला नाही. त्याची स्वतंत्र भाषा ही या कबिलातील लोक बोलू लागले त्या भाषेवर भिलोरी व गुजराती,राजस्थानी या भाषेचा प्रभाव पडलेला आहे. तडवी भिल्लाची *तडवी* ही मायबोली व *जंगली* ही गुप्तभाषा विकसित पावलेली आहे.

**२.व्याख्या :**

*तांडव* *तलवार* *तड* *तरबी* अशा विशेष नामाचा अपभ्रंश होवून * तडवी* हे नांव व आडनांव विशेषनामाची व्युत्पत्ती झालेली आहे. युध्द भूमित पराक्रम गाजविणारे व अपराजित अशी तलवारीची कसब दाखविणारे योध्दांना *तडवी * म्हणून इतिहासात नोंद दिसून येते. तसेच तलवार बाळगणारे व चालविणा-यांना तडवी म्हणत .अशा प्रकारे मध्यभारतातील व सौराष्टातील, सातपुडयातील भिल्लांच्या कबिल्याला शूर योध्दांना तडवी म्हणून संबोधनाचा प्रघात हा समाजजिवनात प्रचलित झालेला आहे तसेच ४०-५० वर्षापूर्वी देखील तडवी लोक व त्यांचे महिला,मुली हया कबरेला तलवार लटकवून फिरत असत. अशी देखील नोंद ही काही संशोधकांनी घेतलेली आहे.त्याचप्रमाणे भिल्लांच्या प्रमुखास *तडवी* म्हणून संबोधन करण्यांत येते.

इ.स.१९६२ साली शिलॉगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासीची व्याख्या केली आहे. ती व्याख्या नमुद प्रमाणे आहे.

* एक समान भाषेचा वापर करणा-या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणा-यां,तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारीत,सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करण-यार एकजिनसी गटाला *आदिवासी समाज* म्हणतात.

मदन व मजुमदार यांच्या मते * समान भाषा व समान संस्कृती असणा-या व आर्थिक दृष्टीने परस्पर-संबंधित असणा-या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख, *आदिवासी समाज * म्हणून नेहमी केला जातो.

,

सलोख्याचे संबंध होते. ११ व्या शतकाच्या अखेरीस आसावल ,अहमदाबाद भिल्लांच्या ताब्यात होता. त्यामुळे राजपुत राजांना भिल्लाचे,तडवीचे वर्चस्व वाध्त असल्याचे बघून ते त्यांना सहन झाालेले नाही. त्यामुळेच ऐकमेकांशी जरी चांगले संबंध असले तरी पुध्े त्यांचेत काही राजपूत राजांमध्ये तडवी भिल्ल व भिल्लांमध्ये तड पडले गेलेत. पुध्े भिल्लांच्या व तडवीचे शौर्य व वाध्त असलेले वर्चस्व काही राजपूत राजांना सहन झाले नाही त्यातूनच काही राजपूत राजांनी त्यांचेविरुध्द बंडळी केली व असंतोषातून संघर्ष होवू लागले. गुण्यागोविंदाने राहत असलेले भिल्ल,तडवी व राजपूत थोडयाफार प्रमाणात वेगळे झालेत. त्यामुळेच इ.स.१००० ते १४०० च्या काळात राजपूतांनी भिल्लांकडून राजपिपाला,मांडवी,बनाडा व धरमपूर ही ठिकाणे युध्द करुन जिंकून घेतली.प्राचीन काळी राजपूतांना ,गुजरात व माळवा प्रदेशामध्ये जेव्हा राजपूत राजे विजयी होत तेव्हा त्यांच्या भुवईला माथेवर भिल्लांचे ,तडवीचे अंगठयाचे रक्ताचा टिळा लावणेची परंपरा होती.

खान्देशामध्ये मुघलांचे आगमन झाले तेव्हा [१६००-०१] भिलल लोक हे राजनिष्ठ व मेहनती असलयाचे नमुद केलेले आध्ळते. तथापी १८व्या शतकात मुघल आणि मराठे संघर्षाच्याकाळी भिललांनी आक्रमक पवित्रा घेवून आपले स्वातंत्र्य घोषित केले.मराठे हे भिललांचे वाध्त चाललेले वर्चस्व बघून व ते अंकुश ठेवण्यावर असमर्थ ठरले. ज्या ज्या वेळी भिल्ल टोळया व त्यांचे कबिले हे गड जिंकण्याकामी व कामगिरी वर घर सोडून जात असत त्याचा फायदा घेत मराठयानी भिल्लाच्या वृध्द महिला व पुरुषा मुले यांना ताब्यात घेवून त्यांना ठार मारीत असत व अशा छुप्या कारवाई नंतर पळून जात असत भिल्लाशी समोरासमोर युध्द करण्याची व त्याना पराभूत करण्याचे धाडस त्यांचे जवळ नव्हते तसेच भिललाचे सामर्थ्य बघून मराठयानी काही भिललांना जेरबंद करुन त्यांना जबर शिक्षा देण्यास सुरुवात केली. अनेकांना ठार केले.मोठया प्रमाणात फटके मारण्याचे व फाशीच्या शिक्षा देण्यांत आलयात.अंतुर्ली जवळील डोंगरकडयावरुन अनेकाचा कडेलोट करण्यात आलेत. धरणगांव,चाळीसगांव,या शहरामध्ये ब-याच भिललाचे शिरकाण करण्यांत आलेत. महिला,मुलांची निर्दयपणे हत्या करणेत आलेली होती. असे इंग्रजांनी आपलया दप्तरी लिहून ठेवलेले आहे.इंग्रज हे सत्ताधारी बनलयावर त्यांनी भिललांना काबूत आणलेत. भारतात जाती व्यवस्था असल्याने व शेकडो हिंदू राजे मिळूनमिसळून



बोगार्डस म्हणतात, *सुरक्षिततेची जरुरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलंला होता.*

डी.एन.मजुमदार म्हणतात, *समान नाव असणारा, एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा,एकच भाषा बोलणारा व विवाह,व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेधनियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारण-या कुटूंबाचे किंवा कुटूंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.*

माझं मता प्रमाणे *रक्तसंबंध व एकच पूर्वज असलेला व विशिष्ट भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा व एकाच सामाजिक अनुकरणीय नितिनियम व व्दिभाषिक जिवनसरणी असलेल्या समूहाला *आदिवासी समाज* असे म्हणतात.

३.ऐतिहासिक मागोवा व तडवी भिल्लांचा १८५७ चा उठावातील सहभाग :

तडवी ,भिल्ल,नागांचे टोळीप्रमुख,गोंडराजे,भुइया जमिनदार,कोरकुतील कुलीन घराणी ,संथाळातील श्रीमंत उरॉव व मुंडा इत्यादी हे खानदानी आदिवासी म्हणून गणले जातात.या आदिवासीनी आपल्या प्राचीन संस्कृतीचे रक्षण बाहय जगाशी संपर्क ठेवूनही केलेले आहे. कालामानाप्रमाणे त्यांचे वर भारतातील इतर संस्कृतीचा प्रभाव हा दिसून येतो. परंतु त्यांनी आपली आदिवासी संस्कृती सोडलेली नाही त्याग केलेला नाही त्याना आजही आपल्या आदिम संस्कृतीचा अभिमान आहे. आपल्या रुधी,परंपरा,चालिरिती,मौखिक सांस्कृतीक सामाजिक जीवनमानानुसार व आपल्या विशेष मातृभाषेवर विलक्षण प्रेम करत ते जगतांना दिसतात.

एकंदरीत आदिवासी हे निसर्गपुत्रच असून अत्यंत प्रामाणिक व साधे जीवनशैली. व्यभिचार हाच ते मोठा अपराध मानतात. मेहनती असल्याने जे काही मिळवायचे ते काबळकष्ट मिळवावयाचे असे त्यांची सामाजिक आचारण असल्याने गुन्हेगारी ही जवळजवळ नाही. त्यांचे कपडे केवळ लज्जा रक्षणासाठी असतात. बस्तरमधील मरिया,जुआंग,गदबा,बोंदो,बैगा या जमातीतील स्त्रिया तर आपले वक्ष:स्थळसुध्दा वस्त्रांकित करीत नाहीत.बलात्कार,स्त्रीभ्रूणहत्या,दुराचार ,बुजूर्गांचा अनादर करणे या गोष्टी हया आदिवासी जमातीत दिसून येत नाहीत.पुरुष,युवक मंडळी देखील आपल्या मायबहिणीचा आदर मानपान ठेवतांना दिसतात.

मध्य क्षेत्रात राहणारे आदिवासीच्या एकंदर शारीरिक गुणधर्मावरुन त्यांना प्रोटो- ऑस्ट्रेलाइड वंशाचे लोक असे म्हणतात. या लोकांचा रंग हा काळा,डोके लांब व केस कुरळे असतात.सर्वसाधारण हे लोक मध्यम उंचीचे असतात. बिहार,बंगाल,ओरिसा,मध्यप्रदेश,महाराष्ट् ,राजस्थान,व गुजरात या भागात या वर्णनाचे लोक दिसून येतात. भुंज,मुंडा,उरॉव,हो, भुइया,गोंड,बैगा, कोडा,चेंचू,कोरवा, भिल्ल,तडवी, हे आदिवासी मध्य क्षेत्रात राहणारे आहेत. यात भिल्ल व तडवी हे महाराष्टतील आदिम जमातीतील लोक हे उंचेपुरे व गोरवर्णिय असल्याचा अपवाद असल्याचे दिसून येत आहे.

इंग्रज व मोगालाच्या काळात वतनदार महाराणी जैतूनबाई तडवी हीने बराच काळ कारभार बघितलेला आहे.राजे सिताफखां तडवी यांचे मृत्यूनंतर सोनगांव-भिंगा-याची सत्ता तीचे जवळ आली. आपल्या पति प्रमाणेच तिने इंग्रजांशी कधीही जवळीक केलेली नाही.तसेच फारुकी राजांच्या राजघराण्यांशी तसेच असीरगड,किशनगड तसेच राजस्थानातील राजपूत राजांशी तिचे सलोख्याचे संबंध होते. महाराणा प्रतापसिंह यांनी सातपुडयाच्या जंगल द-याखो-यांत ज्यावेळी आश्रय घेतला त्यावेळी तिच्या आज्ञाप्रमाणे भिल्ल व तडवी यांनी सम्राट महाराणा प्रताप यांना मदत क़ेली..मोग़लाचा अंमल सारखा सुरु असतांना तिने बराच काळ आपली रियासत वतनदारी ही आबाधीत ठेवलेली आहे. आपल्या घोडयावर स्वार होवून ती रियासतीचा फेरफटका मारीत असे तिचा पोशाख हा मर्दानी होता.खांदयावर बंदूक व कमरेला तलवार असायची. आदिवासी तडवी भिल्ल ही तिला *भिंगा-याची वाघिण* म्हणून ती ओळखली जावयाची, तडवी लोकवाड्.मयातून लोकसाहित्यातून आजही तिचे गौरवगाथा ही परंपरेने गायली जातात तसेच सांगीतली जातात. त्याचप्रमाणे *राजपूत तडवी भाट* यांचे जवळील पिध्यांपिध्याच्या त्यांचे पोथीतही नोंदपुस्तकातही तडवी भिल्लाच्या पुर्वज्यांच्या नोदी व वतनदार महाराणी जैतूनबाई व राजे सिताफखां व वडतीचा राजे सुजातखां याचेबददल लिहीलेले दस्ताऐवज आहे.महाराणी जैतूनबाई हिचे जवळ तलवार चालविणा-या शौर्य गाजविणा-या भिल्ल,तडवी महिलांची चाळीस हजार पेक्षा जास्त महिला फौज होती. तसेच पुरुष तडवी यौध्दाची फौज होती. या फौजांनी इंग्रजाविरुघ्द युध्दे केलेली आहेत. तसेच फारुकी व अकबराला देखील युध्दात मदत केलेली आहे. 'भिल्ल,तडवीच्या सुंदर महिलांनी ,युवतीनी इंग्रजाच्या व मोगलाच्या काळात हेरगिरी करुन महाराणी जैतूनबाईला व भिल्ल राजे व राजपूतांना मदत करुन शौर्य गाजविलेली आहेत.राजपूत राजांना युध्दात मदत केलेली आहे. इंग्रजाच्या कमजोरीचा फायदा घेत माहिती व बातम्या मिळवून त्यांचे कामजोरीचा फायदा घेत अनेक गड व युध्दात विजय मिळविण्यांस हातभार लावलेला आहेत.या तडवी व भिल्ल हेरगिरी करणा-या सुंदर युवतीना व महिलांना *बहुरुपी वाघिणी* म्हणून जनमानसात परिचित होत्या. त्यांचा नांव व ओळख ही गुप्त राहिलेली होती. अनेक गोपनिय माहिती मिळवून त्यांनी भिल्ल तडवी व राजपूतांना माहिती पुरवून मदत केलेली आहे.त्या कधीही कोणासही दिसल्या नाहीत व सापडल्या नाहीत. या युवतीचा व महिलांचा हेरगिरी करणारा एक आदृश्य सप्रदाय हा आपल्या मातृभुमिकरता भारतमातेच्या रक्षणासाठी प्राणाची बाजी लावून सोपविलेली कामगिरी मरेपर्यत पार पाडीत होत्या.त्या कधीही कोणाच्या हातात सापडल्या नाहीत.



जाती व्यवस्था असल्याकारणाने खान्देशातील हिंदू राजांनी राजपूत सोडून भिल्ल व तडवी यांना आपल्या सैन्यात सामील केलेले नाही.परंतु फारुकी,अकबर, महाराणा प्रताप, या राजघरण्यातील राजांनी त्याना आपल्यासैन्य दलात सामील केलेले होते .भिल्ल व तडवी व तडवी पठाणाची चाळीसहजार पेक्षा जास्त फौज फारुकी,अकबर व राजपूत सम्राट महाराणा प्रताप यांचे जवळ होती. अकबर,फारुकी व राजपूत सम्राटांनी त्यांचे कामगिरी व शौर्य बघून इनामे ,बक्षिसे, जहागि-या दिल्या होत्या. त्या मध्ये जळगांव जिल्हयातील यावल,चोपडा व रावेर तालुक्यातील वडती,लोहारा,मोहरद,बिडगांव, तसेच मध्यप्रदेश लगतच्या काही गांवातील लोक हे आजही तडवी वतनदार व राजे म्हणून घोषीत केलेले होते. हे तडवी परिवारातील काही लोक हे आजही वतनदार व राजेम्हणून ओळखले जातात.अशा प्रकारे सातपुडयात भिल्ल संस्थानाची व भिल्ल राजांची परंपरा होती.

मानववंशशास्त्रज्ञांच्या दृष्टीने भारतातील आदिवासी हे तीन प्रमुख वंशात मोडतांना दिसतात.१.मॅगोलॉईड २.प्रोटो ऑस्ट्रॅलॉइड व ३.नीग्रिटो हे तीन वंश आहेत. प्राचीन काळी मध्यपुर्वेतून आलेल्या प्रोटो ऑस्टॉलॉइड लोकांचे भिल्ल , कोळी, शबर, द्रविड, पुलिंद हे वंशज होते असे मानववंश संशोधकांचे मत आहे. 'भिल्लांचे मुळस्थान हे अबू व असीरगड ,किशनगड येथील डोंगरद-यात होते. डोंगरद-यात राहणारी ही आदिम जमात आहे.पुर्वीपासूनच भिल्ल व राजपूताचे

राहत नव्हते त्यांचेत एकोपा व सांघाकीता नव्हती याची जाणीव इंग्रजांना होती म्हणून त्यांनी राजपूत,भिल्ल,तडवी व इतर भारतातील हिंदू राजांना ऐकमेकाविरुध्द उभे करुन त्यांचे मनात ऐकमेकाबददल कलुषिता निर्माण केली या कूटनितीमुळेच आपण भारतावर राज्यकारभार करता येईल याची जाणीव इंग्रजांना होती म्हणून त्यांनी कोणत्याही राजांना ऐक होवू दिले नाही ज्यांनी विरोध केला त्याचा बिमोड हा त्यांचेत देशातील राजांकडून व लोका करवी करविला. मात्र इंग्रजाची ही चाल आदिवासीच्या लक्ष्यात आलेवर त्यांनी १८५७ च्या उठावात बंडाळी करुन इंग्रजांना चेरीस व सळो की पळो करण्यांत सुरुवात केली परंतु इंग्रज हे दूरदर्शी होते त्यानी विशिष्ट प्रकारच्या नितीचा अवलंब केला. या नितीनेच आपण भिललांवर अंकुश तर ठेवूच शिवाय त्याचा मनुष्यबळाचा उपयोग हा आपलया हिताकरिता व राज चालविण्याकामी निश्चितच फायदा होईल हे इंग्रज जाणून होते.म्हणून त्यानी अगोदर या भिलल जमातीचा विश्वास प्राप्त करण्याचा प्रयत्न केला.

रॉबर्टसन,ओव्हान्स व जेम्स औट्रम या दूरदर्शी इंग्रज अधिका-यांनी भिललांना पोलीस दलात समाविष्ठ करुन घेतले व भिललांचे शौर्याचा आपलया राज्यकारभारात भरीव मदत व सहकार्य उपयोग करुन घेतले.पोलीस दलात समाविष्ठ झालयाने भिलल हे स्थिर जीवन व सरळ मार्गाला लागलेत. मात्र अज्ञानता व मदयपानामुळे भिलल हे गुजर,मारवाडी या सावकारांच्या व जमिनदाराच्या कर्जात बुडाले.सावकार विविध उपयानी भिललांना कर्जबाजारी करित व आपलया अंकित करीत.दरम्यानच्या काळात मराठे हे खान्देशात छुप्या चधया करत व मोठया प्रमाणात धन,संपत्ती,खजिना व इतर मौलयवान चिजवस्तु लुटून नेत असत.इंग्रज व मुघल हे मराठयाच्या छुप्या व अनपेक्षित कारवायामुळे हैरान झाले होते.मराठयांनी थाळनेर [१६९६-९७] नंदूरबार [१६९७,मे-१७०२] जळगांव [ऑक्टोंबर १७००] सुलतानपूर [मे-१७०२] ब-हाणपूर व नंदूरबार [१७०३] दहेजगांव [धरणगांव][एप्रिल १७०४] रावेर,नंदूरबार आणि ब-हाणपूर [१७०६-०७] पुन्हा रावेर [जानेवारी १७०७] अशा ठिकाणी मोठया प्रमाणात चधया केलयामुळे मुघलाचा अंमल असलेला खानदेशात मुघलाचा महसूल तर घटलाच शिवाय जनतेचेही मोठयाप्रमाणात नुकसान झाले. १९व्या शतकात इंग्रजाच्या राजकीय पध्दतीवर आदिवासी भिलल,तडवी यांचेमध्ये कमालिचा असंतोष होता.खानदेशातील प्रजाजन



ही इंग्रज सत्ताधारी विरुध्द होती.परंतु उघडपणे कोणीही याचा विरोध करत नव्हता. आदिवासी भिलल व इतर आदिवासी लोकांना इंग्रजानी स्वत:च्या फायदयाकरिता त्याकाळी जाणूनबुजून गुन्हेगारी जमात म्हणून घोषित केले होते. त्या दृष्टीने ते त्यांचेकडे दुषित मनोवृत्तीतून बघत असत.

काही आदिवासी हे मोठया प्रमाणात चो-या,रस्तालुट,दरोडे टाकायचे तसेच सरकारी खजिना लुटून नेणेचे काम ते करत होते व हा सर्व पैसा,धन,ते चोरुन लपवून खानदेशातील गरिब व गरजू लोकांना वाटून हे आदिवासी दरोडैखोर जंगलात पळून जात असत.यात इंग्रजांना जेरीस आणणा-या केजारसिंग,तुबिया नाईक तसेच तंटया भिलल याचा प्रामुख्याने समावेश होता. खानदेशात व मध्यप्रदेशात त्यांनी धुमाकूळ घातला होता.आदिवासीना कर्जबाजारी करणारे व त्याचे जमिनी हडपणा-या जमिनदारांच्या व सावकाराच्या घरांवर दरोडै घालून तो खजिना ते आदिवासी व इतरांना वाटून त्याना मदत करित या प्रदेशात त्याची दहशत होती. इंग्रज त्याच्या कारवायामुळे हैरान झालेले होते.त्यांचेवर नियंत्रण मिळवण्याकामी इंग्रजांनी आपलया अखत्यारीतील पोलीसातील आदिवासीची मदत व उपयोग करुन घेतला त्यात ते काही अंशी सफल देखील झाले होते. कालांतराने शेवटी इंग्रजांनी कूटनितीचा व दूरदर्शीपणाचा उपयोग करत खानदेशातील आदिवासी भिललाशी सलोख्याचे संबंध जोडण्यास प्रारंभ केला. जे शरण आले किंवा पकडले गेले त्याना माफी देण्यास सुरुवात केली.त्याना कसण्यासाठी जमिनी दिलयात.बियाणे व तगाई दिली त्याचप्रमाणे काहीना वतनदार व जहागिरदार म्हणून घोषित केलेत. तसेच पोलीस दलात तडवी,भिललनां समावेष करुन चो-या,रस्तालुट ,दरोडेखोर यांचेवर नियंत्रण मिळविले. लेप्टनंट जेम्स औट्रम याने मुंबई प्रांताचा गर्व्हनर माउंटस्टुअर्ट एलिफन्स्टन यांचे आदेशानुसार सन १८२५ मध्ये खानदेशामध्ये तीन भिलल व तडवी भिललाची फलटणी उभारलया.खानदेश भिलल व तडवी भिलल फलटणीचा प्रमुख हा ले. औट्रम हा होता.आदिवासी भिलल व तडवी भिललाच्या शौर्याचा व वीरतेचा उपयोग हा अशाप्रकारे करुन घेण्यांत आला. हळुहळू कालांतराने आदिवासी भिलल व तडवी भिलल हे स्थिर झालेत सरळमार्गाला लागले व लहानमोठया गांवांमध्ये वास्तव्य करित शेती व इतर व्यवसाय करु लागले.या आदिवासी भिलल व तडवी परिवारातील सदस्य हे इंग्रजाची पोलीस दलात नोकरी करित असलयाने त्यांचेत बदल घडू लागले

ते स्थायीक झाले व मोठयाप्रमाणात एकमार्गी जिवन व्यतीत होवू लागले.ब्रिटिशाचे काळातील गुन्हेगारी जमात हा शिक्का पुसला जावून सरकार दरबारी शूर-वीर व मेहनती जमात म्हणून नोंद होवू लागली गणली जावू लागली.

भारतीय स्वातंत्र लध्याची सुरुवात ही आदिवासीनी केली सन १८५७ मध्ये पोलीस शिपाई मंगल पांडे यांनी इंग्रजाविरुध्द लध बंड पुकारले व पहिली स्वातंत्राची मशाल पेटवली.१८५७ च्या उठावात जे तडवी व भिल्ल हे इंग्रजांच्या पोलीस दलात सामील झाले होते ते इंग्रजाविरुध्द झाले व मोठा उठाव होवून तडवी,भिल्ल,तडवी पठाण, नरधे तडवी ,नहाल तडवी, मुंडा या उठावात मुंडा आदिवासीचे मोलाचे योगदान आहे. ज्यावेळी भारताला महात्मा गांधीचे नेतृत्व मिळाले नव्हते त्यापूर्वीपासून मुंडा जमातीत जन्माला आलेले महान बिरसा मुंडा यांनी इंग्रजाविरध्द लध्याची प्रेरणा ही सर्वप्रथम भारतीयांना दिली व संघटीत होण्याचे आवाहन केले. मौखिक लोकसाहित्यातून त्याची गौरवगाथा ही गायली जातात. महात्मा गांधी अगोदरचे गांधी म्हणून ते भारतीय आदिवासी व समाजजिवनात सुपरिचित आहेत आज २१ शतकात त्यांचे बहुमोल योगदानासाठी स्वातंत्र भारताच्या एखादया चलनी नोटावर महान बिरसा मुंडा यांना स्थान दिले असते तर ती त्यांना खरी श्रध्दाजंलि ठरली असती.तसेच राजपूत सम्राट महाराणा प्रताप यांनी भिल्ल व तडवी यांचे शौर्य व देशभक्ती बघून त्यांना त्यांनी केलेले सहकार्य बघून तसेच ज्ञात अज्ञात शहीद सेनानीचे स्मरणार्थ महाराणा प्रताप यांनी आपल्या राज्यकारभारात सोन्याच्या नाणीवर भिल्लांची, तडवीची मुद्रा अंकीत करुन त्यांचा येथोचित गौरव केलेला आहे.१८५७.या उठावामध्ये अनेक आदिवासी भिल्ल व तडवी भिल्ल पोलीस शिपाई सामील झाले होते पुढे ते भुमिगत होवून स्वातंत्र लध्यात त्यानी मोलाचे कार्य केलेत काही शहीद झाले होते.त्याचेपासुन स्वातंत्र्य लध्याची प्रेरणा घेवून अनेक देशभक्त आदिवासी युवकांनी यात सहभाग घेतला व इंग्रजाविरुध्द बंड पुकारले व खेडयापाडयामध्ये जावून इंग्रजाविरुध्द अंसंतोष निर्माण केले.व भारतीय स्वातंत्र सग्रामात सामील होण्याचे आवाहन करण्यांत आले.

भिल्लांचा खरा इतिहास लिहिण्याऐवजी काही इतिहासकारांनी व संशोधकांनी त्यांना चोर,दरोडेखोर,लुटारू असे म्हटलेले आहे हे हेतुपुरस्सर आहे. कलिंग देशाचा महान पराक्रमी योध्दा वीर कलिंग हा भिल्ल होता. भिल्लांचा व तडवीचा पहिला



ऐतिहासिक उल्लेख हा इ.स.६०० मध्ये मिळतो. माळव्याचे राज्य हे मूळ भिल्ल प्रमुखाचे होते. माळव्याच्या भिल्ल राजाने इतर राजांना माळव्याच्या प्रदेशाातून पुढे जाण्यास बंदी केल्याचा उल्लेख *कथासरित्सागर* या संस्कृत ग्रंथात मिळतो.त्यावेळी भिल्ल व तडवीची प्रमुखाची छोटी छोटी अनेक भिल्ल राज्ये होती. सिसोदिया घराण्याच्या प्रत्येक राजपूत राजाला गादीवर बसवितांना भिल्ल प्रमुखाच्या हाताने रक्ताचा टिळा भिल्लाचा लावण्याची परंपरा प्रचलित होती. तसेच राजपूत राजे देखील सदरची परंपरा पाळीत होते.लग्न समारंभात टिळा लावण्याचा प्रथम मानही भिल्लांचाच समजला जात होता. १० व्या शतकाच्या शेवटी चंपानेर वगळता पूर्ण रेवाकांत प्रदेश हा भिल्ल प्रमुखांच्या व राजांच्या ताब्यात होता. एकेकाळी भिल्ल शक्तीशाली होते. त्यामुळे राजपूत राजे त्यांचा आदर करीत असत हे *एन्थोवन* या समाजसंशोधकाने केलेल्या अभ्यासातून दिसून येते.तशी त्याने नोंद केलेली दिसून येते.

सातपुडा प्रदेश हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यात राजस्थान,गुजरात,व मध्यप्रदेशातील पर्वतरांगा,विंध्य आणि अरंवली पर्वतांचा भाग, महाराष्टातील नंदूरबार,धुळे,जळगांव ,अमरावती तसेच औरंगाबाद जिल्हयातील सातपुडा व अजिंठा पर्वतरांगांचा समावेश होतो.तापी व नर्मदा नदयांच्या मधील प्रदेशा हा *भिलवाड* म्हणजे भिल्लांचा प्रदेश या नांवाने परिचित होता व ओळखला जातो. इतिहासातील भिलवाड प्रदेशांची भौगोलिक सीमा मात्र याहीपेक्षा खूप मोठी व विस्तारीत होती. सातपुडयापासून ,विंध्य,अरवली पर्वतांच्या रांगा पर्यत म्हणजे महाराष्ट्र ,मध्यप्रदेश,गुजरात व राजस्थानापावेतो हा प्रदेश पसरलेला होता. भारताची आदिवासी ही मुळ संस्कृती आहे.वैदिक संस्कृती त्यानंतर आली. आदिवासीच्या गौरवगाथा त्याची श्रेष्ठ परंपरा,त्याग,बलिदानाचे इतिहासाचे पाने इतिहास संस्कृतीचा अभ्यास करणा-या विव्दवानांना संशोधकांना कधी दिसली नाही त्यामुळे आपल्या मातीशी इमान राखणा-या मुळ रुप खरे स्वरुप हे सर्वसामान्य जनतेसमोर आले नाही.या विरुध्द अत्यंत त्रोटक व दिशाभूल करणारा इतिहास लिहिलेला आहे.

भारताचा बहुसंख्य भू-प्रदेश आदिवासी राज्यांनी लाभलेला होता. मध्य भारतात वैभवशाली गोंड राज्य होती हा प्रदेशा *गोंडवन* राज्य म्हणून ओळखला जात होता. उत्तर-पश्चिम भागात भिल्लांची राज्ये होती. मारवाडचे पठार ते थेट सातपुडाचे

सातमाळ आणि महादेव डोंगर ते अजिंठाच्या रांगा अशा विस्तीर्ण प्रदेशात या राज्याच्या सीमा पसरल्या होत्या. त्या प्रदेशाला *भिलवाड* नावाने ओळखले जात होते. *कलिंग* देशावरही भिल्लांचेच राज्य होते. उत्तर आणि पूर्व मध्य प्रदेशात नागा, मिझो,संथाळ, या आदिवासीची स्वतंत्र राज्य होती. सहयाद्री पर्वताच्या प्रदेश *कोळवण* या नावाने ओळखल जात होता. आदिवासी भिल्लांत पावरा,तडवी,परमार,वळवी,पाडवी,गावीत,पठाण,कोटले, मावची ,धानका,डांगची,वसावा या बारा पोटजाती आहेत.महाराष्ट्रात धुळे जळगांव,अहमदनगर,नाशिक,औरंगाबाद या भागात भिल्लांची वस्ती आहे. गुजरात मधील डांग सुरत भडोच या जिल्हयातही वर सांगीतलेप्रमाणे भिल्लांची वस्ती आहे.मध्यप्रदेशातही काही भागातही भिल्ल आहेत.सातपुडा व विंध्य पर्वताच्या जंगलातील द-याखो-यात भिल्ल राहतात. या परिसरातही पूर्वी भिल्ल राजांचे राज्य होती.भिल्ल,किरात व निषाद या राजांची राज्ये होती.'भिल्ल तडवी जमात पराक्रमी शूर व काटक म्हणून ओळखली जातत तळोदे,शहादे,अक्राणी, धडगांव,शिरपूर,नंदूरबाद,नवापूर,साक्री,अक्कलकुवा या तालुक्यात ४० टक्के भिल्ल आहेत तसेच अक्कलकुवा व अक्राणी तसेच नवापूर तालुक्यात भिल्लांची संख्या ही सर्वाधिक १०० टक्के इतही आहे.नाशिक जिल्हयातील कळवण व बागलाण या तालुक्यातही भिल्लांची गांवे आहेत. सातपुडाच्या द-याखो-यांत व सातमाळच्या पठारावर आदिवासी भिल्लांची वस्ती आहेत.

भारतात इंग्रजाची राजकीय सत्ता येताच कंपनी सरकारने या देशांत ब्रिटिशांच्या आर्थीक वसाहतीचे स्वरुप प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न या देशातील लोकांवर व विशेष करुन आदिवासीवर अत्याचार व जुलूम केले त्याच्या परंपरा चालिरिती व संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेत. भारतात इंग्रजाची सत्ता येण्यापूर्वी अनेक राजवटी आल्या आणि गेल्याही परंतु आदिवासीच्या रुधी परंपरा व संस्कृती व बोली भाषा कोणीही नष्ट करु शकले नाहीत.त्या अजूनही कायमच आहेत. इंग्रजांनी आपल्या फायदयासाठी आदिवासीचे उदरनिर्वाहाचे साधन असलेली वनसंपदा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. एवध्चे नव्हेतर आदिवासीच्या वसाहतीवर सुध्दा आक्रमणे केलीत त्यामुळे आदिवासी चिडले आणि इंग्रजाच्या या ध्येय धोरणाविरुध्द शस्त्र उचलून अनेक आदिवासीना इंग्रजाविरुध्द उठाव करावा लागला.



आदिवासी भारताचे मुळ निवासी असल्याने परप्रांतातून आलेल्या लोकांचा सामना त्यांना प्रथम करावा लागला. भूमिचे मालक असलेले आदिवासी आणि त्याच्या जमिनी कपटाने बळकावून त्यांना भूमिहीन करु पाहणारे यांच्यामध्ये जो काही संघर्ष झाला वा आदिवासीनी केला, तो त्यांचा स्वातंत्र्याचा भारताचा इंग्रजाच्या जोखडातून मुक्त करण्याचा लध होता. अन्याय,अत्याचार, तसेच शोषणांविरुध्द तो लध होता. आदिवासीना आपल्या हक्कांसाठी अनेक आंदोलने केलेली आहेत.

* * * * * * *

प्रकरण २

# सातपुडयातील आदिवासी तडवी भिल्ल जमातीची विवाह परंपरा

**प्रस्तावनाः**

सातपुडयात आदिवासी *तडवी* ही भिल्ल जमात वास्तव्यास आहे.तडवी हे भिलांचे वशंज आहेत तसेच तिचे स्वतंत्र अस्तित्व व संस्कृती दिसून येते. त्याच प्रमाणे एक वेगळे सांस्कृतिक परंपरा व सामाजिक जीवनमानात ते आजही आपल्या आदिवासी रुधी परंपरा,चालीरिती, संस्कृतीत *तडवी* ही जमात हाजारो वर्षापासून आपले वेगळेपण जपून आहे. पुरा पाषाण युगापासून भिल्लांचे पुरावे हे संशोधकांना मिळालेले आहेत.सिंधू खो-यातून आर्य हे भारतात आलेवर त्यांचा विरोध हा आदिवासीनी केला. परंतु हळुहळू जसजसा काळ पुधे जावू लागला तेव्हा कालांतराने आदिवासीनी व *तडवी* व भिल्लानी आर्याचा विरोध सोडून समन्वयाची भुमिका घेतली. व त्यांचेशी सलोख्याचे संबंध हे निर्माण झालेत. मुळात आदिवासी हे निधर्मी व निसर्गपूजक,मानवतावादी मुळ स्वभावगुण व त्यावर आधारीत आदिम संस्कृती असलेने त्यांचेवर आर्य संस्कृतीचा प्रभाव पडणे सहाकिजकच होते. * तडवी* या



सातपुडयातील आदिम जमाती ही आजही बाळाचे जन्माच्या वेळी नामकरणचा विधी हिंदू संस्कृतीप्रमाणे करतात तसेच विवाहाचा मुहूर्त हा मंदिरातील पुजारी किंवा ब्राम्हणाला विचारल्याशिवाय त्याच प्रमाणे शुभ सवासीनी विवाहातील नांवे ही ब्राम्हण सांगेल त्याप्रमाणे ठरवितात.इस्लाम संस्कृतीचा देखील प्रभाव हा तडवीवर पडलेला आहे. ख्वॉजा मुईनुददीन चिश्ती या सूफीसंताच्या शिकवणीमुळे तडवी भिल्लांनी इस्लामवर इमान आणून इस्लामचे काही प्रथाचा स्विकार केलेला आहे.परंतु तरी तडवी यानी आपली आदिवासी संस्कृती सोडलेली नाही.ते आजही आदिम संस्कृतीप्रमाणे जगतांना व सामाजिक आचरण करतांना दिसतात. आदिवासी *तडवी* ही धर्मातरीत मुस्लीम किंवा धर्मातरीत हिंदू जमात नाही.तडवी यांनी इस्लाम संस्कृतीतून नमाज,रोजा,निकाह ,ईद, मोहर्रम सण साजरा करणे व सूफी पंथातील विचाराचा स्विकार केलेला आहे. तसेच हिंदू संस्कृतीतून उपवास,लहान बालकाचे जाऊळ कुलदेवी समोर वाहातात, लग्नविधीतील काही संस्कार,दिवाळी,पोळा,होळी, अक्षयतृतीया सण साजरा करणे तसेच महादेवास मुळ आराध्य दैवत व पार्वतीस भिल्लीन माता म्हणून पूजतांना दिसतात.अशाप्रकारे तडवी यांनी श्रध्देपोटी व इमानासाठी काही संस्काराचे ते पालन करतांना दिसतात. त्यानी पूर्णपणे धर्मबदल केलेला नाही.तसेच धर्मातरीत नाहीत ते स्वत:ला मानवतावादी समजतात. अशा निरागस व गोड माणसांचा जगाने व भारताने स्विकार करावा व त्यांचेपासून माणूकीचा परिपाठ घेवून मानवतेचा संदेश हा जगाला अर्पित करुन त्यानुसार २१ व्या शतकात नव्या पिधिसमोर एक नवा आदर्श निर्माण करणे हे आज सभ्य मानव समाजाचे कर्तव्य आहे. जगाला भारताला सामाजिक एकोपा व सांघीकता सलोखा बंधुत्वाचा नारा हा नव्या पिधिच्या मनात रुजवावा त्यातच जगाचे व भारताचे हित व फलित आहे.

एकंदरीत आदिवासी व तडवी भिल्ल हे विवाह विधी हा मुलगा वयात आलेवर व वरायोग्य झालेवर विवाहाचा विचार करतात. आदिवासी हे हिंदू संस्कृती प्रमाणे विवाह हा धार्मिक विधी मानत नाहीत तर ते विवाह हा सामाजिक करार व समूहाधिष्ठित जबाबदारी मानून त्याप्रमाणे आदिम विवाहातील मौखिक नितिनियम व आचारणाची सक्ती असते. वराला कोणताही अधिकार हा वधूबददल घेण्याची मोकळीक नसते तर ती एक सामाजिक जबाबदारी व समूह सांगेल त्याप्रमाणे वराला त्याप्रमाणे वागणे हे बंधनकारक असते. त्यात घरजावाई,काडीमोड, मुलांचे संगोपन,

पशूधनाचे वाटप, शेतीची विभागणी, महिलाचे कुलदान मुल्य, वधूचा मानपान, इत्यादी बाबी समाज पंचायतीत समाज सांगेल त्याप्रमाणे वराला वागावे व जबाबदारीने कर्तव्य पालनाची सामाजिक सक्ती असते. जो वर विरोध करेल त्याला शासन व समाजातून बहिष्कृत करुन अपमानीत वागणूक ही समूहाकडून दिली जात असते.

कोणतेही प्रेषिते व देवदूते व धर्मग्रंथ, कायदेसंस्था, पोथी पौराणीक ग्रंथ संपदा, आदिवासी सामाजिक जिवनात नसतात तसेच भाषा, सामाजिक नितिनियम सत्य-असत्य, व्रतवैकल्पयीय सामाजिक चलनवलन हे सर्व आदिवासी संस्कृतीत अलिखित मौखिक असतात. तसेच ते लिखित स्वरुपात नसतांनाही आदिम संस्कृती ही अनेक अंगाने नागरी संस्कृती प्रमाणे समृध्द आहे. त्यामुळेच विवाह बंधन हे दोन व्यक्तीचे बंधन नसून ते संपूर्ण सामाजिक बंधन ते मानतात व त्याप्रमाणे वर वधू हे वागत असतांना दिसतात.तसेच समाजपंचायतीने दिलेले आदेश पाळीत असतात.

आदिवासी तडवी विवाह हा आदिवासी संस्कृती परंपरेनुसार होतांना दिसतात. पूर्वी विवाह हा पांच दिवस होत असत आता तीन दिवसांत विवाह सोहळा पार पाडतांना दिसतात. हळद लावणे, गोय सोयनी, कुलदेवतेला पुर्वजांना आवाहन, नाग्या भोप्या रिवाज, निवता,मांडव गुंफणे, बिददी फिरविणे, टिका परंपरा, देवलया पूजन इत्यादी परंपरा आदिवासी रिवाजाप्रमाणे करतात सदर प्रसंगी महिला व सवासीनी हया आदिवासी लोकगीते गातांना दिसतात तसेच मुलीच्या घरी विवाह विधी पार पाडला जातो. शेवटी निकाह काझी लावतो व खानपान होवून विवाह सोहळयाच्या सोपास्कार पार पाडला जातो.

**तडवी विवाह वैशिष्टे:-**

१. हळदीच्या दिवशी हळदीचा मांडव टाकण्याचा कार्यक्रम होतो. हा मांडव नवरीच्या घरासमोरील दाराजवळ असतो. मांडवात एक कोरा माठ ठेवतात. त्याचेखाली गहू व इतर मिश्रीत धान्य टाकतात. माठ पाण्याने भरुन ठेवतात. त्यावर छोटे कोरे मडके ठेवतात. माठाला को-या लाल वस्त्रात हळकूंड ,सुपारी व नाडा गुंडाळून बांधतात. पाच बोट ं हळदीची लावली जातात. मुलीकडे हळदीचा मांडव हा नऊ खांबाचा तसेच मुलाकडे तो बारा खांबांचा टाकण्याचा सांस्कृतिक परंपरा प्रथा आहे.



२. नवरदेवाकडून जोपर्यंत *देजकरी* येत नाही, तोपर्यंत नवरीला हळद लावणेच्या रितीरिवाजाला सुरुवात होत नसते. देजकरी याचा सांगावा शकुन आलेवर ही आदिवासी प्रथा हळदविधीची संपन्न केली जाते.

३. विवाहविधी सुरु होण्यापूर्वी नवरदेव हा पिरोबाच्या मजारीजवळ किंवा गांवाच्या सीमेवर हनुमानाच्या पारावर थांबलेला असतो. नवरदेव हा नवीन कपडे परिधान करुन व डोक्यापासून ते पायापर्यंत विविध फुलांची गुंफलेली माळा घातलेली असते त्यास *सेहरा* असते म्हणतात.वाजतगाजत वरात गांवातून मिरवणूकीच्या स्वरुपात नवरीच्या घरी मांडवदारी येण्यांस निघते त्या रिवाजाला * बिददी* मिरविणे असते म्हटले जाते.

४. नवरीच्या मांडवात *निकाह* पर्धविण्यापूर्वी काझी हा नवरदेवाला मसजिद मध्ये घेवून जातात व तेथे नमाज अदा करण्यात येते नंतर काझी हा नवरदेवाला नवरीच्या मांडवात घेवून येतो.

५. निकाह विवाह हा प्रत्यक्ष लागतांना नवरी ही घरामध्ये व नवरदेव हा मांडवात बसलेला असतो.

६. न वरीच्या अंतीम संमतीने मेहर *कुलदानमुल्य* ही ठरवली जाते. सदरचा विवाह हा *कबूल आहे काय* असे वकील व गवॉह नवरीला सांगून तिजकडूनही *निकाह विवाह कबूल * हे उच्चारण ऐकुन मांडवात परत येतात.

७. मांडवात उपस्थित संग्या सोय-या समक्ष *कुलदान मुल्य* अर्थात *मेहर* वाचून दाखवितो. नवरदेवाकडूनही कुलदान मुल्य नवरीचे श्रध्दामुल्य कबूल करुन घेतली जाते.ही रक्कम २०१ ते ७८६ रुपया पर्यत धरण्यात येत असते. नवरदेव कडून *कुलदानमुल्य* श्रध्दामुल्य अदा करणेत येते.

८.काझी हा आपल्या पुस्तिकेत नवरदेव-नवरीचे समक्षपणे हस्ताक्षर नोदवितो किंवा नांवे नोदवितो तसेच वकील व गवॉहाचे नांवे व हस्ताक्षर देखील नोंदविले जातात. तदनंतर काझी हा पांच कलमे नवरदेवाकडून पध्वून घेतो व नंतर शेवटी दुवॉखेर अल्लाला स्मरण करुन मागतात व अशाप्रकारे हा विवाहाचा निकाहचा सोपास्कार पुर्णत्वास येतो.

९.विवाह पुर्ण होताच नवरदेव विवाहात उपस्थित असलेल्या संग्यासोय-यांना अलिंगन देत आर्शीवाद घेतो व मित्र मंडळी देखील मुबारकबात देतात. नवरीही महिलांना भेटून आशीर्वाद घेते.

१०. आदिवासी तडवी समाजाचे एक प्रमुख वैशिष्टे म्हणजे तडवी खानदानाची प्रत्येकाची कुलदेवता ही असते. नवरदेव-नवरीला कुलदैवतेसमोर उभे करुन पुजाअर्चा ही विधीवत करुन दर्शन घेतात व भावी संसार मंगलमय व सुखी होवो ही कामना करतात तसेच पिरोबाचे देखील दर्शन घेतात व मजारीवर फुलांची चादर चध्वून दूवॉ सुखी संसाराची मागतात.

११. विवाहाचा प्रमुख कार्यक्रम हा नवरी कडे झालेनंतर नवरदेव हा आपल्या घरी येतो तेथे जेवनाची पंगत देण्यांत येते व शेवटी मजलिस भरते यात परिवारातील व जातपंचायतीचे संगे सोयरे सहभागी होतात. अशाप्रकारे नवरदेवाकडील कार्यक्रमाचाही इतिश्री परंपरेनुसार शेवटी होतो.

१२. नवरदेवाला काझी हा निकाह लावण्याअगोदर घरातील ज्येष्ठ महिला मंडळी नवरदेव-नवरीला घरात बोलावून घरातील भिंतीवर हळदीने भरलेलापांच बोटं मारतात. तसेच लाल रंगाच्या कापडामध्ये नाराळ व इतर पारंपारिक चीजवस्तू रिवाजानुसार ठेवतात व भिंतीवर खिडयाला बांधतात व पूजाअर्चा करतात.

१३. तसेच नवरदेवाला निकाह पध्ण्याअगोदर परिवारातील मंडळी ही नवरदेवाला व नवरीला घरात बोलावून कुलदेवतेसमोर उभे करतात व दोन्हीच्या माथेवर हळदीचा , कुकंवाचा तिलक लावतात गळयात फुलांचे हार टाकतात डोक्याला फेटा बांधतात तसेच परंपरेनुसार पूजाअर्चा करतात. या विधीत सर्व आदिवासी महिला व पुरुष सहभागी होतात. या रिवाजाला *टिका परंपरा* किंवा *टिका विवाह* असे म्हणतात. या पध्दतीने तडवी समाजात विवाह विधी पार पाडण्यात येत असे परंतु आता मात्र सदरची सांस्कृतिक सामाजिक प्राचीन परंपरा ही काळाच्या ओघात लुप्त पावत आहे. आजच्या काळात सदरच्या परंपरेचे पालन कोणीही करत नाही. काही ठिकाणी सदरची परंपरा चालू आहे.

१४. विवाह हा पुर्णत: मुलीच्या संमतीने पार पाडला जातो. तिने *कबूल* होकार दिल्यावरच हा विवाह परिपूर्ण व पूर्ण समजला जातो. शक्यतो मुली हया आपल्या आई-वडिलाची आज्ञा पाळीत असतात. कुलदान मुल्याचे, श्रध्दामुल्यांचे , कुलदेवतेचे आदर करतांना दिसतात.

१५. आदिवासी तडवी समाजामध्ये आता जनजागृतीस मोठया प्रमाणात सुरुवात झालेली आहे.स्वर्गिय रौनक तडवी साहेब यांचे प्रयत्नातून तसेच समाजकार्यात



हिरीरीने सहभाग घेणारे काही तडवी युवकांच्या मौलिक सहकार्याने *आदिवासी तडवी उन्नती मंडळ* स्थापन करुन १९८७ च्या सुमारास पहिला सामूहिक विवाह संपन्न झाला. गोरगरीब तडवी बांधवांकरता समाजसेवी तडवी बांधवाचे आपल्याच बांधवा करता करण्यात येणारे हे कार्य व त्यास मिळणारे शासनाचे सहकार्य व पाठबळ यामुळे सदरचे सामूहिक विवाह होवू लागलेले आहेत.तडवी युवकाचे आपल्या बांधवाकरता केलेले कार्य कौतुकास्पद कामगिरीमुळे हे सामूहिक विवाह पध्दत हळूहळू फोफावत असून सर्वदूर तिचा प्रचार व प्रसार होत आहे ही गोष्ट आनंदाची व स्वागतार्ह अशी आहे.

**तडवी विवाह प्रकार:-**

१. आते-मामे भावंडामधील विवाह

२. जीजा-साली विवाह

३. विनिमय विवाह *सटा-लोटा विवाह* पध्दत

४. संमती विवाह *अरेंज मॅरेज*

५. सहपलायन विवाह

६. अपहरण विवाह

७. परिक्षण विवाह

८. हटटागमन विवाह पध्दत *घरघुसी विवाह*

९. टिका विवाह

अशाप्रकारे आदिवासी भिल्ल संस्कृतीमध्ये इसपू.३०० ते १८०० च्या जवळपास व नंतर देखील भिल्ल संस्कृतीत नमुद विवाह प्रकार हे दिसून येत होते. यातील काही विवाह प्रकार हे *तडवी भिल्ल* संस्कृतीत देखील दिसून येतात.तडवी समाजात समाज मान्यता असलेले विवाह होतांना दिसतात.

**तडवी विवाह लोकनृत्य *साजोनी* :-**

सातपुडयातील तडवी भिल्ल समाजात विवाहाच्या वेळी बौध्द वांदयावर युवती हया आपल्या सखी बरोबर *साजोनी* लोकनृत्य करतांना दिसतात.नवरीला ज्या दिवशी हळद लावतात त्या दिवशी सदरचे नृत्य करतात.त्याचप्रमाणे गांवातून नवरदेवाची *बिददी* फिरविण्यांत येते तेव्हा गोल रिंगन करुन व बौध्द वादंयधारक मध्ये उभा राहून वांदय वाजवितो व युवती व महिला हया ताल व ठेका धरत साजोनी नृत्य करतांना दिसतात .तसेच काही वृध्द महिला देखील बौध्द वांदयावर ताल व ठेका घेत युवती व त्यांचे सखी बरोबर साजोनी लोकनृत्य करतांना दिसतात. तडवी लोकनृत्य साजोनी हे तडवी समाजाची विशेष नृत्य असून नागदिवाळीच्या वेळी गांवजत्रेत व भरघोस पीक आलेवर आदिवासी हा आनंदित उत्साहीत होवून तडवीच्या मुली हया सखी यांना सोबत घेवून सदरचे साजोनी लोकनृत्य करतांना दिसतात. त्याचप्रमाणे आखाजी अर्थात अक्षयतृतीयाच्या दिवशी देखील आंनदोत्सव युवक व युवती हया मोठया प्रमाणात साजरा करतात. त्यावेळेस झुलागीते झोपाळा वडाच्या झाडाला बांधून झोका घेत लोकगीते गातांना दिसतात तर काही मुली हया एकत्रीत पणे गोळा होवून रिंगन करुन साजोनी लोकनृत्य करतांना दिसतात. साजोनी नृत्य हे तडवीचे सामाजिक लोकनृत्य आहे.

**कारणमिंमासा :-**

१. व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण घालून समाजातील सर्व व्यक्तीच्या आचारणात एक प्रकारची अनुरुपता व शिस्त घडवून आणण्याचे काम मानवाने निर्माण केलेल्या सामाजिक संस्था करीत असतात. विवाह, कुटूंब,मालमत्ता,धर्म,न्याय, आदी लहान मोठया संस्थाचे व समूहांचे बंधन प्रत्येक व्यक्तीला मानावे लागते. या बंधनाच्या व शिस्तीच्या अनुरोधानेच व्यक्तीला वागावे लागते. बंधनबाहय किंवा नियमबाहय,कायदेबाहय, वर्तन करणारांचा बंदोबस्त करण्याचीही तरतूद ही प्रत्येक समाजात,समूहात असते. त्याचमुळे समाजातील व्यक्तीच्या वर्तनात सुसंगती,अनुरुपता व समानता दिसून येते.

२. आदिवासी समाजात व्यक्तीला आपला जोडीदार निवडतांना मुक्त स्वातंत्र्य दिले जात नाही. विवाहविषयक बाबतीतील व्यक्तीचा स्वैरपणा आदिवासी समाज सहन करीत नाही. व्यक्तीने कोणत्या वयात, कोणत्या समूहातील व्यक्तीशी



व कोणत्या पध्दतीने लग्न करावे, या विषयीची बंधने प्रचलित असल्याचे दिसून येते. व्यक्तीने केव्हा व कोणत्या समूहातील व्यक्तीशी विवाह करावा याविषयी आदिवासी समाज अधिकाधिक जागरुक असतो. कुटूंबातर्गत वैषयिक संबंध टाळण्यासाठी अंतर्गत व बहिर्गत विवाहविषयक नियमाचे पालन हे अत्यंक काटेकोरपणे केले जाते , इतके की,या नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्तीना शासन व दंडीत हा समुह करीत असतो एवध काटेकोरपणा वधू मिळविण्याच्या पध्दतीविषयी असत नाही. या पध्दतीत व्यक्तीच्या हातून शिथिलपणा जरी दिसून आला तरी त्याच्याकडे गंभीरपणाने कोणी पहात नाही. मात्र समाजाच्या नियमांच्या चौकटीत राहूनच वागावे ही अपेक्षा समूहाची दिसून येते.

३. आदिवासी तडवी भिल्ल विवाह हा धार्मिक संस्कार मानत नाहीत तर विवाह हा एक सामाजिक बंधन करार असतेच त्याचे मत असते. तेव्हा वधूसंपादनाच्या क्रियेमध्ये कोठेही विवाह विधीच्या धार्मिक क्रिया आढळून येत नाहीत. आदिवासी समाजातील वधूसंपादनाच्या विविध पध्दतीना समाजाची अनुमती घ्यावी लागते. वधू संपादनाची कोणतीही पध्दत असली तरी तिला समाजाची अनुमती अगदी आवश्यक असते. कारण आदिवासी समाजातील विवाह संबंधात केवळ वैयक्तीक हितसंबंधापेक्षा कौटूंबिक हितसंबंधच जास्त गुंतलेले असतात.आदिवासी लोक विवाह म्हणजे केवळ दोन स्त्री-पुरुषांचे मिलन असे न मानता दोन भिन्न कुटूंबाना एकत्र आणणारा तो दुवा आहे असे मानतात. त्यामुळेच वधूसंपादनाविषयक असणा-या पध्दतीत समाज व समूह हा जातीने लक्ष घालीत असतो.

४. अशाप्रकारे विवाह संस्थे मागे एक आदिवासी परंपरा आहे, विवाह झालेल्या जोडप्यांनी गुण्यागोविंदाने नांदावे व राहावे, समाजरित पाळावी व दोन खानदानाची व कुळाच्या नांवलौकीकास साजेलरुचेल असे वर्तन करावेत. इज्जत व इभ्रत राखावी तसेच या विवाह सोहाळा हा दोन गांवे,दोन कुळे,खानदान, कुलदैवता, एकत्र येतात.कोणत्याही अप्रिय वर्तनामुळे याला तळा जाता कामा नये. विवाहसंस्थेचे हे नाते अतूट राखले जावेत ही समाजाची प्रमुख मनोभूमिका व अपेक्षा असते. त्याचबरोबर विशिशष्ट कुळाची खानदानाची वंश परंपरा राखता यावी म्हणून संतती नियमनाबरोबर समाजाने घालून दिलेले सर्व नियमांचे पालन करावे व समाज चौकटीत राहावे. विवाह हा दोन व्यक्तीचा नसून दोन आत्म्याचा,जीवाचा असतो.दोन कुळे,दोन

खानदान, दोन गांवे व संपूर्ण आदिवासी संस्कृतीचा तो एक अनन्य मिलाफ असतो. याचे भान विवाह संस्थेचे बुजूर्गाकडून तसेच परिवारातील लहान मोठया सदस्यांकडून नववधूला तसेच नवरदेवाला करवून दिला जातो.

आदिवासी जमातीत जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीवर हे सांस्कृतिक संस्कार त्यांचेवर जन्मापासून तो जगत असतांना होतांना दिसतात. तसेच विवाह सोहळे व इतर सांस्कृतिक चलनवलनातील संस्कार हे होत असतात. व्यक्ती विवाह योग्य झालेवर तसेच तदनंतरही त्यांचेवर संस्कार हे कळत न कळत मौखिक व अलिखित परंपरेतून होतांना दिसतात.

५. आदिवासी तडवी समाजामध्ये एकाच कुळात विवाह करण्याची प्रथा नाही आहे. कारण समान कुळामध्ये रक्ताचे तसेच एकाच परिवाराचे खानदानाचा रिश्ता असतो म्हणून असल्या विवाह संबंधाना आजही विरोध आहे. विवाह करतांना वर व वधू ही विरुध्द कुळातील तसेच वेगवेगळया कुळातील असायला हवीत. उदा.सोयंके-बोरव्हाये, घटटे-भोलनकर, इत्यादी. एकाच कुळातील लोकांमध्ये सोयरीक संबंध आजपण होत नाहीत कारण समान कुळातील लोक हे एकाच कुळ पुरुषाचे वंशज असतात. विवाह करण्याला विरुध्द कुळातीलचव मुलगी ही पसंद करण्यांत येत असते, सदरची सांस्कृतिक परंपरा ही आजही पाळली जाते तिचे पालन हे आजही केले जाते.

**समारोपः**

आदिवासी समाजात विवाहसंस्थेचे अस्तित्व सार्वत्रिक स्वरुपात दिसून येत असते पण या विवाहसंस्थेचे स्वरुप इतर समाजातील विवाहसंस्थेला अगदी वेगळे आहे. विवाह ही वैयक्तीक बाब आहे, अशी आधुनिक विचारसरणी ही आदिवासी समाजाला मुळीच मान्य नाही. दोन व्यक्तीच्या मिलनापेक्षाही दोन कुटूंबाचे, दोन कुळाचे, दोन गांवाचे, संघटन हे अत्यंत महत्वाचे मानले जाते. विवाह हे सामाजिक बंधन आहे. यावर त्यांचा गाढ विश्वास आहे. विवाह संबंधात सुध्दा व्यक्ती म्हणून वधूवरांना महत्व आदिवासी समाजात नसते तर विशिष्ट कुटूंबाचे कुळाचे सदस्य म्हणून त्यांना महत्व दिले जाते. त्यामुळे रतिसुख आणि प्रेम या वैयक्तीक भावनेला विवाह बंधनात महत्व दिले जात नाही. तडवी, भिल्ल, इत्यादी जमातीत बहुपत्नीत्वाला



मान्यता आहे. परंतु प्राचीनकाळी तसेच आजही काही तडवी व भिल हे लग्नाच्या पहिल्या पत्नीसमवेत पूर्ण आयुष्य काधीत असतात. तडवी हे एकपत्नीत्व राहणेही पसंद करतात. राजपूत भाट हे तडवीच्या पहिल्या पत्नीचा उल्लेख हा महाराणी ,पटटराणी असे करतात व तिच्या संततीला राजपुत्र, राजपुत्री म्हणतात. दुस-या लग्नाच्या पत्नीचा उल्लेख भाट हे दासी असा करतात व तिच्या मुलांना दासीपुत्र म्हणतात. कुळाचाराप्रमाणे लिखित पुरावे हे आजही राजपूत भाटा जवळ उपलब्ध आहेत.

आज भारताला व जगाला सामाजिक एकोपा, एकता, सहिष्णूता, सर्वधर्मसम-भाव , धर्मनिरपेक्षता व मानवतेची नितांत गरज आहे. या सहस्त्रकात मानवतेचा सूर्योदय होईल असे संकेत आदिवासीच्या संस्कृतीतून भारतीय व जगातील युवकांनी घेवून विश्वबंधुत्वाचा विचाराने भारतीय समाजाची सेवा करावी व भारताला जगात महासत्ता बनविणेस खारीचा वाटा उचलण्यास पुधकार घ्यावा. हेच या शोधनिंबध लिहीणेचे फलित ठरावे , जगाला माणूसकी व प्रेम अर्पिला जाईल यात शंका नाही.

*******

प्रकरण ३

# तडवी विवाहातील *वधूमुल्य* देण्याची सामाजिक परंपरा व धारणा

तडवी भिल्ल हे भिल्लाचे वंशज आहेत. तडवी भिल्ल ,तडवी पठाण, तसेच भिल्ल ,मुंडा ही आदिवासी जमाती एक लध्वय्यी
जमात आहे.तशी इतिहासात नोंद दिसून येते. एक वेगळी आदिवासी संस्कृतीत जगणारी ही आदिम जमात आहे.एक स्वतंत्र सामाजिक जीवनसरणी व संस्कृती तडवी भिलाची दिसून येते.

भारतातील आदिवासी जमाती हया स्त्रीप्रधान व मातृसत्ताक परंपरा असलेली संस्कृती आहे पूर्णपणे आदिवासी समाजाची सर्वप्रकारचे हक्क व अधिकार हे तिचे जवळ परंपरेने संस्कृतीने दिलेले असते पुरुषांबरोबरच किंबहुना पुरुषा पेक्षा जास्त मेहनतीले कामे ती करतात नव्या पिधीला मार्गदर्शन करुन ते सस्कृतीतील रुधी,परंपरा, मौखिक सामाजिक निति नियमे व इतर बाबतीतील बारकावे हे प्रामुख्याने महिलांच करुन देत असतात आदिवासी विवाहात वधूमूल्य परंपरेला अनन्य साधारण



महत्व आहे वधूमुल्य ज्या युवतीला दिले जाते तो संपूर्ण स्त्री जातीचा सन्मान असतो गांवाचा मान असतो कुलदैवतेचा मान असतो त्या संपूर्ण सामाजिक संस्कृतीचा तो एकप्रकारे गौरव असतो वधूमुल्य देणेमागची सामाजिक धारणा कशी असते ते आपण नमुद प्रमाणे समजून घेवू या काही संशोधक व अभ्यासक हे आदिवासी संस्कृतीतील वधूमुल्य परंपरेत वधूला किंमत देणे विकत घेणे तसेच अनार्य,गीरीवासी,वनवासी असे आपले ग्रंथात सांगताना दिसतात ते साफ खोटे व दिशाभूल करणारे निष्पाप पापभिरु आदिवासीचे स्वार्थी बौध्दीकतेचे उपयोग करुन त्यांचा हक्क हिरावून घेणारे आहे हे अमानवीय व मानवता कलंकित करणारे आहे

वधूमुल्याबाबत आदिवासीची संस्कृतीतील बारकाईने त्यांचे अंतरमन जाणून घेवू या सातपुडयातील तडवी भिल्लांची वधुला मागणी घालतांना जो सांस्कृतिक परंपरा व त्यामागची प्रमुख धारणा म्हणजे वधूच्या ईच्छेप्रमाणे तिला देण्यात येणारे वधूमूल्य होय. वधूमूल्याची कारणमिमांसा येणे प्रमाणे आहेत.

१] तडवी भिल्लां मध्ये हिंन्दू संस्कृतीप्रमाणे विवाह करताना कन्यादानाची परंपरा तसेच *हुंडा* परंपरा नाही.

२] आदिवासी जमातीत तसेच तडवी भिल्लांमध्ये विवाह परंपरा हा एक सामाजिक करार आहे . तो नागरी संस्कृती प्रमाणे धार्मिक विधी किंवा संस्कार मानण्यात येत नाही.

३] नागरी संस्कृतीत विवाह हा दोन व्यक्ती , संतती प्राप्ती , वंशवाध , रतीसुख इत्यादी. गोष्टी व विचार अभिप्रेत आहे. परंतु आदिवासी व तडवी भिल्लांमध्ये तो एक कुळाचे दुस-या कूळाशी नाते जुळणे , वेगळा स्वतंत्र परिवार , खानदान, कूलदेवत कूलखानदानाशी गावांशी संबंध जोडण्यात येतो. व तो एक सामाजिक संस्कार मानण्यात येतो. सामाजिक मौखिक , अलिखित आदिम नितिनियम विवाह पालनासंबंधी असतात. त्याचे पालन सक्तीने करण्यात येते.

४] आदिवासी मध्ये व तडवी भिल्लांमध्ये वधूमूल्य देणे म्हणजे वधूची किंमत देणे नव्हे तर त्या कूळातील स्त्रीसत्वाला कूलदेवतेला वाहिलेले श्रध्दामूल्य देणे. अर्थात *कूलदान* देणे होय. या संस्कृतीक परंपरेनुसार मुलाचे कूल व मागणी घातलेल्या कूलाचे अनन्य साधारण सामाजिक संबंध

प्रस्थापित होत असते. कूलदान हे त्या स्त्रीचे कूलदेवतेला प्रथम दिलेले मान असतो. म्हणूनच आदिम जमातीत या संस्काराला एक संस्कृतीक श्रध्दा व आस्था आहे.

५] आदिवासी तडवी भिल्ल व एकंदरीत आदिवासी जमाती हे एक सामाजिक समूह आहेत. तडवी भिल्ल व त्यांचे उपशाखा नरधे तडवी व नहाल तडवी व पठाण तडवी यांचेतील विवाह संबंधीचे अलिखित नितिनियम आहेत. तडवी भिल्ल हे स्वत:ला नरध व नहाल तडवी पेक्षा श्रेष्ठ व खानदानी समजतात. त्यामुळे त्यांचेत विवाह संबंध होत नाहीत. परंतु आता ते होवू लागलेले आहेत. तडवी भिल्लांमध्ये कूळाचारा प्रमाणे विवाह होतात. एका कूळाला विरुध्द कूळातिल स्त्री ही सोयरीक संबंधाकरता असावयास पाहिजे. कूलदान देणे म्हणजे विरुध्द कूळातील कूलदेवतेला मूलाकडील कूलदेवतेकडून व सामाजिक परिवाराकडून दिलेला मान असतो.

६] तडवी भिल्लांत कूळाचार आहेत. प्रत्येक कूळाची वेगळी कूलदेवत आहे. एक कूळ वेगळे कूलदेवत, वेगळा खानदान, वेगळा परिवार, पुर्वंज इत्यादी संपूर्ण तडवी भिल्ल समाज हा एकच सामाजिक समूह आहे. परंतू विवाह संस्थेचे नितिनियम पाडतांना ते वेगळे व वैशिष्ट पूर्ण परंपरा, रितिरिवाजाप्रमाणे, रुधी प्रमाणे दिसतात. यूवतीला तिचे मर्जीप्रमाणे वधूमूल्य देणेत येते. अर्थात *मेहर* (इस्लामी) रिवाजा प्रमाणे म्हणता येईल. गांवकीनूसार प्रत्येक गांवाचा ठराविक वधूमूल्य असते. तेच यूवतीला सांगावे लागते.

७] अशाप्रकारे आदिवासी जमातीत मातृसत्ताक (स्त्रीप्रधान) संस्कृती असल्याने तिचा यथोचित मान, सन्मान राखणेकामी आदिवासीचे सांस्कृतिक परंपरा आहेत. स्त्रीला विवाहासाठी मागणी घालतांना तिचा अधिकार, हक्क, मान,सन्मानर्थ तिला श्रध्दामूल्य अर्थात तिच्या कूलदेवतेला दिलेले मान म्हणजेच कूलदान देणे होय. म्हणून काही संशोधक जे म्हणतात. की वधूमूल्य म्हणजे वधूला किंमत देणे होय. हे विधान साफ चूकीचे व खोटे आहे. वधूमूल्य हे त्या स्त्रीचे श्रध्दामूल्य व *कूलदान मूल्य* होय. जे तिच्या कूलदेवतेचे प्रतिकात्मक स्वरुपात दिलेले असते.



प्रकरण ४

# आदिवासी तडवी जमात : त्रिसंस्कृती जतन करणारी निधर्मी समाजजीवन

सातपुडयातील आदिम तडवी जमात व तिचे भावविश्व समजून घेणेकरता तिचे आचार विचार व निधर्मी समाज मन व तिच्या संस्कृतीचा परिचय करणे अगत्याचे आहे.

**आदिमांची धर्माची व्याख्या :**

आदिवासी जमाती हे प्रामुख्याने निसर्गपूजक आहेत. आदिमांमध्ये प्रेषिते, देवदूते, मॅसेजर जन्माला येवून त्यांचेकडून समाजमनाचे प्रबोधन व नितिनियम व सत्य असत्य व धर्मावर आधारलेली समाजव्यवस्था दिसून येत नाही.आदिमांकडेस प्रेषिता करवी कोणतेही धर्मग्रंथ दिलेली नसतात.उदा.हिंदू- गीता,इस्लाम -कुराण, ख्रिश्चन- बायबल,शिख गुरुग्रंथसाहिब इत्यादी आदिमाचा धर्म मानवता व जात ते

ज्या देशात राहतात तो देश उदा भारतात राहणारे आदिवासी हे .हिंदूस्थानी आहेत अमेरिकेत राहणारे अमेरिकन, आफ्रिकेत राहणारे आफ्रिकन आहेत इ, परंतु व्यक्ती एका विशिष्ट समूहाचा एक घटक असतो आणि तो या विशिष्ट समूहाने घालून दिलेले नियमान्वये धर्माचरण करत राहतो.त्याने केलेल्या आचारणामुळे समाजावर चांगले वाईट परिणाम हे होत असतात. त्याची धार्मिक परंपरा त्या विशिष्ट समूहाची परंपरा म्हणून लोकमान्यता पावत असते. आदिवासी समाज हा सृष्टीच्या कार्यकारण भावानुरुप कृती व ज्ञान संपादित करीत असतो. समूहात जीवन जगत राहून समाजाच्या परिघात तो जगत असतो अर्थात समूहमनाची संकेतरुपी समुच्चयता व समाजाचे ऐक्य भावनेत तो आचारण करीत राहतो व जगत राहतो.हाच त्याचा मुलमंत्र असतो. आदिमांचे या निधर्मि समाजाबददल काही संशोधकाचे मत असे आहेत. लोबो या संशोधकाने म्हटले आहे की,धर्म ही आयुष्याची अनुभवातीत भावना असून ज्याचे मध्ये मानवाव्यतिरिक्त एका निसर्गशक्तीचा विचार केला जातो.ज्याची प्रचिती ही मानवाना न समझणारी घटनेला पाहून व तो भयभीत तथा विस्मयकारक झाला तेव्हा निर्माण झाली व त्याचेत आली.

डॉ. मदन , डॉ. मजूमदार यांचे आदिम धर्माबाबत म्हणणे की , ✕धर्म ही एक अलौलिक शक्ती असून या शक्तीवर विश्वासाचा परिणाम अर्थात जी विशेष व्यवहाररिकताचे नितिनियम जे प्रस्थापित केलेले आहे , त्या अलौकिक शक्तीच्या या नियमांवर उपर्युक्त्त विश्वासाला धर्म म्हटले आहे ✕

आदिवासीचे जीवनमान है सामुदायिक जीवनावरील भावविश्वा नुसार श्राध्दानुसार चालत राहते. सगळया लोकांमध्ये रुधी ,परंपरा ,संकेताचे ,पालन , आस्था, समुदायिक तर्क-वितर्क या पध्दतीने आदिमाचे संपूर्ण जीवनचक्र चालत असून अलौकिक शक्तीच्या विषयाबाबत आदिवासीच्या मनात श्रध्दा ,भय ,आदर ,कुतूहल, तथा संभ्रम आदि कोमल भावभावना त्याचेत राहतात. आलौकिक शक्ती ही नैसर्गिक उल्लासावर अधिकार गाजवत राहते. त्याच प्रमाणे मानवीय जीवन आरोग्य ,संतति ,समृध्दी , याची प्राप्ती तथा इष्ट-अनिष्ट गोष्टी या तिच्याच कृपेवर अवंलबून राहतात. अशी आदिमाची धारणा आहे.

**आदिमांचे निर्धर्मिता व धर्माचरण:-** आदिवासी जीवनात अनेक देवतांना मान्यता आहे. ते निसर्गपूजक आहेत. सूर्य, चंद्र, नदया,झाडे, आकाश,



तारे,इत्याची ते मनोभावी पूजाअर्चना करतात, कारण या देवतामुळे त्यांचेवर कृपाछत्र लाभत असते व संपन्नता प्राप्त होते अशी धारणा आहे.ब्रम्हदेव,सफेददेव, हरादेव, निसर्गदेव, वाघोबादेव, या देवतांची मूर्ति ही मातीपासून बनलेली असते. या देवताचे डोकं हे बैलाच्या सिंगाप्रमाणे असून त्याचे तोंड बैलाप्रमाणे असतात. त्यांना गावाच्या सीमेवर स्थापन करतात. त्यामुळे गांवाचे रक्षण होते, अशी आदिमाची धारणा आहे.

आदिवासी लोकं खंडोबा, वाघदेवताची पूजा करतात. त्यामुळे गावाची साधनसामुग्रीची रक्षा होते. तसेच शेती, पीके,पाणी, रोगराई, पूर, इत्यादी निसर्गकोपाची रक्षा होते अशी त्याची समाजमान्यता आहे. पूजाअर्चना ही भोज्या , पेकना अर्थात ज्याच्या अंगात पिरोबाचा व देवांचा वारा येतो असा व्यक्ती, मार्फतीने पूजा ही केली जातात. हा भोज्या अर्थात पुजारी हा आदर्श, नैतिक व पवित्र असा असून तो आदिमाची दु:ख निवारणार्थ विविधवत अंमल करतो अशी आदिमाची धारणा व श्रध्दा आहे.

आदिम तडवी याची अशीही धारणा आहे की, निसर्गात अलौकिक शक्ती आहे. विश्वाचे सर्वप्रकारच्या घटना या शक्तीव्दारे व नियंत्रणातून घडतात, सगळया संकटाचे विमोचन या अदभूत शक्तीव्दारे होते.विश्वाचे या विशाल अनुभवातून सगळया धर्माचा विकास हा झालेला आहे. सूर्य, चंद्र, ग्रहण, ऋतू, क्रम, वनश्री, पशूवर्ग, भूकंप, अग्नीप्रकोप, पूर, महापूर, अतिवृष्टी, जन्म-मृत्यू, इत्यादीचा परिणाम हा मनुष्याच्या मनावर होतो. भय, विस्मय, उत्कंठा, जिज्ञासा, आनंद, शोक, इत्यादीचा उद्रेक मानवी अंत:करणा मध्ये या परिस्थितीतून होत असतो.तसेच ही आदिम तडवी जमात शुभ-अशुभ शकुनावर विश्वास ठेवणारी आहे.

तसेच या विश्वाच्या पुढे आजून एक अदृश्य विश्व आहे, अशी आदिमांची धारणा आहे. याच कारणास्तव आदिमाचे जीवनामध्ये धर्म आणि विश्व शक्तीची अलौकिकतेच्या स्वरुपांवर श्रध्दा आहे. आदिवासी तडवी यांची अनेक कुळे आहेत. ही कुळे नायकावरुन व गावांच्या नावांवरुन बनलेली असतात. समान कुळात सोयरीक ,लग्न धार्मिक चलनवलन होत नसतात. तसेच त्या त्या कुळांची कुळदेवताही वेगवेगळी असतात. उदा.बोरव्हाये या परिवाराची खानदानाची कुळदेवता ही भवानी माय असते तर सोयंके या परिवाराची खानदानाची कुळदेवता ही मनुदेवी ही आहे. लहान बालकाचे जाउळविधी तिच्या चरणी वाहातात. तसेच तेथे गोडभाताचे जेवन देतात. काही तडवी हे इस्लामी व काही हिंदू परंपरे नुसार सांस्कृतिक रिवाज व रितीभाती आहेत. परंतु

तडवी यानी आपली आदिवासी संस्कृती परंपरेचा त्याग मात्र केला नाही.ते आजही त्या प्रमाणे जगताना दिसतात.

**आदिवासी तडवींवर सूफीसंताचा प्रभावः-**

भारतातील आदिवासी यांचेवर अनेक सूफी संताचा प्रभाव दिसतो. त्यात प्रामुख्याने गरीबनवाज ख्वॉजा मुईनुददीन चिश्ती , इ.स.११४२-१२३६, यांचे नांव प्रामुख्याने घ्यावे लागेल. सातपुडयात विखुरलेले आदिवासीवर त्याचा प्रभाव होता. संपूर्ण भारतीय उपखंडात ज्याचा प्रभाव पडला असे ख्वॉजा मुईनुददीन चिश्ती इ.स.११४२ मध्ये संजर , पर्शिया, येथे जन्माले आले परंतु त्याची कर्मभूमी ही भारतात नावारुपाला आली.राजस्थानातील अजमेर येथे ख्वॉजा साहेबाचे वास्तव्य राहिले.भारतात इस्लामचा जो प्रसार झाला त्याचे सगळे श्रेय हे ख्वॉजा साहेबाना दिले जाते . लोकांनी *गरीब नवाज* ,*गरिबांवर विशेष कृपा करणारे*- ही उपाधी त्यांना दिली. त्यांनी मोठया प्रमाणावर केलेल्या धर्मप्रसाराने काही इतिहासकार त्यांचेवर नाराज असले तरी दर्ग्यांवर आजही मुसलमान पेक्षा मुस्लिमेत्तर अधिक येतात. ही मंडळी भारतातील विविध कोप-यातून येतात. पाकिस्तान,श्रीलंका येथनूही भाविक येतात व हजेरी लावतात. अजमेरला वास्तव्य असलेले ख्वॉजा साहेबांवर विशेष कृपाछत्र लाभलेले त्या परिसरातील भागातील आदिवासी भिल्ल,तडवी याचेवर त्याचा विशेष प्रभाव पडला. त्याचे सहिष्णूवादी व दयापूर्ण प्रबोधनातून ते इन्सांनियतची कैफियत मांडीत असत. त्यामुळे सातपुडयातील आदिवासीवर त्याचा प्रभाव पडून त्यानी इस्लामवर इमान आणून ते इमानी इस्लामी झालेत. सातपुडयातील ,खानदेशातील आदिवासी तडवी हे असेच इमानी इस्लामी झालेला समाज आहे. परंतु इस्लाम स्विकारला तरी तडवी यानी आदिवासी चालीरितील,रुधी परंपरा व संस्कृतीचा त्याग मात्र केलेला नाही. ते आजही २१ व्या शतकात गुंण्या गोविंदाने नांदत आहेत. अशाप्रकारे हिंदू,मुस्लीम व आदिवासी संस्कृती असा त्रिवणीसंगम त्यांचेत दिसून येवून सर्वधर्मसमभावनेचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवला आहे.

आदिवासी तडवी याचेबददल अधिक जाणून घेता असे दिसते की, *तडवी* बाटून मुसलमान झालेले *भिल्ल* असे महाराष्ट् शब्दकोशात , विभाग्र ४ पृष्ठ १४५६ वर म्हटले आहे. 'भिल्लाच्या मुख्य शाखेपासून फुटून *तड*म्हणजे दूर झाले. अशा लोकांना *तडवी* असे म्हणतात. तसेच जळगांव जिल्हयाच्या



गॅझेटियरच्या नोदीप्रमापणे सर्वच तडवी हे भिल्लांचे वंशज आहेत.औरंगजेबाने ,१६८५-१७०७, सातपुडयातील तडवीना वतने व इनामाचे प्रलोभन देवून इस्लाम धर्माकडे ओध्ण्याचा प्रयत्न झाला असावा परंतु शूर भिल्लाचे वंशज तडवी यानी औरंगजेबाच्या तलवारीच्या बळावर तसेच शूर,वीर,स्वाभिमानी तडवीनी मृत्यूच्या भितीने इस्लाम स्विकारला हे पटत नाही.कारण आपले शौर्याने भिल्ल,तडवी यांनी भारतातील अर्धापेक्षा जास्त भू-भाग आपले पराक्रामाने जिंकलेला होता. त्यांनी मराठें,राजपूत,मोगल,इंग्रज अशाना पराभूत केले होते. सुरुवातीस राजपूताशी त्याचे सलोख्याचे संबंध होते. राजपूत राजे जेव्हा विजयी होत तेव्हा ते विजयतिलक म्हणून भिल्लाचे अंगठयाचा रक्त माथ्याला लावीत असत. पुढे भिल्लाचे व तडवीचे वाध्ते साम्राज्य बघून राजपूत राजे त्याचे विरोधी झालेत त्याच प्रमाणे औरंगजेबाच्या जुलूम व जबरदस्तीने तडवीच्या पुर्वजानी इस्लाम स्विकारला आहे हे कोशाकाराचे म्हणणे उचित वाटत नाही.कारण ४४० वर्षापूवीच तडवीवर इस्लामचा सूफीसंतचा अर्थात गरीबनवॉज ख्वॉजा मुइनोददीन चिश्ती याचा शिकवणीचा तसेच त्यांच्या दयापूर्ण व सहिष्णूवादी सर्वधर्मसमभावपूर्ण समाज प्रबोधनात्मक विचारांचा प्रभाव हा दिसून येतो.त्यामुळे महाराष्ट शब्दकोशाकार याचे विधान चुकीचे आहे. तसेच सातपुडयातील आदिवासी भिल्ल, तडवीवर गरीबनवॉज ख्वॉजा मुईनुददीन चिश्ती ,निजामोददीन ओलीया, सैलानी बाबा, जंगली पीर बाबा, तसेच गुला महाराज या सूफीसंताचा शिकवणीचा प्रभाव हा मोठया प्रमाणात दिसून येतो.

**आदिवासी तडवी या जमातीचे अंत:रंगातील छटा व वैशिष्टयाची माहिती व आधवा :-**

१] तडवी ही भिल संस्कृतीतून उगम पावलेली व स्वत:चे एक स्वतंत्र आस्तित्व जपणारी अनुसूचित जमात आहे.

२] भारतामध्ये वारवार राष्ट्रीय अखंडतेचे व सामाजिक एकोपा आबाधीत राहावा म्हणून भारत सरकार कडून विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात तसेच आवाहन केले जाते. त्याच भारतातील तडवी ही एकमात्र अशी जमात आहे की ती हिन्दू,मुस्लिम व आदिवासी परंपरेचे पालन करुन व कोणतेही सामाजिक वादविवाद,मतभेद न करता सामाजिक एकोपाने जातीय सलोख्याने गुण्यागोविंदाने जगत आहे. जगासमोर राष्ट्रीय अखंडतेचे सामाजिक एकोपाचे याहून दुसरे कोणतेही

उदाहरण सापडणे हे मुश्कील आहे असेच नमुद करावसे वाटते. तडवीचे हे प्रमुख वैशिष्टे आहे.

३] तडवी समाजामध्ये समान कुळात लग्न सोयरीक होत नाहीत. कारण समान कुळे हे एकच पुर्वजापासून निर्माण झालेले वशंज असून त्यांचेत रक्ताचे नाते हे जोडण्यात येत असते ते ऐकमेकाचे भावबंद असतात म्हणूनच आदिवासी तडवी सांस्कृतिक जीवनात समान कुळात सोयरीक संबंधाना आजही विरोध दर्शविण्यात येत असतो म्हणून लग्न व सोयरीक ही विरुध्द कुळात करतात सदरची प्रथा ही आजही पाहावयास मिळते.

४] आदिवासी तडवी हे साखरपुडा तसेच लग्नाची तिथी व मुहूर्त तसेच कोणतेही शुभ कार्य करते वेळी ही जमात मंदिरात जावून भटजी कडून किंवा ब्राम्हणाकडून तिथी काध्याची प्राचीन परंपरा आजही या जमातीत पहावयास मिळते.

५] हिन्दू संस्कृतीनुसार *उपवास * धरण्याचा रितीरिवाज दिसून येतो परंतु त्याच बरोबर इस्लाम परंपरेनुसार * रोजा * धरण्याचा रितीरिवाज ही दिसून येत आहे.

६) आदिवासी तडवी हे हिन्दू व मुसलमान यांचेशी रोटी व्यवहार आहे.बेटी व्यवहार [ लग्न,साखरपुडा ,धार्मिक चलनवलन ] करत नाहीत.बेटी व्यवहार हा तडवी समाज आपलयाच जमातीतील कुळाचारा प्रमाणे करतात.

७] विवाह ही प्रथा आाादिवासी तडवी हे आपलया आदिवासी रितीरिवाजाप्रमाणे व परंपरेनुसार सुरुवातीस करतात व नंतर मग इस्लामी रिवाजानुसार निकाह विधिवंत परंपराचे पालन करण्यांत येवून सदरचा निकाह संमत हा करण्यात येतो.

८] कुळ देवता समोर मुलांचे जाऊळ काध्यात येतात. तदनंतर सुंता [खतना] विधी इस्लामी रिवाजाप्रमाणे करतात. सदर वेळी प्रसंगी शाकाहारी व मासांहारी जेवन देण्याची रितीरिवाज पध्दत आहे.

९] बाळ जन्माला आलयावर सटवी पूजनाचा व नामकरण विधी त्याच प्रमाणे गर्भवती स्त्रिचा ओटी भरण्याचा कार्यक्रम हा आदिवासी रिवाजाप्रमाणे विधीवत पध्दतीने केला जातो. सदर प्रसंगी आदिवासी गीते म्हटली जातात गायली जातात.



बाळंतिणीच्या झोळीमध्ये बालकाला टाकून त्याचे नामकरण व सटवीपूजन करुन दिर्घ आयुष्याची कामना करतात. या विधी मध्ये फक्त आदिवासी महिलांचाच सहभाग प्रामुख्याने असतो सटवी पूजनाचे गीत या प्रमाणे आहे.उदा.आदिवासी तडवी लोक गीत *सहादेव घ्या..महादेव दया..सहादेव घ्या..महादेव दया..*

१०) आदिवासी तडवीमध्ये मृत्यूनंतर दफनविधी इस्लामी रितीरिवाजाप्रमाणे करतात.

११] आदिवासी तडवी लोकांचे आहारात चटणी भाकर, ठेचा ,उडददाळ तसेच तिखट वरण, दाळ-चावल, तसेच शाकाहारी व काही प्रमाणात मासांहार देखील करतात.

१२] विशिष्ट सण,उत्सव,यात्रा, उरुस या दरम्यान काही तडवी समाजातील लोक उपवास धरतात. त्या दरम्यान ते अन्न वगैरे वर्ज्य करतात. तसेच काही पीरवलीच्या संदलमध्ये [सवारीत] आनंदाने भाग घेतात. या दिवशी मंदिरात भवानी मायची किंवा मनुदेवीची तसेच कुळ देवतांची ओटी भरतात. त्या दरम्यान खिर चपातीवर किंवा दही-भातावर ,गोळ भातावर दरुद फातिहॉ पध्वतात व ते सर्व जन वाटून मिळून मिसळून खतात.

१३] संपूर्ण तडवी समाजात *गोमांस खाणे निषिध्द * मानले गेलेले आहे. तडवीचे पुर्वजापासून सदरची परंपरा आहे. आदिवासी तडवी मध्ये गायीला गो माता म्हणून पूजनिय मानतात. तिचे दूध हे नवजात बाळाला पाजतात ते पाजलयाने बाळाला ईश्वरी शक्ती व आर्शिवाद लाभते असा देखील समज हा आदिवासी जमातीत प्रामुख्याने दिसतो मोठया प्रमाणात गो पालन करण्याचे काम हे आदिवासी करतात.अललाची गौ तसेच ईश्वराची गौ म्हणून तिचा उललेख करतात.

१४] तडवी समाजाचे उदारनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती व्यवसाय तसेच शेतमजूरी,सालदारकीपणा, मासेमारी, शिकार, डिंक गोळा करणे, पालापाचोडा विकणे तसेच लाकडाचे मोळया विकणे, केळीचे घड वाहणे, साखर कारखान्यात काम करणे, तसेच शासनाच्या विविध योजना अंतर्गत रोजगारभिमुख मेहनतीचे कामे करणे.

१५] तडवी समाज जीवन हे शिक्षणाचा प्रचार व प्रसार जोर धरु लागलेला आहे. भारत सरकारचे अनेक कलयाणकारी योजना हया आदिवासी करिता जारी

करण्यांत आलेने अनेक आदिवासी युवक व युवती साक्षर होवून प्रगती पथावर जात आहेत.विविध क्षेत्रात नावलौकिक कमवित आहे.उदा.संरक्षण दलात,पोलीस दलात तसेच शासकीय कार्यालयात व हवाईदलात भारताच्या कानाकोप-यात आज तडवी आदिवासी युवक व युवती शिक्षणाच्या जोरावर हळुहळू प्रगतीकरत आहे.

१६] आदिवासी तडवी जमातीला आपली स्वतंत्र अशी सांस्कृतिक ओळख आहे. सदरची ही ओळख त्याला प्राचीन सभ्यतेतून विरासत मध्ये मिळाली आहे.

१७] तडवी समाज हा संपूर्णपणे सातपुडा व सातमाळ परिसरात तसेच भारतभर विखुरलेला आहे. आपलया योगदानातून व परिश्रमातून तो विश्व काबीज करण्याचा प्रयत्नात आहे. अंधारातून उजेडाकडेचा हा प्रवास तडवीना नवनवी क्षितिजे काबीज करुन नवी आव्हाने समर्थपणे पैलून नावलौकिकात भर घालून भारताच्या गौरवात महत्वाचा वाटेकरी बनत आहे व आपले योगदान हे राष्ट्र उभारणीस देत आहे.

१८] तडवी समाजाला आपली एक स्वतंत्र अशी बोली भाषा आहे. तिला * तडवी * बोली भाषा या नावाने ती सुपरिचित आहे. या भाषेचा एक विशिष्ट अशी लय,गयता व बोलण्याचा ग्रामीण ठेका व लहेजा आहे तसेच या आदिवासी भाषेवर अनेक भाषेचा प्रभाव हा दिसून येतो त्यांत मुंडा, तमिळ, कानडी, तोडा, नेमाडी, अरबी इ.भाषाचा प्रभाव हा दिसून येतो तसेच एक बोलण्याचा आदिवासी गोडवा या भाषेतून प्रकट होताना दिसतो. पिध्यांपिध्या चालत आलेलया या * तडवी * भाषेच्या अंतरगात डोकावून बघितलयास आपणास तडवी समाजजीवनाचे अनेक पैलू उघड होताना दिसतात तडवी समाज जीवनाचा ही भाषा आरसा आहे.ओळख आहे. यात शंका नाही.

१९] तडवी समाजात स्त्रियांना अतिशय आदराचे स्थान आहे. संपूर्ण आदिवासी जमातीत स्त्रि स्वातंत्र्याला मुभा आहे. या जमातीत पुरुष प्रधानता ही दिसून येत नाही. पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना पुरुषा पेक्षा जास्त कष्टाची कामे ही स्त्रिया करतात. कुटूंब सांभाळतात. समाजरित पाळतात तसेच इतर अनेक कर्तव्ये व जबाबदा-या त्या पार पाडीत असतात. अकंठ कष्टात असूनही तूसभरही फावला वेळ न मिळूनही ती कधीही उदास,दु:खी,कष्टी नसतात. प्रत्येक क्षण ते हसत खेळत व्यतीत करुन जीवन जगतात व दुस-यांना जीवन जगण्याची प्रेरणा देतात यात शंका



नाही. कुटूंबातील ज्येष्ठ महिले जवळ सगळा पैसा व्यवहार हा असतो. ती कुटूंबाचे गरजा पुरे करते. परंतु आजच्या काळात व परिस्थितीमध्ये व धगधगीच्या जीवनात मात्र बदल होतांना दिसतो. एकत्र कुटूंब व्यवस्था क्षिण होत आहे. परिवारातील नवीन पिधि वेगवेगळे आचार विचार घेवून वेगवेगळे त-हेने वागतांना दिसतात. तसेच वेगवेगळे बिधर व संसार करतांना दिसतात हे देखील नमुद करावयास वाटते.

२०] आदिवासी तडवी समाजजीवनात वाड्.मयीन साहित्य हे मोठया प्रमाणात असलयाचे दिसते. परंतु हे मौलिक साहित्य मौखिक स्वरुपात आहे. ब-याच आदिवासी जमातीतील हे मौलिक साहित्य मौखिक स्वरुपात आहे. आदिवासीची ही मौखिक साहित्य परंपरा तिचे अंतरंगातील नाना छटा,वैशिष्टे, मानवीय दृष्टीकोन प्रकट करण्याचे साधन असून हे एक मौलिक दस्ताऐवज आहे यात शंका नाही. विविध प्रसंगी गायली जाणारी गाणी,पोशाख,परिधान केलेले नानात-हेचे मुखवटे व समाजजीवनातील प्रचलित उखाणे,म्हणी,वाक्यप्रचार,लोककथा, लोककिस्से, जन्माची गाणी, लग्नाची गाणी, भरघोस पीके आलेवरची नैसर्गिक गाणी इत्यादी अनेक बाबीचा व अंगाचा सखोल अभ्यास केलयाअंती आदिवासीचे जीवनावर प्रकाश पडतो. तसेच ते सांस्कृतिकदृष्टया कसे संपन्न आहेत हे आपणास जगासमोर पुराव्यानिशी सिध्द करता येते असे मला वाटते.

सातपुडयाच्या पायथ्याशी हि-या मोतीच्या खाणी आहेत ते गोळा करण्याचे काम आजच्या नवीन पिधीने करावेत. असे मला मनस्वी वाटते. हे हि-यांचे व मोत्याच्या साहित्य लिपीबध्द होणे तसेच या आदिवासी बोलीभाषा हया लिपीबध्द होणे ही काळाची गरज आहे. भारतीय संस्कृती व आदिवासी संस्कृती जपण्याचे ते एक मौलीक काम आहे.हे आपले नैतिक कर्तव्य आहे. या मौलिक दस्ताऐवजांचे जतन,संवर्धन झाले पाहिजेत. त्याचप्रमाणे आादिवासी साहित्य जे सातपुडा व सातमाळाच्या परिसरात त्याचप्रमाणे देशातील काही भागात विखुरलेलया आहेत.ते गोळा करुन लिपीबध्द करुन हा दस्ताऐवजी खजिना जगासमोर आणून भारतीय संस्कृतीत मोलाची भर यामुळे नक्कीच पडेल तसेच आदिवासी संस्कृतिचे जे विविध पैलू आहेत त्याची देखील ओळख संपूर्ण जगाला होईल. यात शंका नाही.

२१] तडवी समाजामध्ये विशिष्ट प्रकारची घरांची रचना केलेली असते.शेतालगत घरे असतात त्यांना झप्परा असे म्हणतात.पुरुष हे पूर्वी फेटा व

धोती वापरत आता शर्ट व पायजमा तसेच पांध्री गांधी टोपी घालतात तसेच स्त्रिया हया नववारी लुगडे,गोलसाडी वापरतात. तसेच मुली या चोळी व परकर वापरतात. तसेच काही मुली हया पंजाबी ड्रेस व साडी घालतात तसेच नवीन पिधीतील युवक हे शर्ट-पॅन्ट घालतात. स्त्रिया हे विविध दागिने वापरतात कानात नाकात तसेच दंडावर ,कमरेवर त्याच प्रमाणे मनगटा मध्ये चांदीचे किंवा सोन्याचे आभूषणे घालण्याचा रिवाज आहे बहुतांशी करुन आदिवासी स्त्रिया व पुरुष हे चांदीचे आभूषणे वापरतात.

२२] तडवी समाज हा शुभ व अशुभ शकुनावर विशवास ठेवणारा आहे. अंधश्रध्दांचे प्रमाण हे मोठया प्रमाणात आहे.

२३] तडवी समाजामध्ये बहुविवाह पध्दत दिसून येते. लग्नाची बायको असतांनाही दुसरी स्त्रि बायको म्हणून घरात आणण्याची पध्दत बहुतेक दिसते. प्रमाण मात्र सर्वत्र नाही.

२४] तडवी समाजाचे प्रमुख वैशिष्टे पैकी महत्वाचे वैशिष्टे म्हणजे तडवी ही जमात हिंदू व इस्लाम धर्माचे प्रत्येक सण,उत्सव,उरुस,संदल यात मोठया प्रमाणात सहभाग घेतात. उदा.दिवाळी,दसरा,आखाजी,होळी,पोळा, रक्षाबंधन तसेच ईद,बकरी ईद,मोहर्रम,त्याचप्रमाणे नागदिवाळीच्या काळातील येणारे पीरवलीचे संदलात भाग घेतात त्या दरम्यान गांवयात्रेला महत्व असून खेडयापाडयात यात्रा उत्सव हा मोठया प्रमाणात आदिवासी बांधव हे साजरे करीत असतात. सदर दिवशी गोड अन्न व मांसाहारी पदार्थ तयार करुन खातात.

२५] आदिवासी तडवी समाजातील पुरुष हे आक्रमक स्वभावाचे तसेच रागीट वर्तनाचे असतात त्याच प्रमाणे ते अतिशय कष्टाळू,मेहनती सुध्दा असतात तसेच ते पापभिरु आहेत.

२६] रात्री तडवी राखणदार [सोक-या,ठेग्या,जागलया ] हा मालकाची शेतांची राखण करतात.चोरापासून तसेच पीकचोरी पासून संरक्षण करतात. या ठेग्यागिरी करणारे राखणदाराजवळ एक लालटेन व एक मजबूत लाकडी दांडा असतो.तडवी समाजामध्य पापभिरुपणा जरी दिसून येतो तरी भित्रेपणा,पळपुटेपणा हा दिसून येत नाही. परंतु सदरची जमात ही पिध्यांपिध्या गरीबीत पिचलेली व वाध्लेली असलेने परिस्थितीशी नेहमी जुळवून घेणारी तसेच दयावान अशी जमात आहे.



२७] आदिवासी तडवीचे मुले-मुली हे सरकारी अनुदानावर तसेच आश्रमशाळेत मोठया प्रमाणात शिक्षण घेवून साक्षर होत आहेत. तसेच उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करीत आहे.

२८] तडवीचे प्रमुख वैशिष्टे म्हणजे इस्लामीरिवाजाप्रमाणे *तलाक* पध्दत या समाजात म्हणजेच घटस्फोट देण्याचा रिवाज या समाजात पूर्वी नव्हता त्याच प्रमाणे हा रिवाज समाजाला मान्य नव्हता.परंतु आता जातपंचायतीत बसून बुजुर्ग लोक हे *तलाक* रिवाज पुण करतात. आजच्या काळात तडवी लोक हे कोर्टात देखील दाद मागतात व तलाक मिळवून घेतात.तसेच प्राचीन काळी *बारकरी परंपरा* होती. या परेपरेनुसार १२ गांवाचे भांडण, तंटे,बखेडे हे बारा गांवाचा बारकरी सोडवत असे या जातपंचायतीवर बारा गांवाची जबाबदारी सोपविलेली होती. अडगांव व यावल हे बारकरीचे प्रमुख ठिकाण होते. याना फार मान व आदर असे त्याचे पालन सर्व जनता मुकाटयाने करन समाजरित पाळीत असत.

२९] तडवी समाजामध्ये सांकेतिक तडवी बोली भाषा देखील बोलली जाते.या सांकेतिक भाषेला * जंगली तडवी* भाषा म्हणतात. सदरहू भाषेचा उपयोग हा संकटसमयी,विशिष्टवेळी व काळात उपयोगात आणली जाते. बहुतेक करुन आदिवासी जमातीनी सदरची गुप्त बोली भाषा ही आपलया सांस्कृतिक चलनवलनाकरिता व रक्षणाकरिता आजतागायत गुप्त ठेवण्यात आलेली आहे.

३०] विवाह झालयावर लागलीच वर-वधू यांना जोडप्यांनी कुलदेवीचे किंवा पिरोबाचे दर्शना करता घेवून जाण्याची परंपरा तडवी जमातीत दिसून येते.या रिवाजाला *कोरं जोडपं सवरणे* चरण स्पर्शाकरिता नेण्याची परंपरा कुळाचाराप्रमाणे दिसून येते.

३१] आदिवासी तडवी यांचे धार्मिक व सामाजिक शोषण होवू नये, निष्पाप व पापभिरु या आदिवासी जमांतीतील बांधवाचे कलयाण करिता त्याचप्रमाणे जीवनमानात प्रगतीकरिता शासनाने अनेक क्रांतिकारी योजना हया नव्याने लागू केलेलया दिसतात. त्याचे चांगले परिणाम दिसून येत असून त्याचा फायदा हा आदिवासी बांधव हे घेतांना दिसतात.

३२] आदिवासी तडवी जमातीतील लोकांची नांवे ही हिंदू-मुस्लीम अशी मिश्रीत स्वरुपाची आध्ळून येतात.

३३] आदिवासी तडवी हे कुटूंबवत्सल आहेत. आपले संतांनावर त्यांचे प्रेम हे विलक्षण दिसते. तलाक,घटस्फोट झालेवरही ते आपले आपत्यांना वा-यावर सोडत नाहीत त्याचा त्याग करत नाही किंबहुना त्यांना प्रेम व आपुलकी त्याचप्रमाणे मायेची सावली देवून सर्व कर्तव्य लग्न,शिक्षण वगैरे पार पाडतात. परंतु आजच्या नव्या पिधीत कर्तव्यबुध्दीचा अभाव जाणवतो.

३४] आदिवासी तडवी हे पिर-वलीना मानणारा समाज आहे. एकदा तरी जीवनात ख्वॉजा गरिब नवॉज [ अजमेर,राजस्थान ] येथे जावून दर्शन घेवून पावन व्हावे त्याचप्रमाणे जीवनात एकदा तरी मक्का-मदिनेची पवित्रस्थळी यात्रा करुन यावे व * हाजी *बनून उर्वरित जीवन सफल करावे ही प्रत्येकाची ईच्छा असलयाचे दिसून येते.

३५] आदिवासी स्त्रिया हया मोठया प्रमाणात भवानी माय, तसेच मनुदेवीच्या यात्रेत सहभाग घेतात. तिची ओटी भरतात. जागरण करतात तसेच श्रीफळ चध्वून लहान मुलांना तिच्या चरणी ठेवूनी आशिर्वाद घेतांना दिसतात. सदरची ही परंपरा अतिशय प्राचीन आहे.

३६] आदिवासी तडवी जमातीत बहुतेक लोकांचे व परिवाराचे घरी देवी देवतांचे टाक-ठाणे असतात त्याच प्रमाणे पीरोबांचे ठाणे, देखील आध्ळून येतात. तसेच सवारी देखील पीरोबाच्या ठाणे जवळ ठेवलेली असतात.

३७] हिंदू-मुस्लीम व आदिवासी संस्कृतीचे पालन करणारी तडवी ही भारतातील व जगातील एकमेव आदिवासी जमात आहे.

३८] भारतीय संस्कृतीचे प्रमुख वैशिष्टये जपणारी,वैशिष्टेपुर्ण समाजरित ,जीवनसरणी असणारी व विश्वबंधुत्वाचा क्रांतीकारी नारा बुलंद करणारी व भारतीयांना जातीय सलोखा आबाधीत ठेवण्याची व राष्ट्रीय अखंडतेचा संदेश आपले आचारणातून प्रकट करणारी तडवी ही आदिवासी जमात आहे. ही जगातील एकमेव महामानवांची जमात असावी असे मला वाटते. सामाजीक एकोपाचे दर्शन घडवून एक वैश्विक आदर्शवादाचा पायांडा हा या जमातीने रचला आहे. हे या जमातीचे जीवनसरणीतून प्रामुख्याने दिसून येते.तसेच सर्वच आदिवासी जीवनसरणीतून हाच संदेश जगाला अर्पीला जातो.



प्रकरण ५

# आदिवासी म्हणजे कोण. तडवी कोण.व्याख्या

**२] तडवी समाजाची व्यप्ती व प्रकार**
**३] कुळ परंपरा**
**४] कुळ देवता**
**५] विवाह व मूहूर्त**
**६]विवाह पध्दत व प्रमुख वैशिष्टे**
**७] विवाह संस्थेचे स्वरुप व प्रकार**

[ आदिवासी म्हणजे कोण.तडवी म्हणजे कोण. तडवी समाजजीवनाची व्यप्ती व प्रकार एक विवेंचन ]

आदिवासी या शब्दाची व्याख्या करतांना मानववंशशास्त्रज्ञ डब्लयूजे.पेरी म्हणतात की,समान बोलीभाषा बोलणा-या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणा-या समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात.तसेच माझ्या मताप्रमाणे *आदिवासी समाज हा समान बोलीभाषा बोलणा-या व विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करुन राहणा-या व एकाच पुर्वजापासून जन्मलेलया रक्तसंबंध असलेलया सामाजिक समुहाला आदिवासी समाज तसेच आदिवासी असे म्हणतात.*

डॉ.रिव्हर्स म्हणतात की, ज्या समुहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरे सारख्या उददीष्टपुर्ती करता एक होवून झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात.आदिवासी हे या पृथ्वीवरील प्रथम मानवगण आहेत.या पृथ्वीचे पहिले नागरिक हे आदिवासी समाज आहे.ते या धरतीचे मुळ निवासी म्हणजे हे आदिवासी आहेत.

सातपुडा किंवा जळगांव जिलहापुरता विचार केलयास आदिवासी भिललांचे सपाट प्रदेशात राहणारे,डोंगराळ प्रदेशात राहणारे, आणि अन्यत्र राहणारे मिश्र असे तीन प्रकार आहेत.सपाट प्रदेशात राहणा-यां भिललांना फक्त भिलल असेच म्हणतात ते डोंगराळ व मिश्र भिललांपेक्षा सुधारलेले आहेत. डोंगराळ भिललांमध्ये बर्डा,धानका,धोरेपी,गावीत,खोतील,मठवाडी,किंवा पाणारी, मावची, पावरा, नहाल,डांगची,आणि वारली यांचा समावेष होतो. डांगची भिलल खानदेशात नाहीत. पावरा हे भिललापेक्षा थोडे वेगळे आहेत. ब्रिटिशांनी पावरा आणि डांगची या जमातीचाही डोंगराळ भिललांमध्ये समावेष केलेला होता.मिश्र जातीतील भिलाला ही अर्धवट भिलल व अर्धवट राजपूत किंवा कुणबी जात असून ती प्रामुख्याने रावेर तालुक्यात आध्ळते.तडवी, नरध्े तडवी,नहाल तडवी, या अर्धवट हिन्दू भिलल, तसेच अर्धवट मुस्लीम अशा जाती आहेत.तडवी व नहाल तडवी हे सातपुडयाच्या पायथ्याशी तर नरध्े तडवी सातमाळात आध्ळतात.भिललांमध्ये काही हिन्दू धर्म सांगणारे तर काही चेतनवादी आहेत. भिलल संस्कृतीतून आपली वेगळी ओळख निर्माण करणा-या अनेक भिलल पोट जमातीचे उपासना संस्कार स्विकारले असले तरी देखील त्यानी आपली मुळ संस्कृती भिलल संस्कृतीचे आचार विचाराचे तसेच रितीरिवाजाचे त्याग मात्र केलेला नाही वेगळी उपासना रिवाज स्विकारुनही कसे जगता येते याचे उत्तम उदाहरण हे आदिवासी तडवी यांनी स्वत:चे आचारणातून जगाला दाखवून दिलेले आहेत. या उपासनारिवाजाबाबत व पध्दतीबाबत विव्दानानी अनेक वेळा बहुमोल मार्गदर्शन केलेले आहेतच.या विव्दानापैकी डॉ.प्रा.प्रभाकर मांडे सराचा उललेख आवर्जून करावा लागेल.[ जळगांव जिलहा गॅझेटिअर पान नं.२०४-२०५ पॅरा दोन ]

आदिवासी भिलल ही प्राचीन जमात असून गुजरात,राजस्थान,मध्यप्रदेश इत्यादी राज्यांमध्ये देखील या जमातीचे वास्तव्य आध्ळून येते.एक अत्यंत शूर व



कष्टाळू जमात म्हणून भारतीय इतिहासात तिची नोंद आहे.भिलल कोण.या विषयी भारतीय संस्कृती कोषात नमुद केले आहे की, विललू किंवा बिललू या शब्दाच्या पुष्कळ द्रविळी भाषेत *धनुष्य* असा अर्थ होतो व धनुष्य हे अजूनही भिललांचे प्रमुख शस्त्र आहे.बिललूवर या शब्दाचेच अपभ्रष्ट रुप भिलल होय. भिललांच्या काही पोट जमाती आहेत.या पोट जमातीमध्येही श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच्च, अशा स्वरुपाच्या देखील उपपोट जमाती देखील आध्ळतात. या जमातीमध्ये त्या त्या जमाती-पोटजमाती नुसार रोटी - बेटीव्यवहार व इतर सामाजिक , धार्मिक चलनवलन होत असते.भिललांच्या पोट जमाती येणे प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १] गरासिया भिलल | २] धेली भिलल |
| ३] डुंगरी भिलल | ४] नेवासी भिलल |
| **५] तडवी भिलल** | ६] रावळ भिलल |
| ७] पावरी भिलल | ८] मिना भिलल |
| ९] भिलाला | |

**तडवी जमातीचे भौगोलिक वास्तव्य:-**

तमिळ प्रदेशात प्राचीनकाळी बिललूवर तसेच मिनावर नामक दोन जमाती राहत होत्या.नंतर कालांतराने या दोन्ही जमाती भारतभर पसरलयात.राजस्थान व गुजरात या भागात अजूनही हे लोक मोठया संख्येने दिसतात.तेथे त्यांना भिलल व मिन अशी नांवे मिळालेली आहेत.राजस्थान प्रातांत उदयपूर,डुंगरपूर व बासवाडा या जिलहयात बहुसंख्येने तर कोटाश,चितोडगध,सिरोही,भिलवाडा,जालोर,बाडमेर, या जिलहयांमध्ये ब-यापैंकी संख्येने भिलल समाज आहे.

**तडवी जमातीची जनसंख्या:-**

राजस्थानत एकूण जिलहयापैकी सरासरी १०,००० पेक्षा जास्त *आदिवासी भिलल* संख्या असलेले १५ जिलहे आहेत. तर राज्याच्या आदिवासी जनसंख्येच्या १९८१ च्या जनगणनेनुसार ४४.०१ टक्के भिलल होते. भिलल संस्कृतीतून निर्माण झालेले तडवी भिललाचे पुर्वज हे याच भागातील डोंगरद-यात राहत होते. या भागातील राजे महाराजे यांना त्यानी मदत केली.उदा सम्राट महाराणा प्रतापसिंह ज्यावेळी जंगलात आश्रयास असतांना त्यांना भरीव असे सहकार्य हे तडवी भिलल व इतर भिलल पोटजमातीने पुर्वपार राजपूत व भिललाचे संबंधाच्या कारणावरुन

व थोर पुर्वजांच्या बलिदानातून प्रेरणा घेवून *आदिवासी भिलल* यांनी महाराणा प्रतापसिंहजी यांना त्यांचे अडचणीच्या काळात सहकार्य केले व त्यांचे सुरक्षिततेची काळजी घेतली हे काही नव्याने सांगायला नको आहे.

तसेच महाराष्ट्रात भिलल समाज धुळे,नंदूरबार,जळगांव,नाशिक,बुलधणा, अकोला,औरंगाबाद,जालना या जिलहयांत आहेत.परंतु धुळे,नंदूरबार तसेच जळगांव या जिलहयामध्ये आदिवासी भिलल अधिक संख्येने वास्तव्यास आहेत.

तडवी कोण यांचे उत्तर म्हणजे तडवी बाटुन मुसलमान झालेले भिलल असे महाराष्ट्र शब्दकोषात कोषरचनाकाराने म्हटलेले आहे. भिललाच्या मुख्य शाखेपासुन फुटून तड म्हणजे दूर झाले अशा लोकांना *तडवी* असे म्हटले जातात. तसेच तलवार व धनुष्यबाण चालविणारे लोकांनाही *तडवी* म्हणतात. तसेच तात्कालीन मध्य भारतातील भिललांच्या प्रमुखास *तडवी* म्हणण्यात येत असत.त्याचे अनुयायी त्या प्रमुखावर पुर्ण विश्वासून त्यांच्या आज्ञा पाळत *तरबी*असे अरबी भाषेत शब्द असून त्याचा अर्थ मार्गदर्शक वा वाटाळया असा आहे. जंगल,डोंगरखो-याचे रस्ते दाखविणारे व हिस्त्र प्राण्यांपासून रक्षण करणा-यांना देखील * तडवी * असे म्हणले जातात. त्याचप्रमाणे आपलया गांवांची तसेच पाडयाची संरक्षणाची बाजू सांभाळणारे तसेच तटरक्षक दलाच्या सैन्यातील शिपाई व सरदारांना * तडवी * म्हणून ओळखले जात असत. युध्दांत शत्रू पक्षावर घाणाघती प्रथम हलला करुन युध्दभूमित तांडव करणा-यांना शूर सरदारांना देखील तडवी म्हणण्यात येत होते.

आदिवासी भिलल हे महादेवास आपले प्रमुख दैवत तसेच पार्व्रतीस भिललीन माता म्हणून मानत असत याचा उललेख वर केलेलाच आहे त्याचे पुरावे हे भारतीय पुराणात सापडतात.*तांडव* हा शंकराचा रौद्र अवतार होता. आजही आदिवासी तडवी भिलल हे बाळ जनमानंतर ५ व्या दिवशी नवजात बाळात झोळीत टाकतात तसेच सात सवासीन हे दगडी वरवंटा व इतर वस्तूनी पूजा करत खाली नमुद लोकगीत म्हणतात.

*झुला बांधला व माय..सटवी माय..
सहादेव लया..
महादेव दया..



झुला बांधला व माय..

असे लोकगीत म्हणत ७ वेळा तो वरंवटा झोळीवर खालून वर ऐकमेकीच्या हातात देतात. सदरचे लोकगीत हे ७ वेळा म्हणतात.या लोकगीताव्दारे शूर पूर्वज्यांची मानधरणी करुन कुळदेवतेला आवाहन केले जाते तसेच महादेवा सारखा शूरविर सुपूत्र लाभो त्यांचे नसानसात अंगाअंगात दैवीशक्ती प्रवेश करो अशी प्रार्थना करतात. सदरचा हा सोहळा खाजगी रुपाने फक्त स्त्रियाचा सहभाग असतो या सोहळयात पुरुषांना तसेच मुलांना बंदी असते. शेवटी हा विधी झालयावर बाळंतिणीचे व उपस्थित सवासीन बायांचे तोंड गोड करण्यात येतात. अशा प्रकारे हा सोहळयाचा सोपास्कार संपतो. * तडवी * हा नुसता शब्द नसून तो पारंपारांगत जिवनसरणी व आदिवासी भिललाची ती एक ओळख आहे अशा प्रकारे युध्दात प्राक्रम गाजविणारे व महादेवा सारखे प्रताप तांडव करणारे शूर सरदारांना * तडवी * म्हणून ओळखण्यात येते.असे म्हटलयास वावगे ठरणार नाही.

एकंदर लोकवाङ्.मय तसेच लोकगीताचा अभ्यास केलास आदिवासीच्या जीवनसरणीवर प्रकाशझोत पडतो. या गोष्टीकडे भारतीय इतिहासकारांनी व संशोधकांनी दुर्लक्ष केले व म्हणावे तेवधे पुरावे उपलब्ध असतांना नोद घेतलेली नाही हे ही दुदैव्य म्हणावे लागेल. या लोकवाडमयात व लोकगीतातून अनेक प्रशनाची उकल होते परंतु ती पहाणेची निरागस वृत्ती व निस्वार्थ भावना असावयास पाहिजे ती भावना इतिहासकारानी व अभ्यासकांनी दाखविलेली नाही.

या लोकगीतातून भारतीय स्वातंत्र्य लध्यात योगदान दिलेले शहीदाचा गौरवगाथा आजही गायली जातात. तसेच आदिवासी सूफी संत,सुधारक, तसेच महान व्यक्तीची गौरवगाथाही या लोकवाडमयातून व लोकगीतातून दिसून येतात.संपूर्ण आदिवासी लोकवाडमय व लोकगीताचा खजिना हा मौखिक स्वरुपात असून तो हजारो काळापासून एक पिधिपासून दुस-या पिधि कडे हस्तांस्तरीत होत असतो. आदिवासीची ती एक मौलिक ओळख आहे. हा मौलिक खजिना लिपीबध्द होणे व संशोधकाना व अभ्यासकांना त्यादिशेने प्रेरीत करणे ही नितांत काळाची गरज अ ाहे. यातून संपूर्ण भारतीय समाजात एकोपा वृध्दीगत होवून सामाजिक दृष्टीने भारताला एकसंघ व मजबूत व एकजुट करणेकामी एक मोठे पाउल ठरेल. तसेच जगाला भारतीय संस्कृतीचे अनेक पैलू व हा शब्दरुपी लोकगीताचा व लोकवाडमयाचा

प्राचीन खजिना अनुभवता येईल व भविष्यात यातून एक मानवतावादी विचारसरणीवर विशवास ठेवणारी नवीन भारतीय पिधी उदयास येईल तसेच शैक्षणिक विभागात तसेच तळागळातील विदयार्थाना इतिहासात व इतर प्रकारे ज्यात शेकडे मानवतावादी व धर्मनिरपेक्ष उदाहरण भरलेले आहे त्याचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे लहान मुलापासून ते मोठया युवकापर्यत हे धर्मनिरपेक्ष मिशन तसेच सामाजिक एकोपा मिशन मोठया प्रमाणात राबविले जावेत त्यामुळे भविष्यात यांचे चांगला फायदा भारताला होईल. यात तिळमात्र शंका मला वाटत नाही.

जळगांव जिलहयातील गॅझेटिअर मधील नोंदीप्रमाणे सर्वच तडवी हे भिललांचे वंशज आहेत.औरंगजेबाने सन १६८५-१७०७ मध्ये सातपुडयातील भिललांना इस्लाम धर्म स्विकारण्यास प्रवृत्त केले. तसेच सूफीसंताच्या शिकवणीमुळे स्वच्छेने इस्लामवर इमान आणून धर्म बदल केलेला आहे. खानदेशातील तडवी भिलल हे अशाचप्रकारचे इमानी इस्लामी आहेत. परंतु तरी देखील तडवी यांनी आपली मुळ भिलल संस्कृतीपासून मात्र फारकत अजूनही घेतलेली नाही. तडवी यांनी आपलया मुळ आदिवासी परंपरेचा व पिध्यांपिंध्या चालत आलेलया परंपरेचा मात्र त्याग केलेला नाही.पिध्यांपिध्याची चालत आलेला सांस्कृतिक वारसा घेवूनही ते आजही जगतांना आध्ळतात. यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तडवी यांना आपलया पुर्वज्यांचा व पिध्यांपिध्या चालत राहिलेलया चालीरितीचा ,रितीरिवाजाचा व संस्कृतीचा अभिमान आहे.तडवी त्यानुरुप कृती आजही प्रत्यक्ष जीवन जगतांना करतात याचे प्रत्यक्ष दर्शन त्यांचे जीवनसरणीतून प्रकटतांना आपणांस दिसतात.

**आदिवासी तडवी भाट :**

आदिवासी तडवी समाजाचे पुर्वज्यांची नोंद ठेवणारा व ती जतन करणारा एक आदिवासी जमात आहे. या जमातीला तडवी समाजाचे *तडवी भाट* असे म्हणतात.ही जमात प्रामुख्याने असीरगड, किशनगड येथे वास्तव्यास असून सदरचे भाट हे ५-७ वर्षातून एकदा सातपुडयात किंवा जेथे जेथे आदिवासी तडवी हे विखुरलेले आहेत तेथे तेथे जावून आपलया पोथीत नोदी घेतात. या भाटाजवळ तडवी समाजाचे वंशावळी,इतिहास,कुळे, तसेच पुर्वज्यांची माहिती इत्यादीचे नोदी हे त्यांचेजवळील परंपरेनुसार वडिलोपार्जीत पोथीत ते घेत असतात.त्यांचे हे कार्य ते पिध्यांपिध्या ते करित असतात. नव्याने जन्माला आलेले मुलांचे,वारसदाराचे नोंदी



हे भाट घेतात.तसेच लग्नाची बायकोचा उललेख हे भाट पट्टराणी असा करतात व तिच्या पासून उत्पन्न झालेलया संतानाना हे राजपुत्र असा उललेख आपलया पोथीत नोंद घेतांना करतात. मात्र दुस-यांदा लग्न झालेलया इसमाच्या पत्नीचा उललेख ही भाट जमात दासी असा करतात व तिच्या पासून उत्पन्न झालेलया संतांनाना दासीपुत्र म्हणून नोंद ते आपलया नोंदवहीत पोथीत घेत असतात. आदिवासी तडवी भिलल जमातीमध्ये यांना फार मानाचे व आदराचे स्थान आहे. हे आलयावर पाहुणचार करतात तसेच गोडधोड करुन खावू घालतात.तसेच वरतून दक्षिणा म्हणून रुपये व धान्य वगैरे देण्याची प्रथा आहे. सदरची परंपरा आजतागायत चालू आहे.

भारतात या भाटांचे आपले एक आगळेवेगळे वैशिष्टे दिसून येतात. या भाटांचे राजपूत किंवा गुजराती भाट तसेच मराठा भाट हे प्रांतिक पोटभेद आहेत. या भाटांना महाराष्ट्रात भाट, गुजरात राज्यांमध्ये बारोट, मध्यप्रदेशात रावजी तसेच उत्तरेत ठाकूर या नावानेही त्यांना ओळखले जातात.

सदरची ही जमात मध्यप्रदेश,राजस्थान,गुजरात, महाराष्ट्र ,पश्चिम बंगाल तसेच आसामात आध्ळते. महाराष्ट्रातील जळगांव जिलहयापुरता विचार करता येथील असलेले भाट मराठा भाट नसून ते राजपूत भाट आहेत. या राजपूत भाटाचे संबंध हे आदिवासी भिललाशी पिध्यांपिध्या चालत आलेलया पूर्वसूरीच्या रितीरिवाजाशी व ऐकमेकांच्या अंतर्गत संबंधाशी जोळता येईल य़ा भाटाचा संबंध हे मुळ आदिवासी संस्कृतीशी व जीवनसरणीशी प्रामुख्याने जोडला गेलेला आहे.पिधीदर पिधी त्याची मुळ नाड ही अशाप्रकारे टिकून आहे.

**आदिवासी तडवींचे आहार व उदरनिर्वाहाचे साधने:[ परपंरागत व्यवसाय**

आदिवासी तडवी हे रोजच्या आहारात ज्वारी,बाजरीची भाकर लाल किंवा हिरव्या मिर्चीचा ठेचा [खुळा] यांचा वापर त्यांचे आहारात दिसून येतो तसेच ते मासांहारी देखील आहेत. सातपुडयातील तसेच सातमाळातील बहुतेक आदिवासी तडवी हे *गोमांस खाणे निषिध्द* मानतात. परंतु ते जंगलातील प्राण्याची शिकार करतात.उदा.ससा,हरीण इत्यादी प्राण्याची शिकार करुन खातात.तसेच जंगलातील फळे,कंदमुळे इत्यादीचा देखील वापर त्याचे रोजच्या आहारात दिसून येतो.आदिवासी तडवी यांचे उदारनिर्वाहाचे साधन हे शेती करणे, सालदारकीपणा, शेळी व बक-या ,म्हैशी चारणे, जंगलातील डिंक गोळा करणे, लाकडाच्या मोळया विकणे, रात्रीच्या

वेळी शेतीराखण, जागलयागिरी करणे,ठेंगेगिरी करणे, तसेच सरकार कडून उपलब्ध करुन देण्यात येणारे विविध रोजगारभिमुख कष्टाची कामे इत्यादी कामे हे आदिवासी तडवी मोठया प्रमाणात करतांना दिसतात.

आदिवासी तडव्याची नवीन पिंधी ही सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेतांना दिसतात. विविध शाळांमध्ये, आश्रमशाळेत शिक्षण घेवून साक्षर तर होताच आहे किंबहुना आपली वेगळी ओळख निर्माण करुन सरकारी विविध कार्यालये व सेवामध्ये विविध पदावर सदरची नवीन पिंधी ही शिक्षणाच्या जोरावर नोकरीस लागून आपले आस्तित्वाची जाणीव निर्माण करताना दिसतात. अशाच गतीने जर शिक्षणाचा व प्रगतीचा वेग राहिलयास भविष्यात सदरची आदिवासी तडवी ही जमात प्रत्येक क्षेत्रात नावलौकिकात भर घालण्याची शक्यता निर्माण होतांना दिसत आहे. इतर आदिवासी जमातीपेक्षा सदरची ही तडवी जमात आता सुधारण्याचे चित्र डोळयासमोर उभे राहातांना दिसत आहेत.

तरी देखील तळागळातील आदिवासी पर्यंत सरकारी ध्येय धोरणे पोहचली पाहिजेत. तळागळातील शेवटचा आदिवासी हा सुखी होईल व त्याचेवर लाचारीचे बंधने दूर होतील तसेच निष्पाप पापभिरु आदिवासीचे सामाजिक व राजकीय भांडवल करण्याचे थांबेल त्यावेळेला भारत हे राष्ट्र ख-या अर्थाने एक स्वातंत्र संविधानीक राष्ट्र म्हणून नावारुपाला येईल. भारतातील प्रत्येक नागरीकाला मग तो आदिवासी असो, दलित असो, सवर्ण असो किंवा कोणीही गरीब स्तरावरील तसेच कोणीही असो त्याचे हक्काची व हिताची जपणूक करुन घटनेने प्रदान करण्यात आलेले अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार, इत्यादी प्राथमिक गरजा पुरवणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. सदरची कर्तव्याची जाणीव ठेवून प्रत्येक नागरीकांनी आपआपलया परीने योगदान दिले पाहिजे. सरकारच्या ध्येय धोरणात व योजनांमध्ये पारदर्शकता आणणेकामी नागरीकांचे देखील मौलिक व नैतिक सहकार्य अपेक्षित आहे त्याशिवाय संपूर्ण भारतीय समाजाची प्रगती व देशाची प्रगती होवू शकत नाही हे आता २१ व्या शतकात आम्हांला नव्याने कोणी सांगावयाची गरज नाही.

**आदिवासी तडवींचे राहणीमानः- [ घराची रचना / प्रकार ]**

तडवी यांचे घरे दोन खोलयांची असतात. मातीच्या भिंतीवर लाकडी आधे असे खांब ठेवून त्यावर बारीक तुरकाठी काडया टाकून त्यावर पळसाची किवा



सागाची पाने व्यवस्थित भर टाकून रचलेली असतात. त्यावर मातीचा थर दिलेला असतो तसेच त्यावर मातीने बनलेली पक्क्या कौले रचलेली असतात. परंतु आता मात्र परिस्थिती बदलत आहे शासकीय योजनामधून घरकूल योजना राबविली जात आहेत. ती चांगलयाप्रकारची आहेत. खाजगी घरे ही पत्राच्छादित असून घरासमोर व त्यालगतच उतरते छप्पर ज्यात स्वयंपाकासाठी चूल, आंघोळीसाठी मोरी, पिण्याचे पाणी ठेवण्यासाठी जागा तसेच जनावरे बांधणेकरिता स्वतंत्रपणे जागेची व्यवस्था केलेली असते. तडवी यांचे घरे उंच ओटयावर बांधलेली असतात. तसेच ती गावाच्या विशिष्ट ठिकाणी दिसून येतात या भागाला *तडवी वाडा* असे गावगाडयानुसार नांवे मिळालेली आहेत. त्याचप्रमाणे सातमाळ भागातील तडवी भिललांची घरे ही गांवापासून लांब शेताला लागून किंवा जवळच बांधलेली असतात त्याना *छपरा* असे म्हणतात. सातमाळ परिसरातील काही तडवी गांवात व काही शेतातच छपरा बांधून राहतात.

**अनुसूचित जमातीच्या लोकांचे पोशाखः-**

तडवी पुरुषांचा वेशभूषा ही धोतर, कुर्ता, बंडी व फेटा आहे. महिला हया नऊवारी लुगडे काष्टपध्दती या वेषात असतात तसेच काही स्त्रिया हया गोलसाडी देखील नेसतात. आताच्या काळात राहणीमान पध्दतीत बदल होतांना प्रामुख्याने दिसून येत आहे तडवी पुरुषाचे पेहरावात धोतर व फेटा या ऐवजी पायजमा व टोपी व मनिला कुर्ता साधा कुर्ता असा बदल झालेला दिसतो. महिलांच्या पेहरावात मात्र फार बदल झालेला नाही. सहावार साडी तसेच सलवार कमिज पंजाबी ड्रेस ,ओध्णी इत्यादीचा वापर हा नवीन पिंधी करत असलयाचे दिसून येत आहे. युवक व युवती हे आधुनिक पध्दतीचे कपडेलत्ते घालण्याकडे कल असलयाचे मोठया प्रमाणात दिसून येत आहे हळूहळू होणारे कालानुरुप राहणीमानातील बदलाचा देखील आदिवासी युवक व युवतीवर प्रभाव होतांना आपणांस दिसून येत आहेत.

तडवी पुरुष हे कुठलीही आभूषणे वापरत नसले तरी देखील बोटांमध्ये एखादया राशीची अंगठी घालतांना तसेच साधी अंगठी घालतांना दिसतात. तसेच पिरवलीच्या नांवाने तसेच भवानीमाय हिचे नांवाने ताईत, गंडे दंडावर व कमरेला बांधतांना दिसतात. त्याचप्रमाणे तडवी महिला हया गळयात काळी पोत घालतात तसेच पायाचे बोटामध्ये चांदीचे जोडवे घालतांना दिसतात. तडवी महिलांचे कान व

नाक हे टोचलेले असतात त्यात चांदीची कुडकं व गोलाकार सोन्याचे व चांदीचे दागिने वापरतात तसेच दंडावर चांदीची पाटलया व पायात चांदीचे तोडे व गोलपाटलया वापरण्याचे प्रमाण हे तडवी महिलामध्ये मोठयाप्रमाणात दिसतात. तसेच तडवी महिलामध्ये अंगावर तसेच हातपायावर गोंदून घेतलेले दिसतात प्रमाण मात्र कमी आहे.नवीन पिधीतील तडवी युवती ही थोडयाफार प्रमाणात दागिने वापरतांना दिसतात. तसेच लग्न झालेली तडवी युवती ही गळयात मंगळसुत्र सारखे दागिने घालतांना वापरतांना आपणास दिसतात. तसेच आपण सवासीन असलयाचे दिसावे म्हणून मंगळसुत्रासारखेच दिसावे अशी काळीपोत तसेच त्या पोत मध्ये सोन्याचे किंवा चांदीचे व काचेचे मनी घालून सदरची सुहासीन पोत गळयात घालतात. तडवी महिला हया घरातील तसेच समाजातील ज्येष्ठ पुरुषासमोर डोक्यावर पदर घेतांना दिसतात .मात्र नवीन पिधीतील युवती ही ओध्णी डोक्यावर पदर म्हणून घेतांना दिसतात.वडिलधारी मंडळीचा मान सन्मान करणे हे तडवी महिला व युवती हिचे प्रथम कर्तव्य आहे याची जाणीव ही स्त्रियाना बालपणापासूनच करवून दिलेली असते तसे संस्कार तिला कुटूंबातून मिळालेला असतो.आदिवासी तडवी संस्कृतीत महिलाना आदराचे स्थान व स्वातंत्र बहाल करण्यांत आलेले आहेत.

**आदिवासी तडवींची कुळ परंपराः-**

धार्मिक रितीरिवाजाकरिता तसेच लग्न-सोयरीक जुळविणेकामी आदिवासी तडवी हे कुळाचा वापर करतात.संपूर्ण भिलल संस्कृतीत सांस्कृतिक ओळख ही सर्व पोट शाखांनी जतन करुन ठेवलेली दिसते. तडवी भिललांमध्ये सुध्दा हिन्दू जाती व्यवस्थेनुरुप सर्व जात बांधवासारखीच कुळे [आडनावे] आहेत. सदरची कुळे ही तडवी समाजामध्ये नायकावरुन तसेच गांवावरुन पडलेली आहेत.तडवी जमातीतील कुळे हे नमुद येणे प्रमाणे आहेत.

जमादार,पुराळ, चौधरी, निंबाळकर, डोंगरदे, भोलाणकर, बोरव्हाये, सोयंके, घटटे, वांधे, गडकरी, असलकर, वाघरे, बारकरी, बाविस्कर, बोरकर, मानकर , सिरसाटे, देवकर, सोनगडे, बागुंल, शिंदे,बरडे,मोरे तायडे,माळोचे, जाधव,गायकवाड,ठाकूर,ठाकरे,पवार,चव्हाण,सोनुने,सोनावणे,गवळी सुरताने पाले पालवे भास्कर भारसाकळे सोलकर सोले ,इत्यादीप्रकारची ७० ते ८० च्या जवळपास कुळे हे आदिवासी तडवी यांचेत प्रामुख्याने दिसून येतात.



**तडवींचे कुळ देवताः-**

आदिवासी भिललांच्या पारंपारिक जीवनसरणीला चिकटून असलेलया अनेक तडवी भिलल हे आपापलया कुळ देवताची पूजाअर्चा-मन्नत करतांना दिसतात. संपूर्ण तडवी भिललांची मुख्य कुळ देवता ही माय भवानी व मनुदेवी आहे.तसेच खंडोबा,बहिरोबा [भैरवनाथ] हे आध्ळतात. त्याचप्रमाणे रावेर,यावल,चोपडा व मध्यप्रदेशातील अनेक तडवी परिवाराचे श्रध्दस्थान आडगांव [यावल] येथील मनुदेवी अर्थात मन्नादेवी आहे. त्याचप्रमाणे नमुद प्रमाणे परिसरातील व काही भागातील कुळ देवता आहेत.कुसूंबा [रावेर] येथील भवानी माय, ब-हाणपूर जवळील इच्छादेवी, असिरगडाची *आशापुरामाता* हिला भजणारे व मानणारे अनेक गांवातून दिसतात. जामनेर,पाचोरा,सोयगांव,सिललोड, भोकरदन भागात वाघेणा व फर्दापूरची *काळुंकामाय* घाटनांद्राची *जोगेशवरी माता* सावखेडयाचे भैरवनाथ तसेच वणीची *सप्तश्रृंगीमाता* आदिना मोठया भक्ती भावनेने भजण्याचा रिवाज पिध्या दर पिधी चालत आलेला आहे.तसेच गांवागांवात आसरा,मरीमाता,म्हसोबा,मुंजोबाना देखील मानणारे व भाजणारे आहेत.तसेच चाळीसगांवचे घोडेस्वार पीरबाबाब ,साकळीचे [यावल] येथील सजनशाह वली,सैलानीबाबा,कन्नड जवळील शेखमारु पीरबाबा, मौलाशाह बाबा, रावेरचे जंगलीपीर बाबा, तसेच ख्वॉजा मोईनुददीन पीरबाबा अर्थात ख्वॉजा गरीब नवॉज अजमेरी राज्यस्थान तसेच शिर्डीचे साई बाबा इत्यादीना पीरवलीना देखील भजणारे व मानणारे गांवागांवातून दिसून येतात. अदयापही तडवी समाज त्यांची मनोभावी सेवा करतात यात दुमत नाही. हा एक सामाजिक व पारंपारिक रितीरिवाजाचा तसेच मनात वसलेला भक्तीमय भावना तडव्याच्या अंतरगात डोकलयावर आपणास स्पष्टपणे निर्दशनास येते. इमानी इस्लामी झालेवर देखील त्यांनी आपलया मुळ सांस्कृतिक जीवनसरणीचा त्याग केलेला नाही. ज्या जगाला आज *मानवताधर्मा*ची नितांत आवशकता आहे त्याचे दर्शन देणारी व पालन करणारी तसेच सर्वधर्मसमभावनेचा उदाहरण हे जगाला स्वत:चे आचरणेतून देवून एक नवीन वैचारिक अधिष्ठान व वैशिवक मानवतावादी विचारांचे बिंजारोपन हे आदिवासीनी आपलया सांस्कृतीतून दिलेले आहे. आदिवासीचे वर वरचे रुप जरी गरीबीचे असले तरी हृद्रयातून समृध्दशिल व मोठया मनाचे दर्शन घडविणारी ही आादिवासीची महामानवांची संस्कृती आहे.असे म्हटलयास अतिशोक्ती होणार नाही.

आदिवासी तडवी भिललांनी आपलया एकंदर जीवनसरणीतून तसेच धार्मीक चलन-वलनातून जगण्याची पारंपारिक रित बघीतलयास आजच्या दुषित सामाजिक संघर्षमय प्रवाहातून देखील आपली वेगळी ओळख कायम टिकवून व आपलया आस्मितेला धक्का न पोहचू देता कोणतेही गृहकलह व मतभेद न करता गुण्यागोविंदाने व एकोपाने कसे जगता येते ओळख टिकवून व मुळ संस्कृतीतून नाळ न तुटू देता कसे जगत रहावे हे तडवी भिललांनी स्वत:चे आचारणातून व वागण्यातून आजच्या २१ व्या शतकातील सभ्य मानवाला स्वत:चे उदाहरणाने दाखवून व पटवून दिलेले आहेत.

एकंदरीत सर्वच आदिवासी जमाती तसेच आदिवासी तडवी भिलल जमात ही जगातील निधर्मी तसेच चेतनवादी परंपरा जतन करणारी संस्कृती असलेली जमात आहे.

**विवाह मूहुर्त व तिथी:**

वर तसेच वधू कडील मंडळी मंदिरात जावून पुजा-याकडून तसेच ब्राम्हणा कडून विवाहाची तिथी काध्यात येते. ब्राम्हण सांगेल ती तिथी व तसेच उत्तम शुभ सवासीनाची नांवे काध्यात येतात. सदरची परंपरा ही अतिशय प्राचीन आहे. लग्नपत्रिका तयार करण्यापूर्वी ब्राम्हणांकडून पचांग पाहून वर व वधूची नांवे जर मंगलमय येत नसतील तर त्यात बदल करुन शुभ नांवाचा समावेश पत्रिकेत करण्यात येते. एखादया वेळेस ब्राम्हणाचे सांगण्याप्रमाणे मुळ नांवाऐवजी दुसरे टोपन नांव जे शुभ असेल तर त्याचा उपयोग पत्रिकेत टाकण्यासाठी करतात.आदिवासी तडवी यांचा शुभ व अशुभ शकुणावर विशवास आहे.तसेच विवाहाचा नौता देताना हळद लावलेले धान्याचा तादंळाचा दाण्याचा उपयोग करतात तसेच ज्वारीचे दाण्याचा देखील वापर करतात. आजच्या काळात मोठया प्रमाणात लग्नपत्रिका ही छापण्यात येतात.व ती संगेसोय-यांना गांवागांवात जावून वाटण्यात येतात.तसेच आजच्या काळात सांगावे पाठविलेले जातात. दूरध्वनीवरुन तसेच मोबाईल फोनव्दारे देखील मित्रांना व सोय-यांना निमंत्रणे पाठविले जातात. परंतु भारतीय संस्कृतीनुसार आजही पत्रिका पाठविण्याचा रिवाज आहे हा एक सांस्कृतिक मान सन्मान असतो व तो परंपरेनुसार पाळण्यात येत असतात. अशाप्रकारे ब्राम्हणाकडून व पुजा-याकडून विवाहतिथी व मूहूर्त काध्यात येत असतो आजही ही परंपरा मोठयाप्रमाणात पाहावयास मिळते.



**साखरपुडा [ फुटाणे वाटणे ]:**

आदिवासी तडवी भिलल समाजात मुलगी पसंद केलयानंतर फुटाणे* वाटणे किंवा साखरपुडा ठरवितात. खानदेशात तसेच सातपुडयात या रिवाजाला फुटाणे वाटणे असे म्हणतात. तसेच सातमाळ परिसरात *फडकी* असे म्हटले जाते. आजच्या काळात साखरपुडा अर्थात फुटाणेच्या रिवाज हा पार पडतांना जो तो आपलया हैसीयत ऐपतीप्रमाणे जेवनाच्या देखील बेत केला जातो. या मध्ये वरण-पोळी, तसेच शाकाहारी व तुरळक प्रमाणांत मांसाहारीचे जेवन देतात. वर व वधू कडील ज्येष्ठ मंडळी या दरम्यान गोळा होतात. तसेच वराला अंगठी, कपडेलत्ते व इतर वस्तू वधू पक्षाकडून भेट दिली जातात. त्याचप्रमाणे वर पक्षाकडूनही वधूलाही साडीचोळी,तसेच दागिने दिले जातात. अशाप्रकारे विवाहाची बोलणी केली जाते.ज्येष्ठ समाजातील व्यक्तीचा व वयोवृध्द स्त्रियांचा या वेळी आशीर्वाद घेण्यात येतात. शेवटी दुवॉखेर होवून अललाचे नामस्मरण होवून सदरचा विधीची सांगता करण्यात येते व सर्व समाजातील व्यक्ती हे वराला घेवून आपलया मुळ गांवी माघारी परत फिरतात.

**तडवी समाजातील विवाह संस्थेचे स्वरुप:**

**विवाह** संस्थे मागे एक आदिवासी परंपरा असते. विवाह झालेलया जोडप्यांनी गुण्यागोविंदाने नांदावे व राहावे. समाज रित पाळावी व दोन खानदानाची व कुळाच्या नांवलौकीकास साजेल रुचेल असे वर्तन करावेत. इज्जत व इब्रत राखावी तसेच या विवाह सोहाळा हा दोन गांवे,दोन कुळे,खानदान एक त्र ा येतात.कोणत्याही अप्रिय वर्तनामुळे याला तळा जाता कामा नये. विवाहसंस्थेचे हे नाते अतूट राखले जावेत ही समाजाचसी प्रमुख मनोभुमिका असते.त्याचबरोबर विशिष्ट कुळाची खानदानाची वंश परंपरा राखता यावी म्हणून संतती नियमनाबरोबर समाजाने घालून दिलेले सर्व नियमांचे पालन करावे. समाज चौकटीत राहावे. विवाह हा दोन व्यक्तीचा नसून दोन आत्माचा,जीवाचा असतो.दोन कुळे,दोन खानदान,दोन गांवे व संपूर्ण आदिवासी संस्कृतीचा तो एक अनन्य मिलाफ असतो. यांचे भान विवाह संस्थेचे बुजुर्गी कडून तसेच परिवारातील लहान मोठया सदस्याकडून नववधूला तसेच नवरदेवाला करवून दिला जातो.आदिवासी जमातीत जन्मलेले प्रत्येक व्यक्तीवर हे सांस्कृतिक संस्कार हे तो जगत असतांना तसेच विवाह सोहळे तसेच इतर सांस्कृतिक

चलनवलनातील संस्कार हे त्यांचेवर जन्मापासून ते मोठे विवाह योग्य झालेनंतर तसेच तदनंतरही या परिवेषात हे आदिवासी संस्कार कळत न कळत त्यांचेवर होत असतात. यातील काही सांस्कृतिक संस्कार हे सांगण्याचीही गरज किंवा आवशयकता भासत नसते.

आदिवासी तडवी समाजामध्ये मुलगा वयात आलेवर तसेच तो कमवता झालेवर वधूची शोधाशोधसुरु होते.काहीही कामधंदा न करणा-या मुलाचा विवाहाचा विचार हा केला जात नाही. जो पर्यत तो कामा लायक होत नाही तो पर्यत त्याचा विवाहाचा विचार टाळण्यात येत असतो. कामधंदा न करणा-या व अविवाहीत मुलाना सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त होत नसते.त्याचप्रमाणे आदिवासी तडवी समाजामध्ये एकाच कुळात विवाह करण्याची प्रथा नाही आहे. कारण समान कुळामध्ये रक्ताचे तसेच एकाच परिवाराचे खानदानाचा रिशता असतो म्हणून असलया विवाह संबंधाना आजही विरोध आहे.विवाह करतांना वर व वधू ही विरुध्द कुळातील तसेच वेगवेगळया कुळातील असायला हवीत.उदा.सोयंके-बोरव्हाये,घटटे-भोलनकर, सोनवणे-बारी इत्यादी. एका कुळातील लोकांमध्ये सोयरीक संबंध आजपण होत नाहीत कारण समान कुळातील लोक एकाच कुळ पुरुषाचे वंशज असतात. विवाह करण्याला विरुध्द कुळातीलच मुलगी ही पसंद करण्यात येत असते. सदरची सांस्कृतिक परंपरा आजही राखली जाते तिचे पालन हे आजही केले जाते.

## आदिवासी तडवी भिललांचे विवाहाचे प्रकार:

**तड**वी भिलांचे विवाहाचे प्रकार यांचे विचार करण्या अगोदर आदिवासी भिल संस्कृतीत प्रचलित असलेलया विवाहाच्या प्रकाराचा देखील साधकबाधक विवेंचन येथे करु या. जेणेकरुन आपणास तडवी भिलाच्या विवाहाचे प्रकाराबाबत माहिती ही होवू शकेल. तडवी समाजामध्ये काही भिल संस्कृतितील विवाह प्रकार जरी मान्य केले जात नसले तरी देखील विशिष्ट संस्कारानंतर व नियमानुसार या विवाहासंस्काराला सर्वानुमते समाज मान्यता दिली जात असते यात शंका नाही.

१] आते- माम भावंडामधील विवाह
३] जीजा - साली विवाह
४] विनिमय विवाह [सटा-लोटा विवाह पध्दत]



५] संमती विवाह
६] सहपलायन विवाह
७] अपहरण विवाह
८] परिक्षण विवाह पध्दत
९] हटट्‌गमन विवाह पध्दत [ घरघुसी विवाह ]
१०] गांव रक्षा समाज संमती विवाह

अशाप्रकारे आदिवासी भिल संस्कृतीमध्ये इसवी**सन ३०० ते १७५०-१८००** च्या जवळपास व नंतर देखील भिल संस्कृतीत वरील नमुद विवाह प्रकार हे दिसून येत होते. यातील काही विवाह हे * तडवी भिल *संस्कृतीत दिसून येतात. वरील विवाह प्रकाराबाबत विंवेचन खाली नमुद प्रमाणे केलेले आहे.

### १] आते-माम भावडांमधील विवाह:

आदिवासी तडवी समाजात या पध्दतीने देखील विवाह रित व परंपरा ही दिसून येते. या संबंधात पोरगा हा आपलया माम बहिणीशी तसेच पोरगी ही आपलया फूफूच्या अर्थात आतेभावाशी लग्न करण्याची पध्दत आदिवासी समाजामध्ये दिसून येत असते. यामध्ये फूफ-माम भावडांमध्ये विवाहात घेण्याचे तसेच देण्याचे व्यवहार प्रामुख्याने आवशयकता भासत नसते. मुलगीचा वडील याने मुलाच्या वडीलाच्या वतीने मुलगीची पालनपोषणचे मूलय घेण्याची प्रथा सर्वच आदिवासी तथा आदिम जमातीत प्रचलीत आहे.अगोदर भाऊ-बहिणीचे नाते असलेले या नव्या रिशत्यामुळे अजून मजबूत सामाजिक ऐक्यभाव व त्याचे नियमन व पालन होवून एक सामाजिक रितीरिवाज यामुळे पुधे विकसित होत असतो.

### २] जीजा-साली विवाह:

आदिवासी तडवी भिल संस्कृतित समाजव्यवस्थेत जीजा-साली विवाह प्रकार हे देखील पहायला मिळतात. आपलया जीजाशी अर्थात बहीणोईशी साली ही विवाहबध्द होत असते. तडवी समाजात याला समाज मान्यता आहे. एखादी मुलगी ही आपलया सख्ख्या बहिणीच्या मृत्यूनंतर तिच्या मुलाबाळाचा सांभाळ व संसारिक जबाबदारी स्वत: वर घेवून आपलया बहिणोईशी जीजाजीशी विवाहबध्द होत असते.याला परिवारातील सर्व ज्येष्ठ मंडळी पाठिंबा देतात. सदरचा विवाह हा अत्यंत पवित्र व मानवतावादी व बलिदानी,त्यागी विवाह प्रकार म्हणून समजला जातो.

आपलया सर्व सुखाची तिलांजली देवून आपलया बहिणीच्या मृत्यूप्रांत ती आपलया जीजाशी विवाहास संमती देते. आदिवासी जीवनात व ग्रामीण जीवनात एक प्रसिध्द म्हण आहे, *माय मरो किंतू मावशी जगो * अशाप्रकारे जीजाच्या जीवनात आनंद निर्माण करुन त्यांचे संसार सांभाळते व करते.या प्रकाराला जीजा-साली विवाह पध्दत म्हणतात.

**३] विनिमय विवाह : [ सटा-लोटा विवाह ]:**

**आदिवासी** तडवी भिल जमातीत सदरची विवाह परंपर व प्रथा देखील पहायला मिळते. दुस-या परिवारातील मुलगी आपलया घरी घेवून येणे तसेच आपलया घरची मुलगी त्याच घरात देणे या परंपरेला व प्रथेला व विवाहाला सटा-लोटा विवाह पध्दत किंवा विनिमय विवाह पध्दत असे म्हणतात.तडवी समाजात या विवाह पध्दतीला मान्यता आहे. परिवारातील सदस्य आपली बहिण दुस-या परिवारातील वराला देतो व वराची बहिण हिचा स्विकार पत्नी म्हणून करतो अशाप्रकारे दोन परिवार हे ऐकमेकाडे वधूची देवाणघेवाण करतात. सदरची परंपरा तडवी समाजात मोठया प्रमाणात जरी दिसून येत नसले तरी देखील मात्र तुरळकपणे ही परंपरा आदिवासी तडवी समाजात दिसून येते.

**४] संमती विवाहः**

**आदिवासी** तडवी समाजामध्ये सदरची संमती विवाह प्रथा व परंपरा ही मोठया प्रमाणात दिसून येते.मुले हे विवाह समारंभ,साखरपुडा, यात्रा उरुसा दरम्यान गांवात एकत्र जमतात तसेच संगे सोय-याकडे चहापाणी व जेवनास जातात. त्या दरम्यान एखादया मुलास एखादी मुलगी पसंद पडते तसेच उपवर मुला व मुलीचे लग्न देखील या दरम्यान पसंती दरम्यान ठरविण्यात येतात. त्यावेळी दोन परिवाराचे संगे सोय-याच्या मध्यस्थीने हा विवाह ठरविला जातो. या विवाहात मुलगी जरी मुलाने पसंद केली असली तरी या विवाहात आई वडिलाचा सहभाग हा मोठया प्रमाणात असतो.तसेच आदिवासी जमातीत युवक व युवती एकदुस-याला देखील पसंद करुन जोडीदाराची निवड करतात. यात युवागृह,गोटुल,चोरवनी झोपडी यातील संस्कार व परंपरा प्रथेचा मुख्येत्वकरुन प्रभाव हा युवक व युवतीवर झालेचे दिसून येतात.या प्रकारच्या विवाह परंपरेला आदिवासी तडवी समाजात मोठयाप्रमाणात मान्यता ही मिळालेली आहे.



**५] सहपलायन विवाहः**

आदिम जमातीत सदरची परंपरा आहे. आपलया आई-वडिलांच्या तसेच घरातील बुजुर्ग व्यक्ती यांचे मनाविरुध्द व समाज नियमाचे सर्व बंधने तोडून युवक-युवती ही पळून जावून दूर जावून विवाहबध्द होतात. या पध्दतीच्या विवाहप्रकाराला सहपलायन विवाह असे म्हणतात. परंतु कालातंराने कुटूंबाचा परिवाराचा राग व क्रोध शांत झालेनंतर तसेच एक दोन अपत्य झालेवर हे जोडपे मायदेशी परतात व परिवाराशी झालेलया चुकाबददल क्षमा मागतात. शेवटी परिवार त्यांना कुटूंबात सामील करुन घेतो. कुटूंबात पुर्नप्रवेशाचा समाज मान्य परंपरेनुसार मात्र कोणताही विधी मात्र होत नसतो.अशा प्रकारे हे जोडपे पुन्हा नव्याने संसारास सुरुवात करतात. शेवटी समाज व परिवार त्या जोडप्याला सामील करुन घेतात. असलयाप्रकारच्या विवाहाला सहपलायन विवाह असे म्हणतात.

**६] अपहरण विवाहः**

**आदिवासी** आदिम जमातीत सदरची परंपरा मोठया प्रमाणात दिसून येते.काही आदिवासी जमातीत अदयापही सदरचे विवाह प्रकार हे दिसून येतात.वधू हिच्या संमती शिवाय वराने वधूला पळवून घेवून जावून तिचेशी विवाह करतात. अशा प्रकारचे विवाह हे विशिष्ट काळात व समयी होत असतात. आदिवासी जमातीतील सांस्कृतिक कार्यक्रमा दरम्यान तसेच इतर वेळी वर हा वधूला पसंद करुन तिला घेवून पलायन करतात. त्यांचे शोधार्थ परिवारातील सदस्य हे निघतात. या विवाहाला वधूपक्षाचे कडील लोकांचा कुटूंबाचा विरोध असतो. त्यामुळे वधूमुलय देण्याचे कोणतेही कारण मात्र उरत नाही.अशापध्दतीचे विवाहाला सामाजिकस्तरात अंतर येत असते. आदिवासी तडवी जमातीत असे अपहरण विवाह प्रकार होतात .प्रमाण अत्यलप आहे. हा विवाह विधी समाजमान्य पध्दतीने होत नसतो. त्यामुळे समाजातील लोक वराला *बिनहयदया* व वधूला *बिनहयदी* अर्थात हळद लागलेला-लागलेली नाही असे दुशन टोमने मारतात. तडवी भिल जमातीत सदरचा प्रकार हा बहुतांशी आध्ळत नाही. मात्र काही काही ठिकाणी किंवा भागात असे प्रकार होतात.

**७] परिक्षण [कसौटी] विवाहः**

**स**दरची सांस्कृतिक परंपरा ही आदिवासी जमाती व आदिम जमातीत मोठया प्रमाणात प्राचीन काळी अंमलात येत होती. भारतातील व महाराष्ट्रातील

आदिवासी आदिम जमातीत सदरची कसौटी विवाह तथा परिक्षण अर्थात परिक्षा विवाह हे प्रचलित होती. आदिम जमातीचे काही नियम व सामाजिक सांस्कृतिक कसौटया असतात या परिक्षेत जर वर हा खरा उतरला किंवा पास झालयास तर त्याला त्याच्या आवडत्या यु वती सोबत विवाहास समाज मान्यता होती.या प्रकारचे विवाहात शरिरीक धैर्य,शूरता तसेच त्या वरातील चिकाटा,आत्मविशवास इत्यादीचे परिक्षण सर्वासमक्ष केले जात असते. तसेच वधूचेही तीच्या अंगी असलेलया विविध गुणांचे मुलयांकन हे केले जात असते.सदरची परंपरा ही आदिवासी व आदिम जमातीत प्रामुख्याने संस्कृतीत दिसून येते. सदरची प्रथा ही आदिवासी तडवी जमातीत मात्र दिसून येत नााही. आदिवासी आदिम जमाती ज्या भारतभर विखुरलेलया होत्या तसेच महाराष्ट्रात दिसून येतात त्यात भिल,कोकरु, डांग,मावची,कोलम, मलल , तसेच असे अनगिनित जमातीत ही प्रथा थोडया फार प्रमाणात प्रचलित होती यात शंका नाही.

या आदिम जमातीचे एक *गुप्त संप्रदाय * असून आदिम जमातीचे आपले काही नितीनियम असतात आपले एक वेगळेपण तसेच सांस्कृतिक चलनवलन असतात. सदरचा विवाह प्रकार हा तडवी जमातीत जरी दिसून येत नसला तरी मात्र काही परिसरात उदा.सातपुंडा,सातमाळा, गुजरात,राज्यस्थान व भारतातील काही भागातील आदिवासी जमातीत सदरची परंपरा आहे. परंतु ती गुप्त स्वरुपात असून उघड उघड मान्यता मात्र नाही. सदरची मान्यता ही गुप्त असली तरी कसोटीस पात्र वरला इच्छीत वधूसोबत विवाहबध्द करणेची मुभा आहे.या आदिम जमातीतील काही जमाती हया काळाच्या आड नष्ट तसेच त्यांचे आस्तित्व हे नष्ट झालेले आहे. तसेच आता सदरच्या परंपरा हया हळूहळू लोप पावत चाललेली आहेत यात शंका नाही.

**८] हटटागमन [घरघुसी] विवाहः**

सदरचा विवाह प्रकार हा आदिवासी जमातीमध्ये प्रामुख्याने प्रचलित आहे.आदिवासी तडवी जमाती मध्ये तसेच सर्वच आदिम जमातीत दिसतो. मात्र याला काही जमाती हे अपवाद देखील आहेत. या विवाह प्रकारात स्त्रियांना जो पुरुष योग्य व आवडेल अशा पुरुषाच्या घरात परिवारात हटटाने प्रवेश करतात व त्या पुरुषाशी विवाहबध्द होतात. यात स्त्रिया हे जे इच्छीत वर हवे ते त्या प्राप्त करतात.व



स्वखुशीने स्वत:चे कुटूंबाचा व समाजाचा विरोध असून देखील इच्छीत वराबरोबर विवाह करणेचा आग्राह धरतात तिला घराबाहेर जरी काध्ले तरी ती जात नसते व हटटाने आपले ध्येय अर्थात आपलया आवडत्या वराशी विवाह करुन त्याचे सोबत संसारास आरंभ करतात.या विवाह प्रकाराला *हटटागमन विवाह* तसेच *घरघुसी विवाह* असे म्हणतात.

**९] गांवरक्षा संमती विवाहः**

आदिवासी जमातीत व आदिम जमातीत सदरची सांस्कृतिक परपंरा तसेच भिलल जमातीत सदरची ही विवाह प्रकार दिसून येतो. सदरची परंपरा अतिशय प्राचीन आहे. या विवाह प्रकारात युवक व युवतीना स्वातंत्र तसेच मोकळीक असते.आदिवासी सामाजिक व सांस्कृतिक चलनवलनाकरता सदरची प्रथा ही जोपासली जाते. चोरवनी झोपडी,युवागृह,गोटूल,शयनगृह, तसेच सामुदायिक शयनगृह यांचे माध्यमातून युवक व युवतीचा परिचय केला जातो. यामध्ये युवक व युवती आपलया आवडत्या जोडीदाराची निवड करतात. काही काळ तेथे घालवितात.तसेच करमणूकीचे काही खेळ तेथे खेळतात. दरम्यान येथील म्होरके हे या जोडप्याचे त्याचे समाजरित व प्रथेनुसार त्यांचे कुटूंबाशी व परिवाराशी रितसर बोलणी करुन समाज मान्य परंपरेनुसार त्या निवड केलेले जोडप्याचे विवाह हे लावून देतात.या विवाहाला गांवरक्षा संमती विवाह असे म्हणतात.

या जोडप्याचे विवाहा नंतर गांवावर येणारे अनेक संकटापासून रक्षण करण्याची जबाबदारी तसेच इतर सामाजिक व गांवातील इतर काम त्याचे कडून करवून घेतले जातात. त्यात सामुदायिकपणे गांवाची शेती कसून देणे, शिकार करणे, मासेमारी करणे, तसेच हिस्त्रप्राणी यांचेपासून गांवातील गुरेधेरे व शेळयाबक-या यांचे रक्षण करणे इत्यादी कामे ही या जोडप्यापासुन करवून घेतली जातात.त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमात हिरीरीने सहभाग घेणे. अशा जबाबदा-या हया प्रामुख्याने सोपविलेलया जातात. या प्रकारे * सामुदायिक शयनगृहातील *झालेलया मैत्रीतून व आवडत्या जोडप्याचे विवाह या आदिम जमात लावून देतात.सदरच्या परंपरेला * गांवरक्षा संमती विवाह * असे म्हणतात. सदरची परंपरा अतिशय प्राचीन आहे. बहुतेक सदया ती दिसून येत नसली तरी मात्र अंत्यत खोलवर तसेच दुर्गम भागात ती जोपासली जात असलयास नवल वाटणेचे कारण नाही. हेही तितकेच खरे आहे.

अज्ञात-हेने आदिवासी आदिम जमातीत विवाह प्रकार हे दिसून येतात. यातील काही प्रकार हे तडवी भिल या आदिम जमातीत देखील पहावयास मिळतात.प्राचीन काळाच्या सामाजिक जीवनमान जगतांना व सांस्कृतिक परंपरेत सदरच्या विवाहाच्या प्रथा हया दिसून येतात. आजच्या २१ व्या शतकात ज्या वेळेस या प्राचीन प्रथा आपण बघतो त्यावेळेस यात एक वैशिष्टे व सामाजिक मुलये असते.तसेच त्याचे पालन हे या आदिम जमाती करतांना दिसतात. परंतु मानवीय विचाराचा तसेच मानवतावादी विचाराच्या पाठबळ घेवून विचाराची कारणमिंमासा करता काही आदिम परंपरा हया अत्यंत कठोर असून त्यात काही प्रमाणात सांस्कृतिक परंपरेचे पालन करण्यावर मोठया प्रमाणात भर देणे हे अगत्याचे तसेच महत्वाचे आहे. यात शंका नाही. हेही काही वैशिष्टे दिसून येतात. कठोर संस्कृतीत रितीरिवाज पालनाची सक्ती ही करण्यावर मोठया प्रमाणात भर हा देण्यात येत असते मग थोडयाफार प्रमाणात मानवीय मुलये यांची हेडसांड जरी झाली तरी या आदिम जमाती याची पर्वा करीत नसतात. हेही येथे नमुद करावयास वाटते.

* * * * * * * *



प्रकरण ६

# भारतातील व सातपुडयातील गुप्त भाषा व सांकेतिक भाषेची परंपरा

गुप्त बोली भाषा व सांकेतिक बोली भाषा हा विषय संशोधकांना,अभ्यासकांना नवीन नाही.मात्र दुदैव्य म्हणावे लागेल की याबाबतीत सखोलपणे भारतात तसेच महाराष्ट्ात संशोधन झालेले नाही. स्वातंत्र्य अगोदरच्या काळात इंग्रजांनी हा विषय ब-यापैंकी थोळयाफार प्रमाणात हाताळला आहे. कारण त्याकाळी ज्या लोकांकडून त्यांना भिती होती तसेच ज्या आदिम जमाती ज्यांना त्यांनी गुन्हेगारी जमाती म्हणून घोषीत केलेल्या होत्या,त्या आदिवासी जमाती इंग्रजांना जेरीस आणतांना तसेच त्याचे राज्यकारभारात अडथळा निर्माण करण्याकरता या गुप्तबोलीचा व सांकेतिक बोली भाषांचा उपयोग ते करत असत.या व इतर अनेक कारणास्तव इंग्रजांनी भारतातील आदिवासी जमातीच्या गुप्त व सांकेतिक बोली भाषांबाबत संशोधन व अभ्यास करण्यावर शासकीय दरबारातील व्यक्तीना प्रोत्साहन देण्यांस सुरुवात केली.अशाप्रकारे या विषयांस चालना मिळून हा विषय सर्वप्रथम भारतात हाताळला जावू लागला.

भिल्ल संस्कृतीत सदरची गुप्त भाषा प्रचलित होती. इतिहास बघितला तर छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळात गुप्त संदेशवहनाचे आदानप्रदान करण्याचे काम गुप्त संदेशवाहक म्हणून तसेच हेरगिरी करण्यात निष्णात असलेले दोन नांवे समोर येतात, एक शिवाजी महाराजाच्या काळातिल बहिर्जी नाईक तसेच मोगलकाळातिल रशीद खान हे हेरगिरी करणारे निष्णांत असे नांवे त्याकाळी सुप्रसिध्द होती.शिवरायाचे हेर बहिर्जी नाईक हे आपले संदेश सांकेतिक भाषेत शिवरायाकडे पोहचवित असत तसेच ते छत्रपती शिवरायाचे एखादा गुप्त संदेश हा गुप्त बोलीत लिहून तो इच्छीत स्थळी व हव्या त्या व्यक्ती पर्यत पोहचवित असत तसेच उदाहरण हे मोगल काळातिल हेर रशीद खान यांचेबददल सांगता येईल.तसेच रामदास स्वामी हे आपल्या अंभगातून व पदयातून,काव्यात्मक शैलीत शिवरायांना गुप्त संदेश सूचित करत असत व पोहचवित असत.

गुप्त बोलीचा त्याच प्रमाणे सांकेतिक बोलीचे कोडे उकलण्याकरता अनेक जन प्रयत्न करतात. प्राचीन काळी काही ताम्रपत्रातील संदेश,हस्तलिखित गूर्धलिपी,शिल्प भाषा वविविध मुद्रावस्थातील आकृत्या,मूर्ति,त्याच प्रमाणे विविधप्रकारे लिहीलेल्या लिपीतील शिलालेख,किल्ले,किल्ल्यातील खजिना,गुप्त दरवाजे ते उघडणारे रहस्यमय विविध तंत्र व त्याच्या विविध चाब्या व नकाशे,नकाशावरील ठिकाणे,रस्ते,मुद्रा,इत्यादी अनेक रहस्यमय दुनियेवरचा पडदा हा केवळ आणि केवळ गुप्त व सांकेतिक भाषेच्या ज्ञात ज्ञानामुळे संभव होत असत व आहे.

भारतीय प्राचीन संस्कृतीत सभ्यतेत तसेच जगातील सभ्यतेत संस्कृतिचा विचार करता गुप्त सांकेतिक भाषेव्दारे एखादा गुप्त संदेशवहन केले जाणेची परंपरा विदयमान होती. आपली सभ्यता व संस्कृती भविष्यकाळातही कायम निरंतर टिकावी म्हणून काही सप्रदायानी व संस्कृतीने सभ्यतेने ती गुप्तपणे जतन करून ठेवली.

भारतातील व जगातील काही संस्कृतीने ती गुप्तपणे सांकेतिकपणे जतन केली याचा अभ्यास केला जात आहे. येणे प्रमाणे काही सभ्यतेचे उदाहरण देता येतील ज्यानी सांकेतिक व गुप्त संदेशवाहनाचे परंपरा सभ्यता टिकावी म्हणून केली.

१. मेहजोदोडो सभ्यता

२. खजुराहोकालीन सभ्यता,अजिंठा-वेरुळकालीन सभ्यता



३. माया सभ्यता

४. इजिप्तशियीन पिरॅमिड,ममी,.

५. अरेबियन संस्कृती सभ्यता

६. बाहूबलीकालीन संस्कृती सभ्यता

७. बौध्दकालीन सभ्यता

या सभ्यतांचा चिकीत्सकपणे संशोधन व अभ्यास संशोधक करीत आहेत व यातून संस्कृतीचे सभ्यतेचा प्राचीनतेच्या शोध व बोध घेतला जात आहे व त्यातून आजच्या २१ व्या शतकातील मानवाचा प्रगतीचा आलेखाचा शोध,तपशिल,माहिती,तपासून मानवनिर्मितीची प्रक्रिया व पृथ्वीवर जीवन स्पूरण्याच्या प्रकिया ,संस्कृती सुरु होण्याची प्रक्रिया व पृथ्वीवर जीवन कसे सुरु झाले मानवाचे पुर्वज कोण ,ब्राम्हाडात सजीव सृष्टी आहे कां,याचा शोध घेतला जात आहे.याकरता मानववंश संशोधक व ,अभ्यासक हे या सभ्यतांचा अभ्यास करुन शोध घेत आहे.

थोर खगोल संशोधक गॅलिलिओ यांस पोप व सत्ताधिशांनी छळ करुन ठार मारलेवर गॅलिलिओचे समकालीन व नंतरचे संशोधक यांनी आपले शोध व कार्य हे गोपनिय ठेवू लागलेत. आपले शोध ते गुप्त व सांकेतिक भाषेत लिहून जतन करु लागलेत.याचे उदाहरण म्हणून लिओ-नार्डो-द-विंची याचे नांव घ्यावे लागेल ,या संशोधक चित्रकाराने आपले संशोधन व चित्रात्मक संदेशात अर्थात गुप्त सांकेतिक भाषेत लिहून ती तो जतन करु लागला.तसेच भविष्यात सदरचे संशोधन व चित्रे व त्यातील गूध लेखन संदेश नंतरच्या पिधीला उकल करता येवू शकेल याबाबत काही पध्दत व बौध्दीक संदेश कोड लॅग्वेज त्यानी लिहून व जतन केली. त्याचे समकालीन संशोधक यांनी या गुप्त व सांकेतिक भाषेला मिरर लॅग्वेज म्हणून पुधे इतिहासात सभ्य माणसाना ज्ञात झाली.

गुप्त बोली भाषा-सांकेतिक भाषांची पुरातनकाळी जेवधी गरज होती तेवधीच नितांत गरज ही आताच्या काळात देखील आहे. तंत्रज्ञान,विज्ञानाच्या व स्पेस विज्ञानाच्या या २१ व्या शतकात गुन्हेगारी व त्याचे स्वरुपही दिवसेदिवस गतीमान व

काळाप्रमाणे अॅडव्हान्स होत आहे.याचा त्रास हा सभ्य समाजाला बसत असतो.वाममार्गाला लागलेले काही माथेफिरु लोक,आंतकी,गुन्हेगार,सायबर क्राईम,स्पेस क्राईम करणारे, इंटरनेट डाटा चोरी,वेबसाईट हैक करणारे गुन्हेगार,त्याच प्रमाणे समाजव्यस्था,अर्थव्यवस्था,देशांतर्गत संबंध,परराष्ट्धोरण बिघडविणारे छुपे गुन्हेगार,राजकीय,सामाजिक कायदा व सुव्यवस्था खराब करणारे गुन्हेगार हे गुप्त व सांकेतिक बोली भाषांचा *कोड लॅग्वेज*चा वापर करतात.या सांकेतिक व गुप्त भाषेतील संदेशपध्दतीचा वापर गैरमार्गाकरता,दुष्ट व अहितकारी ,अमानवीय कामाकरता करतात हे मोठया प्रमाणात आज २१ व्या शतकात दिसून येते.

तरी या गुप्त व सांकेतिक भाषेचे स्वरुप व तिचे मांडणी,ठेवण,इत्यादी बाबतचा अभ्यास हा आज २१ व्या शतकातील युवा पिधीला मुख्यत्वेकरुन पोलीस व संरक्षण यंत्रणा,विभागातील लोकांना असणे नितांत गरजेचे आहे असे मला वाटते.त्यामुळे या गोष्टीबददल व विघातक कार्याबददल आगाऊ माहिती मिळून होणारा अनर्थ वेळीच टाळता येतो.मदत होते यात शंका नाही.रॉ,के.जी.बी.,अमेरिकन गुप्तचर एजन्सी,इंटरपोल या सुरक्षायंत्रणांना गुप्त व सांकेतिक भाषेचे ज्ञान पूर्वी जितके गरजेचे होते तेवध्देच ते आज २१ शतकात भारतात व जगात शांतता,सोहार्द,बंधूता सामजिक एकोपा व विश्वबंधूत्वाचा नारा बुलंद करणेकामी महत्वाचे आहे व जगात शांतता टिकविणेकामी जगाने एकजुट होणे गरजेचे असून या गुप्त व सांकेतिक भाषेच्या अभ्यासांला व ज्ञान मिळविणेकामी चालना मिळणे जगाचे व भारताचे हिताचे होईल यात शंका नाही असे मला वाटते.

भारतातील आदिवासी व मागासवर्गीयाची व्दिभाषिक लोकसंस्कृती विदयमान आहे. येणे प्रमाणे या जमातीतील गुप्त व सांकेतिक भाषा व त्याच्यां मातृभाषा या प्रचलित आहेत.

| अ.नं. | जनजाती-जमाती | मातृभाषा | गुप्त- सांकेतिकभाषा |
|---|---|---|---|
| १. | भिल्ल | भिल्ली | पारसी |
| २. | तडवी | तडवी | जंगली |
| ३. | पावरा | पावरी | भूंगाती भाषा |
| ४. | मांग | मांगी | अंबुजी |
| ५. | राजपूत भामटा | रजपूती | डागुरी |
| ६. | शिकलगर | शिकलगरी | जड भाषा |
| ७. | बंजारा | बंजारी | तांडी भाषा |
| ८. | गोंधळी | गोंधळी | करपल्लवी |



तरी सरकारने या भारतातील व महाराष्ट्ातील आदिवासी जमाती व इतर ज्या जनजाती आहेत त्यांचेतील गुप्त व सांकेतिक भाषेच्या अभ्यासाला चालना दयावी व मदत करावी. प्रोत्साहन दयावे हे देशहिताच्या दृष्टीने योग्य आहे.

गुप्त व सांकेतिक भाषेचे येणे प्रमाणे प्रकार आहेत

१.गुप्त सांकेतिक बोली भाषा
२. देहबोली भाषा
३.करपल्लवी भाषा
४.चित्रलिपी भाषा
५.सांकेतिक अंक भाषा
६. गुप्त सांकेतिक मिश्र अंक व शब्द भाषा
७.मिताक्षरी

गुप्त व सांकेतिक भाषेची येणे प्रमाणे प्रकारचे थोडक्यात विवेचन आहे.

**१.सांकेतिक व गुप्त बोली भाषा :-**

आदिवासी जमातीत गुप्त व सांकेतिक भाषा ही प्रचलित आहे.थोडया कमी शब्दांत व वाक्यांत गुप्त संदेशाचे मदतीने या बोलीव्दारे वहन केले जाते. सदरची भाषेत अनेक नैसर्गिक व अनैसर्गिक बाबीचा समावेश करण्यात येते. त्यात प्रामुख्याने फळे,पाने,फुले,पक्क्षी,पक्क्ष्यांचे विविध आवाज,इत्यादीचा अंर्तभाव असून त्याच प्रमाणे नियमित प्रमाणे जी व्यवहारात बोलली जाणारे भाषे प्रमाणेच जी लपवून ठेवलेली व गुप्त स्वरुपात असलेली ही गुप्त भाषा अशा प्रकारे आपल्या एका विशिष्ट सामाजिक समूहाकडून नेहमी वापरण्यात येते.

**२.देहबोली भाषा :-**

या गुप्त व सांकेतिक भाषेला बॉडी लॅग्वेज असेही म्हणतात. मानवाच्या शरीर अवयाच्या सहायाने व मदतीने एखादा गुप्त व सांकेतिक संदेश हा वहन करण्यात येतो.यात प्रामुख्याने डोळयांचा ,भुवईचा,ओठांचा,हाताचा,पायांचा,अशा विविध खूणाव्दारे हे गुप्त संदेशवहन केले जाते. भारतीय लोकनृत्याव्दारे साहित्यातील व

पुराणातील एखादी कथा देखील सांगीतली जाते. उदा.रामायण,महाभारत,दुर्गा,शंकर रुद्रावतार हे लोकनृत्याव्दारे सांगीतले जातात उदा.दक्षिणकडील कथक,कथकली नृत्यप्रकार हे होय.

**३. करपल्लवी भाषा:-**

गुप्त व सांकेतिक करपल्लवी याभाषेमध्ये प्रामुख्याने दोन्ही हातांच्या पंज्यांचा व त्याच प्रमाणे दाही बोटाच्या खूणांव्दारे या करपल्लवी गुप्त भाषेचा उपयोग केला जातो व एखादा गुप्त संदेश पोहचविला जातो वहन केला जातात.करपल्लवी ही बोटांव्दारे दिशानिर्देश करुन एखादा गुप्त संकेत देण्याचे आपले इच्छीत ध्येय साध्य करीत असते.उदा.गोधळयाच्या हाताच्या खाणाखूणाची एक स्वतंत्र वर्णमाला तयार केलेली आहे. या वर्णाचा बोध करुन देणा-या हाताच्या खूणांना *करपल्लवी*असे म्हणतात.उदा.अ-अंगठा,ह-विळा,क-करंगळी,ख-स्वर्ग,ग-गगन,घ-घंटा,न-नख,च-चल,छ-छत्र,ज-जमली पांच बोटे,२एक वाकडे बोट,ल-दोन वाकडी बोटे या सांकेतिक खूणांमध्ये फक्त वस्तूंच्या खूणा नाहीत तर इतरही संकेत असतात. ही करपल्लवी गुप्त भाषेचाच एक नमुना आहे.

**४.चित्रलिपी भाषा :-**

एखादया पेंटीगव्दारे तथा चित्राव्दारे गुप्त व सांकेतिक भाषा संदेश पोहचविण्याचे काम केले जाते. सदरची ही बोली चीन व जापान येथे उगम पावलेली असावी व आजही ती तेथील मुळ चिनी व जापानी भाषेची जननी म्हणून ओळखली जाते. सदरची ही गुप्त व सांकेतिक भाषा देखील चिनी व जापानी या लोकांनी गुप्त ठेवलेली आहे.सदरची गुप्त भाषा ही बोध्दकालीन सभ्यता पासून विदयमान आहे.या चित्रलिपी गुप्त संदेश वहन केले जातात याचे उदाहरण म्हणजे लिओ नार्डो-द-विंची यांची पेटीग आहेत.

**५. गुप्त व सांकेतिक अंक भाषा :-**

या गुप्त भाषेत १,२,३,४,५,६,७ ते १० पावेतो आकडेमोड केलेली असते . या अंकाच्या अनुषंगाने एखादा गुप्त संदेश देण्याचे काम हे केले जातात.

६. सांकेतिक मिश्र अंक व शब्द भाषा :-

यात प्रामुख्याने अंक १ ते १० तसेच शब्द अ,ब,क,ड इत्यादी बाराखडीनुसार शब्द असतात त्याचे सहायाने व मदतीने एखादा गुप्त संदेश लिहून



तो प्रासारित करण्यात येतात याला कोडवर्ड म्हणून देखील संबोधण्यात येतो त्या गुप्त संदेशाचे वहन हे याव्दारे केले जाते. आज २१ व्या शतकात स्पर्धा परिक्षा देणा-या विदयार्थ्यांना याचा अभ्यास हा देण्यात आलेला आहे ही आनंदाची बाब आहे.

**७.मिताक्षरी :-**

भारतात अशा सांकेतिक गुप्त भाषा आणि लिपी यांचे प्रयोग हे फार प्राचीन काळापासून रुध असल्याचे आध्ळते.मिताक्षरी बहुधा प्रियकर व प्रेयसी परस्परांना गुप्त संदेश पोहचविण्याकामी सदरची गुप्त भाषा उपयोजीत असत. उदा.भिल्लाचे वंशज असलेली आदिवासी तडवी भिल्लाची देखील अशीच प्रकारची प्रियकर व प्रेयेसी परस्परांना *जंगली* या आदिवासी तडवीच्या गुप्त भाषेचा गुप्त संदेश देण्याकामी उपयोग करित असतात.

**गुप्त भाषा व सांकेतिक भाषेचे ठळक वैशिष्टये :-**

१. वैशिष्टयेपूर्ण रचना करुन गुप्तपणे पदयरचनेतून गुप्त संदेश पोहचविण्याची पध्दतही महाराष्टात होती असे दिसते. *विजापूरचा सरदार निघाला आहे*.हा संदेश समर्थरामदासांनी छत्रपती शिवाजी महाराजांना पाठविलेल्या पदयस्वरुप पत्राामधून कळविला होता. ओव्यांचा पहिल्या चरणांचा आदयक्षरांना एकापुध्े एक वाचले तर संदेश तयार होतो असे पत्र स्वामी रामदासांनी राजांना पाठविले होते.

२. जवळ जवळ सगळया विमुक्त भटक्या व मागासवर्गीय तसेच आदिवासी जाती जमातीतील लोकजिवनात सदरची गुप्त व सांकेतिक भाषा रुध आहे.या जनजाती व जमातीत अशाप्रकारे स्वतंत्रापणे व्दिभाषिक लोकसंस्कृती जीवनसरणी दिसून येते.तशी ती प्रादेशिक भाषांमध्ये स्वतंत्रपणे गुप्तभाषा दिसून येत नाही.सदरची गुप्तभाषा संकेत हे अनौपाचारिक पध्दतीने तयार केलेले असतात.

३. १३ व्या शतकात विसोबा खेचर यांनी सराफी व्यवसायातील काही सांकेतिक शब्दांचा अंभगात उपयोग केला आहे.ही सांकेतिक भाषा व्यापारात रुध होती. नंद म्हणजे दलाल आणि नंदकी म्हणजे दलालांचे वेतन. बाजारात व्यवहार करतांना या सांकेतिक बोलीचा उपयोग करतात.उदा.केवली-एक,अबारु-दोन,उथनू-तीन,पोळू-चार,मुळू-पांच,शेली-सहा-पवित्र-सात,मंगी-आठ,नेवसू-नऊ,अंगळू-

दहा,एकडू-अकरा,रेप्पी-बारा,तेपरु-तेरा,चोमडू-चोदा,तळी-पंधरा, तळी या शब्दांपूर्वी एक,दोन,तीन, शब्द वापरुन सोळा,सतरा हे शब्द बनवतात.

४. कैकाडयांचे परंपरेने चालत आलेले अनेक व्यवसाय असले तरी पूर्वी ही जमात चोरी करणे हा त्याचा व्यवसाय होता.असे इंग्रजांनी म्हटले आहे.त्यांचे सांकेतिक भाषा संबंधी तत्र विकसित केलेले आहेत.ते सन १९०८ मध्ये मुंबई इलाख्यातील सरकारने आपल्या प्रसिध्द केलेल्या *नोटस ऑन क्रिमिनल क्लासेस इन द बॉम्बे प्रेसिडन्सी* या ग्रंथात दिलेली आहे. काही सांकेतिक संदेश येणे प्रमाणे आहेत.

अ. पोलीस आले असे सांगावयाचे असेल तर रातकिडयासारखा आवाज करणे.

ब. पळून जा किंवा पांगा हे सुचविण्याकामी तोंडावर पंजा ठेवून घुबडासारखा आवाज किंवा कोल्हयासारखा आवाज काध्णे.

क. घरात चोरी करीत असलेल्या साथीदाराला कुणी तरी येत असले बाबत सावध करणेकामी,रात्रीच्या वेळी,- मांजरीचा किंवा मेंधीचा,दिवस असतांना आवाज काध्णे.

ड. दोन रस्ते एकत्र येतात अशा ठिकाणी आपण कोणत्या दिशेने गेलो हे दर्शविण्याच्या संकेत रेघोटयांच्या किंवा पावलाच्या खूणा करणे किंवा झाडाच्या फांदया विशिष्ट प्रकारे टाकून दिशानिर्देश करणे इत्यादी.

५. प्रादेशिक भाषेत उदा.संस्कृत,तमिळ,मराठी,गुजराथी या मातृभाषासह गुप्त व सांकेतिक भाषा ही विदयमान नसते.तर गरज व आवश्यकतेनुसार लिपीव्दारे सदरचे गुप्त संदेश देण्याचा परंपरा आहे.परंतु आदिवासी जनजाती व जमातीत मातृभाषासह गुप्त व सांकेतिक भाषा ही दोन्ही लोकसंस्कृती विदयमान असते परंतु ती मौखिक रुपात असून पूर्णपणे स्वतंत्र रुपात ती आदिवासी जीवनसरणीत व लोकसंस्कृतीय समाज जीवनात जीवंत असते व ती आदिमाची जीवनाचा एक भाग असते असे दिसून येते.या लोकसंस्कृतीय भाषेला लिपी नसते. परंतु अलीकडे २१ व्या शतकात काही संशोधक व लेखकांमुळे ती लिपीबध्द होत आहे. ही आनंदाची बाब असल्याचे दिसून येते.



प्रकरण ७

# सातपुडयातील आदिवासी व तडवी भिल्लाची व्दिभाषिक लोकसंस्कृती

**स्वरुपः-**

जगात २७८६ बोली भाषा असून भारतात २८४ भाषा व १६५२ बोली भाषा प्रचलित आहेत. तसेच आफ्रिका खंडात ५०० च्या वर आदिवासी भाषा हया बोलल्या जातात. परंतु दरवर्षी आदिवासीच्या काही व्दिभाषिक परंपरा व संस्कृती मर्त्य,लुप्त होतांना दिसतात.या परिस्थितीला आजची समाजव्यवस्था तसेच आर्थीक व राजकीय परिस्थिती व प्रत्येक समाजातील पांध्रपेशी समाज हा काही प्रमाणात दोषी आहे.

भारतात वसणा-या आदिवासी उदा. 'भिल्ल,तडवी, पावरी, कोलम, संथाल,मुंडा, हो, बंजारा, इत्यादी जमातीचे आस्तित्व हे आज धोक्याच्या वळणावर आहेत.डॉ.गणेश देवी या भाषा संशोधकाच्या मताने आजच्या परिस्थितीत भारतातील आदिवासी व मागासवर्गीयाच्या,अल्पसंख्याकांच्या भाषा हया हळूहळू मृत्यूच्या जवळ

जात आहे. वेळीच खबरदारी न घेतल्यास या भाषा कायमच्या मर्त्य होतील. भारतातील हा भाषांसंहार रोखण्याकरता वेळीच पावले उचलली जावीत. नाहीतर आदिवासी जमातीसह त्याचे भाषाही या अगोदरच्या हजारो बोली भाषा या त्यांचे जमातीसह कायमच्या मुक होवून इतिहासजमा होतील यात शंका नाही.या भाषा प्रादेशिक भाषा समृध्द करतात. हेही जनतेने विसरु नये.

व्दिभाषिक जीवनसरणी व लोकसंस्कृती म्हणजे आदिवासी याची एक जन्मजात जी भाषा बोलतात ती मातृभाषा व दूसरी त्याची संस्कृतीची गुप्त-सांकेतिक भाषा होय,यालाच आदिवासीची व्दिभाषिक लोकसंस्कृती म्हणतात तसेच जीवनसरणी होय.

व्दिभाषिक लोकसंस्कृती व जीवन परंपरा ही प्रादेशिक लोक जीवनात व भाषेतआध्ळत नाही. अर्थात भारतातील भाषा उदा.मराठी,गुजराथी,तमिळ,संस्कृत,इत्यादी व जगातील भाषा इंग्रजी,रोमन,लॅटीन,जर्मनी,फ्रेंच,रशियन या भाषांना गुप्त-सांकेतिक स्वतंत्र अशी व्दिभाषिक लोकसंस्कृती दिसून येत नाही.बहुतेक जगात कदाचित अपावादात्मक स्थितीत ती असू शकते असे मला वाटते.म्हणून आदिवासीची ही व्दिभाषिक लोकसंस्कृती अत्यंत बहुमोल आहे व तिचे आस्तित्व टिकविणे व ती २१ व्या शतकाच्या आजच्या नव्या पिधीला कळणे व ग्रंथित ,लिपीबध्द होणे ही काळाची गरज आहे यात शंका नाही.

**कारणमिमांसाः-**

आदिवासीच्या मातृभाषा व गुप्त-सांकेतिक भाषा अशी व्दिभाषिक लोकसंस्कृती व जीवनसरणी बघीतली तर काही प्राचीन काळातील प्रचलित गूध लेखन व गुप्त भाषा हया जगात प्रचलित होत्या.त्याचा अभ्यास होणे हे देखील गरजेचे आहे. काही सांकेतिक भाषा हया नमुद प्रमाणे आहेत.

१.बॉडी लॅग्वेज

यात प्रामुख्याने मानवी हावभावाचे तसेच शरीराचे हालचालीचा उपयोग हा संदेश देणेकामी उपयोगात आणतात. त्याकरता डोळे,भुवई,कान नाक हात पाय याचा वापर संदेश देणेकामी करतात. काही प्राचीन नृत्यप्रकारात देखील याचा उपयोग करतात.

२.मिरर लॅग्वेज



याचा उपयोग हा प्राचीन काळी केला जाई. यात एखादा संदेश देण्याची परंपरा विदयमान होती.एखादया पेन्टीग मध्ये किंवा शिल्पा मध्ये याचा उपयोग लिपीव्दारे केला जात असे. प्रसिध्द चित्रकार लिओ नार्डो द विंची याने याचा वापर केला होता.

३.शिल्पभाषा

प्राचीन काळी शिल्पाव्दारे येणा-या पिधीला एखादा संदेश पोहचविण्याचे काम केले जात असे.यात किल्ला,दरवाजे,शिलालेख,पुतळे,खजिनातंत्र इ.चा माहिती संदेश गुप्त पध्दतीने सांगण्याची परंपरा होती.तसेच प्राचीन सभ्यतेत गुप्त संदेश हे पुध्च्या येणा-या पिधीला अवगत केले जात असे उदा.खजुराहोकालीन लेणी,अजिंठा,वेरुळ लेणी,तसेच बहुबलीची मुर्ती, मंदिरे,मसजिदे,पिरॅमिडे,ममी वगैरे व्दारे संकेत प्रसारित करणेचे व जतन केलेचे काम केले जात होते.तसेच प्राचीन काळी लावणेत आलेले वैज्ञानिक शोध देखील गुप्त संकेताव्दारे पुध्च्या सभ्यतेला अवगत व्हावी म्हणून प्रसारित केलेली असत.

४.चित्रलिपी भाषा

प्राचीन काळी याचा वापर होत असे.विविध चित्राव्दारे एखादा संदेश पोहचविण्याची परंपरा होती. जगात व भारतात विविध प्रकारचे गुहेतील ,भिंतीवरील चित्राव्दारे संदेश प्रसारित होत असत.प्राचीन मानवाने येणारे पुध्च्या पिधिसाठी हे संदेश दिलेले होते.उदा.अजिंठा लेणीतील चित्रे, जापानी सभ्यता,बोध्दसभ्यता,खजुराहोकालीन सभ्यता .तसेच जगप्रसिध्द तेलचित्र उदा.विंचीची मोनालिसा.त्याचप्रमाणे एन्शन ग्रीक मध्ये गृहेतील व भिंतीवरील चित्रलिपी भाषेचा उकल करत जगातील काही संशोधकानी ब्राम्हांडातून पृथ्वीवर एलियन आले होते व त्यानी प्राचीन मानवाची मदत केली बाबतचा दावा केलेचे नुकतेच जाहिर केले आहे.परंतु जगाची याला मान्यता नाही.

आदिवासी व मागासवर्गीयाच्या काही मातृभाषा व गुप्त-सांकेतिक व्दिभाषा नमुद प्रमाणे आहेत.

| अ.नं. | जनजाती-जमाती | मातृभाषा | गुप्त- सांकेतिकभाषा |
|---|---|---|---|
| १. | भिल्ल | भिल्ली | पारसी |
| २. | तडवी | तडवी | जंगली |
| ३. | पावरा | पावरी | भूंगाती भाषा |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मांग | मांगी | अंबुजी |
| ५. | राजपूत भामटा | रजपूती | डागुरी |
| ६. | शिकलगर | शिकलगरी | जड भाषा |
| ७. | बंजारा | बंजारी | तांडी भाषा |
| ८. | गोंधळी | गोंधळी | करपल्लवी |

सातपुडयातील काही आदिवासी जमातीच्या सांकेतिक भाषांचा मी शोध घेत आहे.त्यात आदिवासी तडवीची *जंगली* भाषा ,पावरा याची *भूंगाती *भाषा व बंजारा याची *तान्डी *सांकेतिक भाषा होय. परंतु माझा शोध हा अंत्यत कमी प्रमाणात आहे. याला कारण म्हणजे या सातपुडयातील आदिवासी हे मनमोकळेपणाने बोलत नाहीत सांगत नाही परंतु मी या भाषांचा काहीप्रमाणात शोंध घेतला आहे मी लिहीलेले तडवी बोलीच्या शब्दकोशात सदरची जंगली गुप्त बोलीच्या काही वाक्याचा व शब्दांचा समावेश केला भविष्यात सातपुडयातील या गुप्त बोली भाषेवर स्वतंत्रपणे ग्रंथ लिहीणाचा मानस आहे

**आदिवासीची व्दिभाषिक लोकसंस्कृतीचे निष्कर्ष व उपाययोजना येणे प्रमाणे आहेत:-.**

१. आदिवासीची व्दिभाषिक लोकसंस्कृती टिकविण्याकामी त्यांची आर्थीक व समाजिक परिस्थिती सुधारली पाहिजे. आदिवासी माणसं,समूह व समाज हा जगेल,टिकेल त्याची प्रगती होईल तरच त्याची लोकसंस्कृती ,जीवनसरणी व त्यांची व्दिभाषिक परंपरा ही जिवंत राहील.

२. आदिवासी माणूस जगला तरच तो व्यक्त होईल म्हणून आदिवासी माणसं ,समूह व त्यावर आधारीत समाज जिवंत राहीला तर त्याची संस्कृती,भाषा,रुधी परंपरा,त्यांचे मौखिक साहित्य जीवनसरणी हया टिकतिल.म्हणून जगाचा व भारतातील भाषासंहार होण्यापूर्वीच त्याबाबतीत पाऊले उचलणे गरजेचे आहे यात शंका नाही.

३. गुप्त-सांकेतिक भाषा व मातृभाषा या व्दिभाषिक आदिवासी लोकसंस्कृतीचे परंपरेचे लोक जागर होणे महत्वाचे आहे.

४. आदिवासीचे व्दिभाषा ही अनमोल ठेवा आहे, तो जतन करणे आपले नैतिक कर्तव्य आहे.



५. संशोधक,अभ्यासक व लेखकांना आदिवासीचे व्दिभाषिक लोकसंस्कृती जतन करणेकामी प्रोत्साहीत करणे व त्याना सामाजिक व राजकीय आश्रय लाभणे हे सरकारचे कर्तव्य आहे. जेणे करुन आदिवासीचे भाषा हया आनादिकाळा पावेतो टिकतिल तरी त्या ग्रंथीत व लिपीबध्द होणेकामी मदत करणे शासनाचे ध्येय बनून त्यानी संशोधकाना लेखकांना मदत करावी. स्वतत्र विभागाची निर्मिती व्हावी.तसेच जिल्हास्तरीय भाषा विभागाची स्थापना जिल्हाधिकारीच्या अधिपत्याखाली निर्माण करावा.तसेच या विभागाच्या पारदर्शक कामकाजाकरता देखरेखी करता निवृत्त न्यायधिशाची नियुक्ती शासनाने करावी.

६. गूढलेखन परंपरेचे व गुप्त सांकेतिक भाषेचा वापराबददल आजच्या २१ व्या शतकातील नव्या पिधीला जागृत केले जावेत त्याचा उपयोग संरक्षण संस्थांना व गुप्तचर यंत्रणा बळकट करणेस मदतच होईल व ज्ञानात वृध्दी होईल यात शंका नाही.

७ २१ व्या शतकातील सायबर क्राईम,स्पेस गुन्हे,इंटरनेट डाटा चोरी,तसेच रॉ व अमेरिकन गुप्तचर एजन्सी, के.जे.बी.,इंटरपोल, इत्यादी जगातील संरक्षण व गुप्तचर यंत्रणा बळक्रट करणेवर हया गुप्त व सांकेतिक भाषातील ज्ञानाचा उपयोग होईल व मार्गदर्शन मिळून ज्ञानवृध्दी होईल व एकप्रकारे चालना मिळून समाज निकोप,निरोगी व बंधूता,प्रेम,सामाजिक एकोपा,टिकविणेकामी मदत होईल तसेच सोहार्द वाध्ेल व अविश्वासाचे वातावरण दूर होईल इतक्या या गुप्ता भाषा व सांकेतिक भाषाचे महत्व आहे व ते वेळीच जाणणे गरजेचे आहे.**

**सारांश:-**

आदिवासीची व्दिभाषिक सामाजिक जीवनसरणीतून प्राचीन सभ्यतेचा व संस्कृतीचा शोध व बोध तसेच धाडोळा घेतला जावू शकतो. तसेच उत्खननातून प्राचीन लिपी,शिल्प,लेणी तसेच मोठया प्रमाणात खजिनाचा शोध घेता येईल. तसेच सांस्कृतिकदृष्टया हे एक मौलिक असे पुरातत्वीय काम होईल.एकूणच मानवाचे पुर्वज व त्याची प्रगतीचा आलेख हा तपासता येईल. तसेच ब्राम्हांडात मानवी सभ्यतेचा देखील शोध लावता येईल. या व्दिभाषा लिपीबध्द होणे गरजेचे आहे.कारण इतर हाजारो भाषा प्रमाणे यासुध्दा लोप पावतील यांत शंका नाही.हा मौलिक मानवीय दस्ताऐवज आहे तो जतन होणे गरजेचे आहे.या सांकेतिक गुप्त भाषा भारतीय पुर्वज्यांनी

पुध्च्या पिधी करता जतन करुन ठेवलेला ठेवा आहे. उदा.चित्र,शिल्प,लेणी,मुर्ती हया आपणांस काहीतरी खुणवत असतात काहीतरी सूचित करीत असतात काहीतरी सांगत असतात.काही तरी संदेश देत असतात तसेच ते व्यक्तदेखील होत असतात, हे जाणून घेण्याची चाबी म्हणजे गुप्त व सांकेतिक भाषाचे ज्ञान होय.

*******



प्रकरण ८

# आदिवासी तडवीची *बारकरी* समाजपंचायत

**प्रस्तावना**

खान्देशात बारकरी ही आदिवासी तडवी जमातीची समाजमान्य पारंपरिक न्यायव्यवस्था होती. साधारणपणे वीस ते साठ गावांचा एक गट अशी विभागणी करुन या गावांचा सुव्यवस्थेची जबाबदारी असणा-या पंचमंडळास *बारकरी* म्हणून संबोधले जाई. या बारकरी मंडळाच्या प्रमुखाची निवड ही भिल्ल राजांकडून केली जात होती. कौटूंबिक,सामाजिक,तसेच आर्थीक अशा सर्वच प्रकारच्या तंटे व वादांची सुनावणी या बारकरी मंडळाकडून केली जाई. आजच्या न्यायव्यवस्थेइतकी सक्षम नसली तरी कडक कायदे नितिनियम व त्या नितिनियमांच्या पालनाची आदिवासीची नैतिकता ही उच्च क्षमतेची असल्यामुळे आजच्या अराजकतेकडे झेपावणा-या समाजाला आणि न्यायव्यवस्थेलाही दिशादर्शन करण्याची क्षमता या बारकरी समाजपंचायत परंपरेत असल्याचे आपणांस दिसते.

सातपुडयात अनेक आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. त्यात भिल्ल,तडवी,पावरी, या जमातीचा समावेश होतो. या आदिमांची एक वैशिष्टयेपूर्ण समाज परंपरा दिसून येते. एक प्राचीन लध्वय्यी जमात म्हणून तडवी या जमातीचा उल्लेख इतिहासात आहे. तडवी हे मुळत: भिल्लांचे वंशज आहेत. तडवीबददल अभ्यासकांना थोडेफार माहिती आहे. काही सामाजिक रुधी,पंरपरा,चालिरिती, सांस्कृतिक वैशिष्टयपूर्ण पध्दतीने ते कसे जगतात या बाबतीत अजूनही भारतातील जनता संभ्रमांत दिसतात.तडवी बददल संशोधन हे कमी स्वरुपात उपलब्ध आहे. मात्र आता त्यास गती देण्याचे काम नव्या अभ्यासकांनी करायला हवे. तडवीच्या अनेक प्राचीन सभ्यतापुर्ण चालिरिती व प्राचीन परंपरा हया काळाच्या पडदयाआड गेल्या आहेत. त्या लुप्त झालेल्या आहेत. निदान आता तरी त्यांची माहिती ही संकलित करुन तसेच लिपीबध्द करुन शासनास उपलब्ध करुन दिल्यास हे एक आदिमांबददल फार मोठे मौलिक काम होईल यात शंका नाही.

आदिवासी लोकपरंपरा,लोकमत या गोष्टी समाजाच्या न्यायदानाचा आधार आहे. त्या भागातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा ते आपल्या जीवनात उपयोग करतात. आदिवासी ज्या भू-भागात राहतात त्या भू-भागाबददल त्यांच्या मनात अतीव आत्मीयता असते. यामुळे त्यांच्यात संघभावना व ऐकोपा दिसून येतो. या संघभावनेत व एकोपात जर संघर्ष करणारी स्थिती काही मनुष्य स्वभावाने निर्माण झाली तर त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता आदिमांनी नियमन तथा नियंत्रण संस्था निर्माण केली. आदिवासीमध्ये समाज जातपंचायत ही सर्वमान्य तथा सार्वभौम सत्ता म्हणून ओळखली जाते. त्या जातपंचायतीमध्ये घेतजलेले सर्व निर्णय हे बंधनकारक असतात. या निर्णयावर आदिवासीची दृध्श्रध्दा असते. ही समाज पंचायत आदिवासीची पारस्पारिक व्यवहार तथा समाजातील चलनावर नियंत्रण ठेवणारी समाज व्यवस्था असून ती प्राचीन काळापासून पीधी दर पीधी चालत आलेली आहे. असे विव्दवानाचे मत आहे.अशीच एक समाज जातपंचायत आदर्श न्यायव्यवस्था *बारकरी * परंपरा म्हणून प्राचीन काळापासून आदिवासी तडवी भिल्ल समाजात होती.

आज २१ व्या शतकात भारत सरकारकडून तंटामुक्तीसाठीच्या धोरणात्मक योजना राबवल्या जात आहेत. सदरची ही तंटामुक्तीचे धोरणात्मक योजना ही सातपुडयातील आदिवासी तडवी भिल्ल जमातीने शेकडो वर्षापूर्वीच सुरु करुन



समाजव्यवस्था निकोप व सबळ करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. न्यायवृत्तीने ,डोळस बुध्दीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपल्या समाजात तंटामुक्तीचे समाजधोरण अगदी आदिम काळापासून राबवले जात होते. सदरची ही प्राचीन परंपरा समाजात *बारकरी परंपरा* म्हणून आदिम तडवी भिल्ल समाजात प्रचलित होती.आज जरी सदरची परंपरा लुप्त झालेली असली तरी तिचे महत्व आजच्या २१ व्या शतकात देखील पूर्वीसारखेच **आहे.**

**कारणमिंमांसा:**

१. इ.स.पू.३०० ते १७५०-१८०० च्या पाषाण युगापासून भिल्लाचे उल्लेख पुरातत्वीय व मानववंशा संशोधकांना आध्ळून आल्याचे दिसतात. याच भिल्ल संस्कृतीतून उपजून पुधे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत तडवी ही भिल्ल सरदाराचा एक गट,समूह किंवा कबिला हा स्वतंत्र होवून वेगळी सांस्कृतिक ओळख तडवीनी निर्माण केली. मात्र त्यांनी मुळ भिल्ल संस्कृतीचे संस्कार,रुधी,परंपरा ,चालिरितीचा त्याग केलेला नाही सोडलेली नाही. आपल्या समाजाचा जीवनव्यवहार म्हणून तडवी राजे व वतनदार यांनी सर्व प्रथम बारकरी परंपरेची सुरुवात समाजजीवनात सुरु केली.

२. तडवी राजे ,वतनदार यांनी समाजामध्ये सगळयांना योग्य तो न्याय मिळावा, तसेच न्यायदानाची प्रक्रिया व्यवस्थित चालावी कोणावरही अत्याचार,दुराचार होणार नाही याची विशेष काळजी घेतलेली दिसते. विशेष करुन महिलांना योग्य न्याय देण्यांत यावा व तिला काही प्रमाणात मान व स्वातंत्र मिळावे या हेतूने नियमावली करवून त्याची व्यवस्थित अंमलबजावणी करता यावी यासाठी बारकरी परंपरा स्थापीत झाली आदिमांचे सर्व नितिनियमे हे मौखिक व आलिखित स्वरुपाची दिसून येतात.

३. तडवी समाजामधील तंटे ,बखेडे ,सोडविणे कोणाचीही हक्कांची पायमल्ली होणार नाही याकरिता काळजी घेणे तसेच सर्वाना समान न्याय या तत्वासाठी बारकरी पंचमंडळ निर्णय घेवून योग्य तो न्यायदानाचा निर्णय घेत असे. त्याचे पालन हे जनतेने केलेच पाहीजे अशी सक्ती बारकरी परंपरेत असे.

४. घटस्फोट ,फारकत,पती पत्नीचे घरगुती तंटे,भांडणे,समाजातील लोकांच्या एकमेकांविरुध्दच्या तक्रारी यांचे निवारण करणारी समाज पंचायत म्हणजेच बारकरी परंपरा होय. या बारकरी परंपरेतून गावातील तंटामुक्तीचे धोरण राबवले जात असे.

५. बारकरी हा बारा किंवा साठ गांवाचा न्यायनिवाडा करणारा प्रमुख न्यायाधिश असे. समाज प्रमुख,सरपंच असे. बारकरीची निवड ही तडवी राजे व वतनदार यांचेकडून केली जाई. त्याने दिलेला निर्णय हा शिरोधार्य मानण्यात येई व त्याचे पालन सर्व तडवी आदिवासी जनतेला करावे लागत असे.

६. बारकरीच्या उदरनिर्वाहासाठी त्यांनी केलेल्या न्यायदानाच्या समाजसेवेबददल बारा गावातील आदिवासी लोक धान्य,पशू-पक्षी धन,तसेच बारकरी पंचमंडळाची शेती ही सामाजिक समूह श्रमदानाने कसून देणे, नांगरुन देणे आदि स्वरुपात बारकरीला मोबदला हा मिळत असे व दिला जाई.

७. तडवी समाज हा सातपुडयाच्या पायथ्याशी, चोपडा,यावल व रावेर, मुख्यत: वस्तीस आहे. चोपडयापासून ते असीरगड पावेतो सातपुडयाच्या परिसरातील तडवी वस्ती असलेल्या गावाची नऊ विभागात वाटणी झालेली आहे. अशी सुमारे १५० च्या आसपास गांवे आहेत. एका गटाला बा-हे ही विशिष्ट संज्ञा आहे.अशी नऊ बा-हे आहेत. बा-हेच्या प्रमुखास बारकरी म्हणून संबोधण्यात येई. बा-हाचे एक ठराविक मुख्य गांव असे. त्याच्या ताब्यात १२ ते ५० किंवा ६० गांवे ही असत.

८. खान्देशात प्राचीनकाळी बारकरीची ठिकाणी अत्यंत प्रतिष्ठित असे न्यायालय असत ती बारकरी सामाजिक पंचायत मंडळ होती. त्यात उदा. १.आभोडा ता.रावेर जि.जळगांव

२.आडगांव -कसारखेडा तालुका यावल जि.जळगांव ३. अडावद तालुका चोपडा जि.जळगांव ही ठिकाणी सर्वात मानाचे बा-हे हे यावल तालुक्यातील आडगांव येथील मानले जाई. त्याला मोठा बारकरी म्हणत.



९.सदरची ही प्राचीन परंपरा काळाच्या पडदयाआड गेलेली आहे. लुप्त झालेली आहे.परंतु आता पाडयांपाडयातून व गांवागांवातून ग्रामपंचायत व समाजपंचायत स्थापन झाल्यामुळे ही प्राचीन बारकरी परंपरा जवळजवळ संपल्यागत आहे.

**निष्कर्ष:**

१. प्रत्येक आदिवासी जमाती मध्ये एक समाज जातपंचायत असते. त्याची मदत घेवून आदिवासी आपल्या लहान मोठे झगडे,तंटे तथा गुन्हे समस्या यांचे बाबत न्याय मिळणे करता पंचायतीत जातात. आदिवासी आपल्या समाज जातपंचायतीवर पूर्ण विश्वास व श्रध्दा असते.

२. परंपरेनुसार रुधी,नियम विधी तथा समाजाने निश्चित केलेले अलिखित कायदे व नियमांचा पालन हे लोक करतात. याची सर्व खबरदारी ही समाजपंचायत जातपंचायत घेत असे.

३. आजच्या २१ व्या शतकात समाजात भ्रष्टाचार,स्वार्थी वृत्ती, अनैतिकता,दुराचार हे दुर्गूण दिसून येत आहेत.परंतु या आदिवासी जमातीत हे दुर्गूण दिसून येत नाहीत.त्यामुळे डोगर पहाडपट्टीत राहणारे अज्ञान व शिक्षणापासून दूर राहूनही ते सफलतापूर्वक जीवन जगतात या सर्व गोष्टीचा विचार केला तर आजचा सुशिक्षित समाज सुसंस्कृत आहे की आदिवासी सुसंस्कृत आहेत याचा विचार हा अंतरमुख होवून करण्याची पाळी ही आजच्या सभ्य मानव समाजावर आली आहे.

४. आदिवासी जीवनसरणीत बलात्कार,स्त्रीभ्रूणहत्या, व्यभिचार,अहंकार,असमानतावादी वृत्ती, बुर्जुगाचा व महिलांचा अपमान व अनादर होईल असे कोणतेही कृत्य व अवमान्यता या गोष्टी दिसून येत नाहीत.

५. एकंदरीत तडवी भिल्लांची बारकरी परंपरेसारखी मौलिक समाजव्यवस्थेचे महत्त्व आजच्या २१ व्या शतकात फार मोठया प्रमाणात जाणवेत यांत शंका नाही.

प्रकरण ९

# आदिवासी तडवी भिलांचा सामाजिक मागोवा व पार्श्वभूमी

इसापू सन ३०० ते १७५० वर्षापासून आदिवासी भिलांचे पुरावे हे संशोधकांना तसेच अभ्यासकांना मिळाले आहेत. मानवाच्या पुर्वजाचा जन्म हा आफ्रिकेतील जंगलात व द-याखो-यात झालेला असून असे डार्विनच्या सिध्दांतानुसार वाटते. आदिवासी हे या भारत देशातील अतिप्राचिनतम सभ्यता धारण केलेले मानवगण आहेत. भारतातील पहिले मानवगण म्हणून आदिवासी हे ओळखले जातात.तसेच आदिकाळापासून ज्यांचा या भूमित रहिवास आहे.तसेच ते एकच समान बोलीभाषा बोलतात. तसेच विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणा-यां व एकाच पुर्वजापासून जन्मलेलया व उत्पत्ती झालेले रक्तसंबंध असलेलया सामाजिक समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात. जिवनाची सुरुवात ही आदिवासी संस्कृतीतून पुढे उदयास येवून एक नवीन दिशा देणेचे काम या संस्कृतीने केलेले आहे. आदिवासी हे सांस्कृतिकदृष्टया संपन्न होते . संक्रमण काळातून जात असतांना आदिवासी भिलांमध्ये कालांतराने बदल होत गेलेत.



पृथ्वीच्या निर्मितीनंतर जो पहिला मानव व स्त्रि या धरतीवर जन्माला आली. त्यांचेपासून सर्वप्रथम आदिवासी जिवनाचे अंकुर बिंजारोपन होवून आदिवासी भिलांची एक पिधी जन्माला आली.सुरुवातीस उघडे-नांगडे फिरणारा स्वतं:चे शरिराचे अंगरक्षण करण्याकरिता जनावरांच्या कातडया व झाडे-झुडप्याच्या साली इत्यादीचा उपयोग तो करत असे. आदिवासी यांचे पोट भरणेचे पहिले खादय पदार्थ हे शाकाहारी होते. सुरुवातीस आदिवासी हे विविध फळे कंदमुळे व इतर नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग हा दैनंदिन उपयोगात करत असे.हळुहळू काळ जसजसा पुढे सरकू लागला तसतसा आदिवासीचे जिवनमानात बदल होवू लागले.दगड लाकडापासून तो आवजारे बनवू लागला.आगीचा शोध त्याला गवसला.तो निर्सगातील लहान मोठया प्राण्याची शिकार करु लागला.अन्न व इतर पदार्थ तो शिजवून खावू लागला. अशाप्रकारे तो पुढे मांसाहारी बनला. परंतु जिवन जगत असतांना त्याने आपले शाकाहारी पदार्थाचा उपयोग तो नेहमीप्रमाणे करतच राहिला.आदिवासी भिल ही डोंगरद-यात कपारीत राहणारी एक आदिम जमात आहे.आदिवासी हे लाकडापासून तसेच लोखंड व इतर धातूचा उपयोग करुन त्यांने शस्त्रे व अवजारे निर्माण केलीत.धनुष्यबाण हे आदिवासीचे प्रमुख व पारंपारिक शस्त्र असून ते त्याचे संस्कृतीची ओळख दर्शविणारे व जिवनमानातील अविभाज्य घटक आहे. आदिवासी हे शस्त्रांच्या सहाय्याने व इतर साधनांचा उपयोग करुन मासेमारी हरीण ससा व इतर प्राण्यांची शिकार तो करुन आपला उदरनिर्वाह हा करत होता.

**आदिवासी भिलांची भिल्ली व तडवी भाषेची उगमावस्था:**

आदिवासी यांना संक्रमण काळात जिवन जगतांना ऐकमेकांचे विचारांचे व कृतीचे अनुषंगाने भाषेची नितांत आवश्यकता भासू लागली. तो आपले भाव भावना व्यक्त करण्यांस धडपड करु लागला.हाताचे पंज्यांचे खुणांनी हातवारे करुन तसेच डोळयांचे व अंगविक्षेपाने तो आपलया भावना सांगण्याचा प्रयत्न करु लागला. जगाची पहिली भाषा कदाचित अशाप्रकारे निर्माण झालेली असावी. अशाप्रकारे आदिवासी यांनी भाषेची निर्मितीस प्रारंभ केला. भारतातील आदिवासी भिलांनी अशाप्रकारे जिवनव्यवहाराकरिता आपलया भिली भाषेची निर्मिती केली. डोंगरद-यात राहणारी व जिवन जगतांना आदिवासीची निरीक्षण क्षमता व बौध्दीक कुवत वाध्त गेली.याचा परिणाम असा झाला की निर्सगातील विविध पक्षी, प्राणी,जनावरे

व त्यांचे तोंडातून निघणारे विविध प्रकारचे आवाज हे तो तासंतास ऐकू लागला. निरीक्षण करु लागला.माकडाचे तोंडातून विविध समयी निघणारे आवाज उदा.सिंह, वाघ व इतर हिस्त्रप्राणी ज्यावेळी येतात त्यावेळी लहान प्राणी हे संकटाची पूर्वसूचना हे आपलया सहकारी प्राण्यांना विशिष्ठ प्रकारचा ध्वानी काढून देतात. या प्रकारचे निरीक्षण आदिवासी हा संकमण काळात सुरुवातीस करत होता.

अशाप्रकारे आदिवासी हे नैर्सगीक परिस्थितीचा मुकाबला करता करता व जिवन जगत असतांना व संकमणावस्थेतून जात असतांना आदिवासी भिलांनी प्रथमत: स्वत:च्या जिवनसरणीतून व निरीक्षण शक्तीने व कुवतीच्या सहाय्याने स्वतं:ची भिली भाषेची निर्मिती करायला सुरुवात केली.पुढे ती पुर्णत्वास आली. बोलण्या इतपत पुधरली. व पुढे ही एक सक्षम जिवनव्यवहाराची व संस्कृती रक्षणाची भाषा म्हणून आदिवासी भिलांनी हिला महत्त्व देण्यात आले आहे.आपलया संस्कृतीचे संरक्षणाकरिता ही भाषा नंतर गुप्त ठेवण्यात आली. तसेच हिचे जे सुधारलेले व प्रगत असे जे रुप होते.तिचे रुपांतर व्यवहारातील तसेच जीवन जगण्यास साहाय्य होणारी भाषा निर्माण झाली ति आदिवासी भिलांची भिली भाषा होय.परंतु हिचे सुरुवातीची व संकमणावस्थेतील भाषा ही भिलांची सांकेतिक भाषा म्हणून निर्माण झाली. सदरची सांकेतिक भाषा ही भिलांनी लपवून ठेवली ही गुप्त व सांकेतिक भाषेचा उपयोग ही भिल जमात संकटसमयी तसेच परिस्थितीनुरुप काळात करु लागली. [ आदिवासी भिलांच्या या सांकेतिक व गुप्त भाषेबददल सविस्तर विवेचंन हे पुढे स्वतंत्र प्रकरणात करण्यांत आलेले आहे.]

अशाप्रकारे आदिवासी भिलांची भिलली भाषा, तडवी भिलांची तडवी भाषा निर्माण झाली.तडवी व भिलली भाषेचा मागोवा घेतलयास भारतातील अतिप्राचीनतम भाषा म्हणून या भाषा ओळखलया जातात.यांचे पुरावे प्राचीन ग्रंथात मिळतात.इसापू सन २०० ते ३०० काळांत या भाषेचे अस्तित्व होते.भारतीय पुराणात तसेच इतिहासात हिचे मुळे आपणांस सापडतात.भिलली भाषा गुजराती भाषेपासून निर्माण झालेली असावी असे भाषातज्ञ ग्रिअरसनचे मत आहे.तर सर जॉन मालकमच्या मते पठारावरील भिलांची ती एक स्वतंत्र भाषा आहे.त्याचप्रमाणे मुळ भिलल संस्कृतीतून उपजून स्वतं:ची वेगळी ओळख निर्माण करणारी सातपुडयातील तडवी भिलांची तडवी भाषा ही अशीच एक स्वतंत्र भाषा आहे.या



भाषेचे एक वैशिष्टे आहे.ग्रामीण साज व गोळवा तसेच रित लहेजा आहे.बोलण्यामध्ये अनेक छटा व विविधता आहे.या भाषेतून तडवी या आदिवासी जमातीचे अंतरमनाचा वेध घेणारी ही एक नाविन्यपुर्ण भाषा आहे.हिचे उचारण्याची एक वेगळी पध्दत व ग्राम्य ठेका आहे.सर्वाचे पटकन लक्ष वेधून घेवून आदिवासीचे जिवनमानाची ही भाषा प्रतिक होय तडवी या भाषेवर मुंडा,तमिळ,मराठी,,कानडी,तोडा,अरबी, नेमाळी,उर्दू इत्यादी भाषेचा थोडाफार प्रभाव हा जाणवतो.

ध्वनी उच्चारण्याची शक्ती जशी नैसर्गिक आहे तशी शब्दरचना व वाक्यरचना ही नैसर्गिक नाही.ती मनुष्यकृत आहे.यात निरीक्षण, अनुभव, तर्कशक्ती, वैचारिक क्षमतेतून निर्माण झालेले विचारमंथन याचाही वाटा महत्त्वाचा आहे.या मतांमध्ये शब्दरचना व वाक्यरचना ही निरंतर अकलन शक्तीचे व संकलन पध्दतीनुरुप व जिवनाभुवातून हळुहळू निर्माण झाली. अशा पध्दतीने निर्सगातील प्राणी,पक्षी,व इतर नैसर्गिक घटकांचा ध्वनी,आवाज, जिवनव्यवहार, जगण्याची सवयी व खाणेपिणे इत्यादी संपूर्ण जगात सारखेच आढ्ळून येतात.परंतु भाषा मात्र सारखी आढ्ळून येत नाही.याचा देखील विचार करणे गरजेचे आहे.जगातील आदिवासीचा विचार केलयास अशी वेगवेगळी भाषाभिन्नता कशी निर्माण झाली त्या मागची कारणमिंमासा कोणती इत्यादी बाबतीत देखील विचारमंथन होणे गरजेचे आहे. जगातील तसेच भारतातील पहिले मानवगण अर्थात आदिवासी जमातीने पहिली भाव भावनाचे आदानप्रदानाकरिता सर्वप्रथम भाषेची निर्मिती केली असावी याबाबतीत समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ ा, विव्दानांमध्ये मतभिन्नता आहे.भाषा कशी निर्माण झाली व ती कोणी केली व कोणत्या प्रदेशात जन्माली याबाबतीत अनेक मतप्रवाह असून आजतरी आमचे जवळ यांचे सबळ असे स्पष्टीकरण करता येणेजोगे नाही.याचे समाधानकारक उत्तर आमचेजवळ नाही. भाषेची उगमावस्था व जन्मावस्था शोधून काढ्णे हे भाषातज्ञ व संशोधका समोर मोठे आव्हाण आहे. याबाबतीत अधिक संशोधन होणे काळाची गरज आहे.

जगात ज्या भिन्नभिन्न भाषा आहेत त्या निरनिरोळया देशातील व खंडातील लोकांच्या उत्कांतीचा क्रम दर्शवितात.असे मानववंशशास्त्रज्ञांचे व संशोधकांचे, अभ्यासकांचे मत आहे.परंतु जगातील पहिली भाषा ही नागरी संस्कृतीतून उदयास न येता तिचे मुळे ही आदिवासी संस्कृतीत आहेत.असे म्हटलयास वावगे होणार नाही.

किंबहुना आदिवासी संस्कृतीने सर्वात प्रथम भाषेची निर्मिती केली.ती एक उत्क्रांती अवस्थेतील जिवनसरणीतून निर्माण झालेली जिवनवाचक, अनुभववाचक ,स्वभाववाचक इत्यादी संज्ञेतून उदयास आली असावी हे स्पष्टपणे सांगावयास वाटते. हळुहळू नागरी संस्कृतीच्या तसेच इतर संस्कृती त्याचबरोबर आर्य संस्कृती यांचे आदिवासी संस्कृतीवर आक्रमणे व शिरकाव झाला. या परिणाम आदिवासीवर झाला. काहीनी त्यांचेशी दुरभावनाने हिन वागणूक दिली. तर काहीनी त्यांचेशी समन्वयाची भुमिका ठेवून परस्परांचे नाते जुळवून सलोखा प्रस्थापित करुन आपलया संस्कृतीचे व इतर बाबतीत परस्पर संबंध दृध करण्यांवर भर दिला. व आपलसं केलं. या बाहेरील संस्कृतीचा आदिवासी भिलांच्या भिलली व तडवी यांचे तडवी भाषेवर यांचा चांगला प्रभाव व परिणाम दिसून आला.

भारतामध्ये २८४ भाषा आणि १६५२ बोली भाषा प्रचलित आहेत. त्याचप्रमाणे जगामध्ये २७८६ बोलीभाषा हया अस्तित्वात आहेत.त्याचप्रमाणे अमेरिका व आफ्रिकेतील विविध आदिवासी जमांतीमध्ये ५०० पेक्षा अधिक बोली भाषा हया बोललया जातात.भारतापुरता विचार करता ज्या प्राचिन आदिम जमाती भारतात अस्तित्वात आहेत.त्यांची विशिष्ट प्रकारच्या बोली भाषा हया प्रचलित आहेत.उदा.आदिवासी भिलांची भिलली भाषा.त्याचप्रमाणे भिलल संस्कृतीतून निर्माण होवून आपले स्वतंत्र अस्तित्व जपणारी आदिवासी तडवी भिलांची भाषेला तडवी भाषा म्हणून संबोधतात. त्याचप्रमाणे गोंडाची गोंडी भाषा, कोलामांची कोलामी भाषा, पावरांची पावरी भाषा इत्यादी बोलीभाषा भारतीय आदिवासी जमातीमध्ये बोललया जातात. महाराष्ट्र राज्यापुरता विचार केला तर येथे वसलेले पारधी,वारली,ठकार,कोकणा,कातकारी,भिलल ,कोकरु, मलल , तडवी इत्यादी जमातीचे जमात परत्वे वेगवेगळया बोली भाषा आहेत.

भारतामध्ये तसेच जगामध्ये असलेलया ज्या आदिम बोली भाषा अस्तित्वात होत्या हळूहळू कालातंराने त्यांचे जतन, सवंर्धन व लिपीबध्द नसलयाने व त्या केवळ मौखिक स्वरुपात असलयाने तसेच भौगोलिक ,नैसर्गिक व काही सामाजिक कारणामुळे व अचानकपणे उदभवणारे स्थित्यतंरे ,प्रकोपामुळे यामधील काही आदिम आदिवासी बोली भाषा या काळाच्या ओघात लुप्त झालेलया आहेत. परंतु आता मात्र चित्र पलटत आहे.काही मानववंशशास्त्रज्ञ ,समाजशास्त्रज्ञ व लेखकांच्या



प्रयत्नांमुळे या आदिम आदिवासी जमातीतील काही बोली भाषांच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळून ती जिवंत ठेवण्यांचा व लिपीबध्द करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे.ही आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे. नजीकच्या काळात यांचे चांगले परिणाम समोर येतील व प्रमाण भाषेला अनेक नवनवीन शब्द मिळतील त्याचप्रमाणे नागरी संस्कृतीतील प्रमाण भाषा अधिकाधिक समृध्द व सदृध होईल असे वाटते.त्याचप्रमाणे सदरंच्या बोली व आदिम आदिवासी जमाती हया काळाच्या ओघात लुप्त न होता त्यांचे जिवंत अस्तित्व हे भाषेच्या व आदिवासी संस्कृतीचे जिवंत आरसा म्हणून पुधील युगात लाभदायक होईल. जगामध्ये भाषेची उत्पत्तीची जर कारणमिंमासा केली तर प्रामुख्याने दिसून येते की, त्या त्या भौगोलिक परिस्थितीनुसार व विभागाप्रमाणे कशी झाली आजची जी प्रगत व लिपीबध्द नागरी भाषा प्रत्येक देशामध्ये ज्या ज्या वेगवेगळया त-हेने बोलली जातात.त्याचा जर शोध घ्यावयाचा असेल तर आपणांस त्या त्या देशांमध्ये, खंडामध्ये वास्तव्यास असलेलया आदिम जमातीच्या अर्थात आदिवासी जमातीच्या बोली भाषेचा अभ्यास करण्याव्यतिरिक्त पर्याय नाही.बोली भाषा हीच प्रगत व नागरी संस्कृतीतील लिपीबध्द भाषेची प्रमाण भाषेची जननी असावी असे मला वाटते.

**आदिवासी भिल्ल आणि तडवी भिल्ल सामाजिक मागोवा:**

भिल्लांचा उल्लेंख भारतीय सांस्कृतिक जीवनात दिसतात.त्यांचप्रमाणे अनेक प्राचीन ग्रंथात त्याचा उललेख आध्ळून येतात. त्यात प्रामुख्याने रामायण,महाभारत,शिवपुराण,तसेच संतवाङ्मयात त्याचप्रमाणे मौखिक स्वरुपात तसेच लोकवाङ्मयात भिललाचे उललेख दिसून येतात.यात सांगावयास वाटते की, तडवी भिलल ही भिलल संस्कृतीतून निर्माण झालेली व पुधे जावून आपले स्वतंत्र आस्तित्व जपणारी आदिवासी जमात आहे.तडवीचे जीवनसारणी व त्यांचे पिध्यांपिध्या चालत आलेलया रुधी,परंपरा,चालीरिती,यांचे आपले वेगळेपण व वैशिष्टे प्रामुख्याने दिसून येतात.अशा वैशिष्टेपुर्ण सामाजीक जीवन जगणा-या आदिवासी तडवी जमातीचे आकर्षने बघून अनेक लोक व अभ्यासक,संशोधक आकर्षीत होत आहेत. व या जमातीवर संशोधन होत आहेही बाब स्वागर्ताह व आनंदाची आहे.आदिवासी जमातीचा शोध घेतांना काही पौराणीक संदर्भ पडताळून बघीतले. भारतीय जीवनसरणीत या पौराणीक कथा व दंतकथाना एक वेगळे महत्व आहे परंतु संशोधकाच्या व अभ्यासकांच्या

दृष्टीने यांना मान्यता नसली तरी देखील भारतीय समाजमनात या गोष्टीना दिलेले महत्व व आजतागायत भारतीय मनातील अध्ळ स्थान त्यामुळे देखील याचा उललेख हा काही प्रमाणात केलयास गौण व गैर काही नाही असे मला वाटते.

____ प्रभू श्रीरामचंद १४ वर्ष वनवासात असतांना सितामाता हरणानंतर शोधाशोध करत घनदाट अरण्यातून जात असतांना शबरी भिललीणीची भेटगाठ होते. सदरचा प्रेमाचा व हृदयद्रावक प्रसंग श्रीरामचरितमानस या ग्रंथामध्ये तुलसीदास यांनी केलेला आहे. श्रीरामाचे आगमन होताच शबरी ही स्वत:ला पुनीत झाली असे वाटते. श्रीरामाला जवळ बसवून मधुर व चवदार बोरे खायला मिळावीत या उत्कटभावनेपोटी शबरीमाता प्रत्येक बोर चाखून त्यात जे मधूर व चवदार चाखून चाखून बघत व उष्टी बोरं प्रभू श्रीरामाला दिलीत. शबरी ही शुद्र असूनही क्षत्रिय श्रीरामाने मनात कोणताही भेदभाव न ठेवता शबरीच्या मनातील शुध्दता बघून श्रीरामाने संकोच न बाळगता सदरची उष्टी बोरं खाललीत. हा सहिष्णुतेचा, प्रेमाचा मोल अमुलय असते. हे प्रत्यक्षकृतीने जगाला दाखवून दिलेत. शबरीचे मनातील निर्मळाता व उत्कटप्रेमाने प्रभू श्रीरामचंद्राला मनस्वि जिंकून घेतलेत.

महाभारतातील कैरातपर्वात उललेख दिसतो की, अर्जुन तप करण्यासाठी हिमालयाकडे निघतो. घनदाट जंगलात तप करणेस सुरुवात करतो. तेव्हा काही तपस्वी हे भगवान शंकराची आराधना करतात व अर्जुनाची तपशचर्या थांबविण्याची विनंती करतात. अर्जुन तपशचर्या थांबवतो. भगवान शंकर किरात वेष धारण करुन अर्जुनाच्या जवळ येतात बघतात तर अर्जुनाला मारण्यासाठी मुक नामक दनुपुत्र वराहरुप घेवून येतो. अर्जुन वराहाला ठार मारतो. त्यानंतर अर्जुन व किरात अर्थात भिलल वेष धारण केलेलया शंकर भगवान यांचेमध्ये घनघोर युध्द होते असा प्रसंग हा महाभारतातील कैरातपर्वात नमुद आहे. म्हणूनच शंकर भगवान हे आदिवासी भिललाचे प्रमुख देवता असलयाचे स्पष्ट होते तसेच भिलल हे पार्वतीला भिललीण मानतात. पार्वतीला भिललीण मानण्याचे पुरावे हे भारतातील लोकवाङमयात तसेच संत वाङमयात यांचे उललेख केलेले दिसून येतात. तसेच पार्वतीच्या भिलली रुपात फिरतानाचे वर्णन हे शिवलिलामृतात देखील सापडतात.

हिरण्यधनु नावाच्या निषाद राजाचा पुत्र एकलव्य धनुर्विदयेचे शिक्षण घेण्याकरिता द्रोणाचार्याकडे जातो. निषादपुत्र आहे म्हणून धनुर्विदया शिकवण्यास



द्रोणाचार्य हे एकलव्याला नकार देतात. तरीही एकलव्य हा त्यांनाच आपलं गुरु मानतो व त्याचा पुतळा बनवून त्यासमोर धनुर्विदयेचे धडे गिरवतो. व पारंगत होतो. एकदा कौरव-पांडव शिकारीला निघतात. त्यांच्या मागे एक पारधी आपलया कुत्र्यासह असतो. पारध्याचा कुत्रा हा एकलव्यावर भूंकत असतो. एकलव्य एका पाठोपाठ सात बाण सोडून त्या कुत्र्याचे भूंकणे बंद करतो. परंतु ते बाण एवध्या कौशलयाने सोडलेले असतात की, कुत्रा किंचितही जखमी न होता सर्व बाण त्यांच्या तोंडात बसवतो. हे दृशय बघून कौरव-पांडव चकीत होतात. गुरु द्रोणाचार्य हे आपलया आवडता शिष्य अर्जुना पेक्षा श्रेष्ठ धनुर्धेर जगात दुसरा कोणीही नसावा या हेतुने प्रत्यक्षात शिक्षा दिलेली नसतांनाही द्रोणाचार्य हे परिक्षेनंतर गुरुदक्षिणा म्हणून एकलव्याचा हाताचा अंगठा मागतात. एकलव्य ते खुशीने कापून गुरु द्रोणाचार्याचे चरणावर ठेवतो. अर्पण करतो. एकलव्य हा निषाद राजाचा पुत्र होता. मध्यभारतातील आदिवासी लोकांचा अजूनही निषादराज असा उललेख लोकवाङमयात ब-याच ठिकाणी दिसून येतो. आपलया भिलल समाजातील बहुतेक जन अजूनही शिकार करतांना बाण चध्वतात त्यावेळी अंगठयांचा वापर करित नाहीत. हे प्रत्यक्ष आदिवासी भिललांच्या जीवनसारणीतून दिसून येते. त्यामुळेच सांप्रतच्या भिललांच्या एकप्रकारे पुर्वजाचाच हा उललेख आहे असे दिसते.

प्रकरण १०

# आदिवासी तडवी कुळाचार व कुलप्रतिकवाद

**प्रस्तावनाः**

आदिवासी समाजातील जीवनमान संस्कृती ही जैविक,सामाजिक,आर्थीक,धार्मिक पूर्तता करण्याकरता रक्तसंबंधाधिष्ठत समूहच कटिबध्द असतात. तसेच रक्तनाते संबंधावर आधारित सामाजिक चलनवलन अवलंबून असतात. व ते आई व वडील यांचे रक्ताच्या नात्यांची उभारणी एकपक्षिय किंवा व्दिपक्षिय तत्त्वावर झालेली असते. आदिवासी तडवी परिसरातील आई व वडील या दोहोंच्या बाजूने ओळखल्या जाणा-या सर्व नातेवाईकांचा विचार हा व्दिपक्षीय तत्त्वावर आधारलेला आहे. याउलट केवळ आईकडून किंवा केवळ वडिलांकडून ओळखल्या जाणा-या आप्तांचा अर्थात रक्तसंबंधाचा विचार हा एकपक्षीय तत्त्वानुसार केला जातो. व्दिपक्षीय आप्तांचा समावेश परिवारात केला जातो तर एकपक्षीय आप्तांचा विचार कुलांमध्ये केला जातो.



तसेच सर्व मानवंशसंशोधक कुलाला *क्लेन* हा शब्द वापरतात. कुल हा एकपक्षिय आप्तसंबंधीयांचा समूह आहे. वांशिक दृष्टीने ते सर्व आप्त एकाच वांशिक गटातील असतात.कुलांमध्ये पितृवंशाचे नातेवाईक समाविष्ट केले जातात. गोल्डनवायझर यांनी मातृवंशा-धिष्ठित नातेवाईकाचा समूहाला *क्लेन* असे म्हटले आहे. तसेच पितृवंशाच्या नातेवाईकांच्या समुहाला *ज्नेस* असे म्हटले आहे. रॉबर्ट लुई यांना कुलाला ब्रिटिश मानवशास्त्राप्रमाणे क्लेन हा शब्द न वापरता पितृवंशिक अगर मातृवंशिक आप्तसंबंधीयाच्या गटाला सीब असे म्हटले आहे. पण त्यांनी पितृकुल *पेट्रौवमोपीनियल क्लेन* व मातृकुलला *मॅयमोनियल क्लेन* असाही शब्दप्रयोग केलेला आहे.परंतु आज दोन्ही कुलांसाठी क्लेन हाच प्रमुख शब्द सर्व संशोधक व अभ्यासक हे वारतात.

आदिवासी तडवी भिल्लां मध्ये मातृकुल व पितृकुल यांना अनन्य साधारण महत्त्व असून त्याशिवाय कोणतेही सामाजिक जीवनाचा आधवा हा अपूराच ठरणार आहे म्हणून रक्तसंबंधावर आधारलेले आदिवासी तडवीचे जीवन व धार्मिक सामाजिक चलनवलन हे एक महत्त्वाचे समिकरण आहे यांत शंका नाही. 'किंबहुना त्याशिवाय या जमातीचा अभ्यास हा होवूच शकत नाही हे ही नमुद करावयास वाटते.

**तडवी कुलांचे स्वरुपः**

'पितृवंशिक कुलामध्ये ज्या प्रमाणे पित्याकडील नातेवाईकांचा म्हणजेच पुरुष पूर्वज त्यांची मुले व मुली,नांतवंडे,खापर-पणतू अशा स्वरुपांची अखंडित वंशमालिकेचा विचार केला जातो.मातृवंशिक कुलात मातेकडील नातेवाईकांचा देखील पितृवंशिय वंशमालिकेप्रमाणे विचार हा केला जातो.असे असल्याने रॉबर्ट लुई यांनी कुल म्हणजे एकपक्षीय आप्तसंबंधावर आधारलेला समुह आहे अशी कुलाची व्याख्या केलेली आहे.त्याचप्रमाणे श्री.मदन व श्री.मजूमदार यांनी कुलाची व्याख्या केली आहे की,* कुल हा प्रथमत:वंशजांचा समूह असतो या वंशसमूहाची उत्पत्ती कोणत्या तरी सत्य कल्पित पूर्वजापासून झालेली असते. मग हा पूर्वज कोणी मानव अगर मानवसदृश प्राणी,वनस्पती किंवा निर्जीव वस्तूही असू शकते * अशी कुलाची व्याख्या केलेली आहे. तडवी भिल्लांचे कुलाचे लक्षणे नमुद प्रमाणे आहेत.

**१.एकपक्षीय तत्व :**

आदिवासी संस्कृतीत एकपक्षीय वंशपरंपराच्या आधारावर उभारणी झालेल्या स्त्री-पुरुषांच्या सामाजिक समूहाला कुल असे म्हटले जाते. सातपुडयातील आदिवासी तडवी, भिल्ल या जमातीत पितृवंशीक किंवा मातृवंशीक कुल पध्दती अस्तित्वात आहे. या कुलामध्ये आईकडून किंवा बापाकडून ओळखल्या जाणा-या नातेवाईकांचा किंवा संगेसोयरेकांचा समावेश होतो. पितृवंशीक कुल पध्दतीत मुळ पुरुष पुर्वजापासून निर्माण झालेले वंशावळ याचा समावेश असतो.तर मातृवंशीक कुल पध्दतीत स्त्री-पुर्वज तीची मुले व मुली,खापर नांतवंडे यांचा समावेश असतो.

एकंदरीत आदिवासी तडवी भिल्ल सामाजिक जीवन परंपरा ही पितृवंशीक कुल परंपरा आहे.परंतु तडवी भिल्ल संस्कृती ही मातृसत्ताक परंपरा असल्याने किंबहुना सर्वच आदिवासी जमाती हया मातृसत्ताक परंपरा असल्याचे दिसते. आदिवासी तडवी भिल्ल यांचे सामाजिक वर्तन व धार्मिक परंपरा उदाहरणार्थ लग्न,साखरपुडा,नामाकरण इत्यादी हे पितृवंशीक कुल परंपरेनुसार त्याचे पालन केले जाते. परंतु आदिवासी तडवी भिल्ल जमातीत मातृसत्ताक पध्दत असल्याने हा रितीरिवाज पूर्ण करण्याकरिता मातृवंशीक कुल पध्दतीचा देखील विचार हा सामाजिकरित्या करण्यात येतो.अशा प्रकारे तडवी समाज हा आपले परंपरा व रुधी,चालिरिती यांवर या कुलाचा प्रभाव हा मोठया प्रमाणात दिसतो.

**२. मुळ पूर्वजापासून उत्पत्ती:**

आदिवासी तडवी भिल्ल जमातीत विविध कुले व त्या कुलांचे खानदानाचे पूर्वज हे वेगवेगळे असल्याचे मानण्यात येतात. विशिष्ट नायक, भू-भाग , प्रदेशावरुन कुलांचे नांवे निर्माण झाली आहेत. परंतु आदिवासी तडवी जमात ही एकच रक्तसंबंध असलेल्या एकाच पूर्वजापासून निर्माण झालेला व व्दिभाषिक सामाजिक नितिनियम असलेला सामाजिक समूह आहे. अशी धारणा ही तडवी जमातीत अदयाप दिसून येते. संपूर्ण तडवी समाज हा एकाच पूर्वजाचा परिवार आहे व समूह आहे.जरी वेगवेगळे कुलांचे नायक वेगळे असले तरी तडवी हे स्वत:ला एकाच पूर्वजाचे आप्त मानतात.

कुलांची सुरुवात कोणत्या तरी विशिष्ट स्त्री किंवा पुरुष पूर्वजापासून झालेली असते, असा दृध विश्वास प्रत्येक कुलसदस्याचा असतो. हा पूर्वज कोण होता केव्हा झाला यासंबंधी कुलसदस्यांना ज्ञान असतेच असे नाही. हा कुलपूर्वज



मानवप्राणी,मानवसदृश प्राणी,व अचेतन वस्तूही असू शकते. पण या पूर्वजापासून कुलाची उत्पत्ती झालेली आहे अशी श्रध्दा प्रत्येक कुलसदस्यांचा मनात असते या प्रमाणे सातपुडयातील आदिवासी तडवी हे भिल्लाचे वंशज मानण्यात येवून आपला सामाजिक समूहाचा एकच पूर्वजापासून आपण त्या मुळ पूर्वजापासून उत्पत्ती असल्याचे त्याची मुळ धारणा दिसून येत असते.असे तडवी हे मानत असतात.

**३. जन्म हा आधार:**

आदिवासी तडवी भिल्ल समाजामध्ये विविध कुले दिसून येतात. तसेच तडवी कुले प्रमाणे त्यांची कुलदेवता देखील स्वतंत्र मानण्यांत येते. तसेच ज्या कुला मध्ये व्यक्तीचा जन्म झालेला आहे. त्याच कुलाचे सदस्यत्व त्या व्यक्तीला मिळत असते. व्यक्तीला आपल्या मर्जी प्रमाणे कोणत्याही कुलाचे सदस्यत्व जसे मिळू शकत नाही तसेच व्यक्तीला लाभलेले कुलाचे सदस्यत्वही बदलता येत नाही. तडवी समाजात या प्रमाणे जीवनमान दिसून येत असून ,पित्याकडून मातेकडून निर्धारित झालेले कुलांचे सदस्यत्व व्यक्तीला स्वीकारावे लागत असते. अशा प्रकारे कुलाच्या सदस्यचा आधार हा जन्म हाच असतो. याला दुसरा कोणताही पर्याय नाही. एकदा जन्माने लाभलेला कुलाचे सदस्यत्व सोडता येत नाही किंवा बदलता येत नाही. तडवी भिल्लांत देखील याला अपवाद नाही. तडवी भिल्ल समाजात विविध कुळे जरी असली त्या कुलाप्रमाणे सामाजिक परंपरा जरी असल्या तरी प्रत्येक तडवी व्यक्तीला संपूर्ण तडवी समूहाचे अलिखित व मौखिक नितिनियम परंपरा,रुधी,चालिरिती,धार्मिक आचारण व संस्कृती या बाबतीत सामाजिक ऐक्यता सांघीकता संघटन व एकरुपता सामाजिक समुह एकता टिकवून ठेवण्याची जबाबदारी सोपविलेली असते. किंबहुना त्यानुरुप कृती,आचारणाची समाजाची सक्ती ही असते.

**४. प्रत्येक कुलाचे वेगळे नांव :**

सातपुडयातील आदिवासी तडवी भिल्ल जमातीत प्रत्येक कुलाचे रचना सर्वसामान्यपणे एकच जरी असली तरी प्रत्येक कुलांचे संबंध वेगळे असतात. प्रत्येक कुल एक वेगळा गट असतो त्यामुळे हे वेगळेपण निर्देशनाला आणण्यासाठी प्रत्येक कुलाचे वेगळे व स्वतंत्र नांव असते. कुलाला नांव देण्याचे ही पध्दत प्रत्येक कुलाची सारखेच असते असे नाही.प्रत्येक स्वतंत्र कुलात त्याचे मुळ पूर्वज,मुळ पुर्वजाचे वैशिष्टये कुलातील नायकांना मिळालेले किताब, कुलाचे पारंपारिक व्यवसाय,देवतांचे

पुजन ,वस्तीस्थान,भूभाग इ.आधारावर तडवी समाजात नांवे दिलेली असतात. सातपुडयातील तडवी भिल्ल जमातीचे देवतांच्या पूजनावरुन सहा कुल गट पाडलेले आहे अशाप्रकारे तडवी भिल्लामध्ये सहा कुलदेवतांना पूजण्याची रित आहे. त्या कुलाच्या तडवी जमातीत सहादेवे असे म्हणतात. ज्या कुलातील लोक जितक्या देवतांना कुलदेवतांना पूजतात तेवढे कुलाचे नांवे त्यांना देण्यात येत असतात उदा. सहादेवे, सातदेवे इ.

महाराष्ट्रातील सातपुडयातील तडवी,भिल्ल या जमातीतील कुलाला विविध नांवे दिलेले दिसून येतात. तडवी जमातीत जवळ जवळ ८४ कुले आहेत. या प्रत्येक कुलाला स्वतंत्र असे नांव आहे. म्हणूनच एक वेगळेपण हे या कुलांचे वैशिष्टे मानावे लागते. असे असले तरी तडवी समाजामध्ये कुले जरी स्वतंत्र नांवाने ओळखली जात असली तरी मुळ समाज समुहाच्या नितिनियम पालन करण्याची व त्यानुरुप कृती करण्याची व आचारण करण्याची सक्ती ही प्रत्येक कुल गटावर लादलेली असते व त्यानुसार सामाजिक रितीरिवाज चालीरिती परंपरा घडतांना दिसतात.

५.बहिर्विवाहाची प्रथा :

सातपुडयातील तडवी भिल्ल या आदिवासी जमातीत प्रत्येक कुलाची उत्पत्ती ही वेगळया पूर्वजापासुन झालेली आहे असे आस्थापूर्वक मानले जाते. तडवीचे एकाच कुलातील सर्व सदस्य हे एकाच पूर्वजाचे वारसदार असतात. त्याचमुळे ते ऐकमेकांचे रक्तसंबंधित नातेवाईक असतात.त्यामुळे व्यक्ती वेगळया परिवारातील असून सुध्दा जर त्या एकाच कुलातील असतील तर ते एकमेकाला भाऊ-भाऊ व भाऊ-बहिण मानत असतात. त्यामुळे तडवी समाजात एकाच कुलात जन्म झालेल्या स्त्री-पुरुषांना एकमेकांशी विवाह करण्यांस प्रतिबंध केला जातो. त्यामुळे साहजिकच प्रत्येक कुल स्वतंत्र सामाजिक परंपरेचे पालन करणारी समूह व्यवस्था असून प्रत्येक स्वतंत्र कुल हा बहिर्विवाही सामाजिक समूह असल्याने तडवी मध्ये एकाच कुलातील स्त्री-पुरुषांची विवाह होवू शकत नाही. तडवी जमातीत विवाह जर करावयाची असल्यास विरुध्द कुल गटाच्या व्यक्तीशीच केला जातो. उदा.सोयंके-बोरव्हाये, घटे-जमालकर, या प्रमाणे कुले असावयास पाहिजेत. तसेच एकाच गांवातील स्त्री-पुरुष सुध्दा ऐकमेकांशी विवाह करु शकत नाही. कारण ते गांवकीनुसार गांव भाऊ-बहिण म्हणून मानण्यात येतात. परंतु सदया ही प्रथा देखील आता नष्ट झालेली आहे.



अशाप्रकारे तडवी समाजात एकाच कुलातील विवाह व साखरपुडा इत्यादि सामाजिक धार्मिक चलनवलन हे निषिध्द मानल गेलेले आहेत.

## ६. कुलदेवता अगर देवक *कुलचिन्हे* :-

तडवी समाजात प्रत्येक कुलाची उत्पत्ती ही कोणत्या तरी सत्य किंवा कल्पित पूर्वजापासून झालेली आहे, असे विश्वासपूर्वक मानले जाते. राजपूत तडवी भाटाजवळ तडवी भिल्लांच्या मुळ पूर्वज व प्रत्येक स्वतंत्र कुलाच्या मुळ पूर्वजाची म्हणजेच नायकांची लिखित नोदी हया अदयापपावेतो हया उपलब्ध असल्याचे दिसून येतात.परंतु *भिल्ल* संस्कृतीच्या उगमापासूनच्या पूर्वजाच्या नोंदी हया दिसत असल्या तरी राजपूत भाट देखील तडवी भिल्लांचा एकच पूर्वज असल्याचे लिखित पुरावे हे गांवभेटी दरम्यान सांगताना दिसतात. त्याचप्रमाणे हा पूर्वज जसा सत्य किंवा कल्पित असू शकतो, त्याचप्रमाणे हा पूर्वज मानव,मानवसदृश प्राणी, वनस्पती अगर निर्जीव वस्तूही असू शकतो या सजीव अगर निर्जीव वस्तूला कुलप्रतीक अगर देवक म्हणतात. साहजिकच प्रत्येक स्वतंत्र कुळाचे वेगळे कुल देवता अगर देवक असते उदाहरणार्थ सोयंके-मनूदेवी, बोरव्हाये-भवानी माय, वांधे-खंडेराव, इत्यादी कुलदेवता असतात. परंतु विविध कुलातील कुलदेवता व देवक वेगवेगळे असले तरी तडवी भिल्लांमध्ये सर्वच कुलाचे आराध्य दैवत म्हणून *महादेवास* पूजन्याची प्राचीन परंपरा अदयाप टिकून आहे. त्या त्या कुलातील लोकांचा कुलदेवताकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत आदराचा असतो. तसेच कुलदेवक जर एखादा प्राणी असेल तर त्या प्राण्याची हत्या केली जात नाही. कुलप्रतीकाची देवकाबददल पूजाअर्चा करणे, आदर राखणे तडवी समाजात पिध्यांपिध्या चालत आलेली ही सामाजिक परंपरा आहे. जी सातपुडयातील भिल्ल तडवी समाजात मोठया आदराने अदयाप चालू आहेत.

कुलदेवतेत व देवकात पूर्वजाचा आत्मा वसत असतो, ही जाणीव असल्याने कुलदेवता ही कुलांचे संरक्षण करते असा कुलसदस्याचा विश्वास आहे . रॉबर्ट लुई यांच्या मताने भारतातील व अमेरिका,आफ्रिका खंडातिल आदिवासी जमातीतून कुलदेवता अगर देवक हे झपाटयाने कमी होत चाललेले आहेत.तसेच तडवी भिल्ल समाजात ज्यावेळी बाळ जन्माला येते त्यावेळी तडवी आदिवासी महिला एक धार्मिक विधी करतात. व शूर ,पवित्र पूर्वजाचे आवाहन करुन महादेवास प्रसन्न करतात व महादेवा सारखेच दिव्य शक्ती बाळांला मिळावी म्हणून परंपरांगत लोकगीताव्दारे

आवाहन केले जाते. सदरची परंपरा आज काही कुला पुरतीच मर्यादित राहिलेली असून सदरची प्राचीन परंपरा देखील तडवी भिल्ल समाजातून लुप्त होत चाललेली असल्याचे दिसून येत आहे.

**७. समान वस्तीस्थान भू-भाग :**

प्रा.रिव्हर्स यांनी कुलाची व्याख्या करतांना कुलाच्या समान वास्तव्याचा उल्लेख केलेला आहे. समान देवक समान भू-प्रदेश,समान पूर्वजांवरील विशवास यामुळे एकमेकांशी बध्द झालेल्या व्यक्तीचा बहिर्विवाही समूह म्हणजे कुल होय.* भारतातील व सातपुडयातील सर्व आदिवासी समाजात कुलाचे अस्तित्व दिसून येते.मध्य भारतातील प्रोटो-ऑस्टालाइड जमातीत समाविष्ट होणा-या सर्व आदिवासी जमातीतील कुले ही बहिर्विवाही आहेतच त्यात तडवी व भिल्ल या सातपुडयातील आदिवासी जमातीचा देखील समावेश आहे.

**कुलप्रतीकवादाची वैशिष्टे :**

इ.स.१७९१ साली जे.लॉग या आंग्ल व्यक्तीने नॉर्थ अमेरिकन इंडियन्सकडून *कुल-प्रतीक* हा शब्द उचलला परंतु आदिवासीच्या समाजजीवनातील कुल प्रतीकवादाचे महत्त्व जे.एफ.मॅक्लिनॉन या मानवंश संशोधकाने प्रथमच अचूक ओळखले.ऑस्ट्रेलियातील जमातीमध्ये कुलप्रतीकवादी विकसित स्वरुपात दिसून येते.तर आफ्रिका,उत्तर अमेरिका, अमेरिकन इंडियन्स, व भारतामध्ये आदिवासी जमातीची उभारणी ही *कुलप्रतीकवादावर * झालेली आहे. जवळ जवळ सर्वच आदिवासी जमाती व तडवी, भिल्ल जमातीत विशिष्ट वनस्पती , प्राणी व निसर्गातील काही वस्तू पवित्र मानतात व त्याची पूजा अर्चना करतांना दिसतात.

कुलप्रतीकवादाची लक्षणे व वैशिष्टे येणे प्रमाणे आहेत.

**१. कुलचिन्हांचे अस्तित्वः**

कुलाची उत्पत्ती कोणत्या तरी सजीव अगर निर्जिव वस्तूपासून झाली आहे.या सजीव अगर निर्जिव वस्तूला *देवक* अगर *कुलचिन्हे* असे म्हणतात. सातपुडयातील तडवी भिल्लांमध्ये कुल व त्याची कुलदेवता व कुलचिन्ह अस्तित्वात आहेत. तडवीची यांचेवर नितांत श्रध्दा आहे. आपल्या कुलपूर्वजाचा आत्मा हा त्या कुलचिन्हात आहे अशी तडवी समाजाची धारणा आहे. तडवी समाजात काही भू-



भागातील कुलाचे कुलचिन्हे ,देवक हे नाग,वाघ हे दिसून येतात. तडवीच्या अंतरमनात त्याबददल विलक्षण आस्था दिसून येते.

**२. कुलचिन्हाबददल आदरः**

तडवी भिल्ल समाजात कुलचिन्हे,देवक जर प्राणी,पशू,असेल तर त्याची हत्या केली जात नाही. परंतु धार्मिक समारंभात प्राण्याचे मांस विधियुक्त खाल्ल्यास या प्राण्याशी एकरुपता प्रस्थापित होवून सदरचे अन्न हे पूर्वजांना विधीनुसार पोहचत असते अशी धारणा तडवी मध्ये दिसते.त्याचप्रमाणे कुलचिन्हे जर नैसर्गिक वस्तू वनस्पती असेल तर ती पवित्र मानतात व पूर्वजाचा आत्मा त्याच्यात वसत असतो अशी श्रध्दा आहे. उदाहरणार्थ तडवी हे विवाहाच्या मांडव हे जांभूळ व आंब्याच्या फांदयाच्या आंच्छादन करुन तयार करतात तसेच विवाहाच्या दिवशी घरांत अंबाळी नावाचे वनस्पतीचे जेवन तयार केले जाते व ते सर्व घरातील पाहूणे मंडळींना जेवनास घालतात ही अंबाळी वनस्पती शुभमंगलमय असून तीच्यात पूर्वजाचा आशीर्वाद लपलेला आहे, अशी तडवीची प्राचीन परंपरा व श्रध्दा आहे.

**३.बहिर्विवाहाची परंपराः**

तडवी भिल्ल समाजात एकच कुल,देवक व कुलचिन्ह असलेल्या सदस्यांची मध्ये आंतरविवाह होवू शकत नाही. त्याकरिता विरुध्द कुल,देवक व कुलचिन्ह असावयास पाहिजेत, तेव्हाच विवाह संबंध जोडण्यांत येतात व सहचरीची निवड ही करण्यांत येत असते.

**समारोप**:

सातपुडयातील तडवी जमातीत वड,पिंपळ,अंजन,जांभूळ,अंबा,अंबाळी,इ. वनस्पती तसेच नदी,नाला,अग्नी,वायू,सूर्य,चंद्र, तारे आदि निसर्गशक्ती तसेच वाघ सिंह,मांजर,नाग,गाय,बैल,म्हैस,बोकड व हत्ती माकड इ.बददल या विषयी नितांत आदराची भावना असते. ज्या वनस्पती व निसर्ग निर्माण निसर्गउत्पादित वस्तूपासून आदिवासी तडवीचा उदारनिर्वाह चालतो ,केला जातो त्याबददल त्यांचेत कमालीचा आदर असते अशा वस्तू नष्ट न करता त्याचे रक्षण व पालन देखरेख केली जातात तसेच त्यांना पवित्र मानले जातात. आपल्या पूर्वजांचा आत्मा या कुलचिन्हांत देवक रुपात असतो अशी धारणा तडवीची आहे. म्हणू१न या वनस्पती व निसर्गशक्तीचा आदर व रक्षण हे केले जाते.

कुलदेवतांचा त्यांचेत वास असतो त्यामुळे या सजीव व नैसर्गिक वस्तूनुरुप कुलचिन्हे,देवक असल्याने आदिवासी तडवी समाजामध्ये या वस्तूंकडे श्रध्दा व आस्थापूर्वक बघितले जातात त्याचे पूजन केले जातात. तडवीचे ८४ कुले व भिल्लांचे ३६ कुले आहेत.



प्रकरण ११

# तडवी भिल्लांची सामाजिक म्हणी

**१] आदिवासी तडवीचे मौखिक लोकसाहित्य आणि स्वरूप :**

एकंदरीत आदिवासी जमातीत विविध काळानुसार व प्रसंगानुसार नृत्य तसेच गाणी ही म्हटली जातात. विशिष्ट प्रकारचा पोशाख,मुखवटे परिधान केले जातात. शरीरावर विविध रंगाचा वापर करुन नटतात तसेच पूश,पक्षी यांचे पीसांचा वापर हा नृत्य प्रकारात केला जातो. त्याचप्रमाणे लाकडा पासून व इतर वस्तुंपासून बनविण्यात येणा-या वादंयाच्या चालीवर आदिवासी युवक व युवती हे नृत्य करतात व लोकगीते म्हणतात. अशात-हेने आदिवासी नृत्यप्रकारासह लोकगाणी विविध प्रसंगी गायली जातात. दिवसभराच्या काबाडकष्टानंतर मेहनतीनंतर सायंकाळी गांवात आलेवर विरंगुंळा मिळावा म्हणून करमणुकीचे साधन म्हणून व सण उत्सवात आंनदोत्सव साजरा करण्यासाठी आदिवासी गाण्यांच्या तालीवर थिरकतात व गाणी लयबध्दतेने म्हणतात. या साधनामध्ये तरपा,धेल,झांगळी,टिमकी इत्यादीचा वापर करतात तसेच विविध प्रकारचे सोंगे घेवून व जनावराचे मुखवटे परिधान करुन नृत्यनाटय केले जातात.

आदिवासी तडवी ही जमात ही विविध सण,उत्सव,यात्रा, उरुसा दरम्यान आंनदोत्सव साजरा करतात. तडवीचे सर्वागाने जीवनसरणी व चालीरिती,व इतर अंगाचा अभ्यास करता ते सांस्कृतिकदृष्टया समृध्दीशाली आहेत. त्याची प्रमुख भाषा * तडवी * ही देखील मौखिक स्वरुपात दिसते परंतु अलीकडे ती लिपीबध्द होत आहे ही आनंदाची बाब आहे. तडवीचे मौखिक साहित्य हे एका पिधिपासून दुस-या पिधिपर्यत पिधिजात पध्दतीने पोहचवली जात असते. तडवीचे जीवनाचा शोध घेणे त्यांचे राहणीमान त्याचे सांस्कृतिक जीवनदर्शन तसेच त्यांचे अंत:रंगातील छटा इत्यादी गोष्टीचा शोध घेणे ही काळाची गरज आहे. या आदिम जमातीचा सांस्कृतिक खजिना हा पहाडांमध्येच दडून न राहता तो बाहेर काध्ण्याचे काम आजच्या नव्या रक्ताच्या साक्षर युवकांनी व अभ्यासकानी तसेच संशोधकांना शोधून काध्णेची जबाबदारी समर्थपणे पेलून हा खजिना बाहेर काधवा व जगासमोर आणावा तसेच शासनाने याबाबतीत अभ्यासकांसाठी तसेच संशोधकांसाठी निधी उपलब्ध करुन दयावा व राजश्रय देवून प्रोत्साहन दयावे.

**तडवी समाजजीवनातील काही प्रचलित म्हणी :**

**आ**दिवासी तडवीचे मौखिक लोकसाहित्यातील काही बाबीवर येणे नमुद प्रमाणे प्रकाशझोत टाकण्याचा हा एक लहानसा प्रयास आहे.काही म्हणी हया अश्लील असलया तरी त्या म्हणी हया आदिवासी समाजजीवनाचे अंतरंगाचे अविभाज्य घटक आहेत यातून एक वेगळा संदेश पोहचविणेचा काम हे या सामाजीक म्हणीतून होत असतात.आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे की, मराठी भाषेतील शिव्या हे मराठी भाषेचे वैभव आहे, नुसत्या शिव्या नाहीत तर म्हणी,वाक्प्रचार, हे देखील वैभव आहे आणि ते गांवोगांवी ,पडवीमध्ये , शेतामध्ये , माजघरात पडून आहेत कारण त्यांची निर्सगाची नाळ ही तुटली नाही. हा एक सांस्कृतिक रिवाज आहे. जो एका पिधिपासून दुस-या पिधिपर्यत तो सहजच पोहचत असतो. हा ग्रामीण,आदिवासी जीवनाचा व जीवनसारणीचा एक घटक असून त्यातून समाजमनाचे दर्शन घडणारा हा एक मौलिक दस्ताऐवजी आरसा आहे या आरशातून आपणास समाजजीवनाची इथ्थंभूत माहिती व कारणमिंमासा शोधता येते . सुरुवातीस काही आदिवासी तडवीचे म्हणीचे स्वरुप बघू या.

**सातपुडयातील आदिवासी तडवी**
सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक चालिरिती

**तडवी म्हणी तसेच त्यांचे मराठी अर्थ**

१] **खावाचं दात अललंग अन दिखाडवाचं दात अललंग.**

[ मराठी अर्थ- वरुन चांगला दिसणारा परंतु मनातून धूर्त,घातकी व चालक व्यक्ती. दोन मुखवटे परिधान केलेला .तोंडात राम अन बगलेत सूरी असा व्यक्ती

२] **घरामझार जावा अन टपूरा खावा.**

[ मराठी अर्थ- घरात खाणेपिण्यास नसणे परंतु बाहेरच्या लोकांचा बघणे विचार करणे.

३] **खावाल भेटला तं नवरा नाय तं खेलवाचा भोवरा.**

[ मराठी अर्थ - जोपर्यत चांगली परिस्थिती होती तेव्हा त्याच्या जवळच होती परंतु पडतीचे ,वाईट दिवस आलेवर ती मुले देखील असूनही स्वत:च्या आई-बापाकडे निघून गेली.

४] **कडू कारलयाताल दूधात घोय की तूपात की सखखरमझार घोय कडूची कडूच**.

[ स्वभावाला औषध नसते. एखादाचा स्वभाव हा जसा असतो तो मरेपर्यत तसाच राहतो. 'कितीही चांगली शिकवण दिली तरीही त्याचा मुळ वाईट स्वभाव बदलत नसतो.

५] **अंधी न् गड जिंकला वय माय चालीन तव्हा खरा वं माय.**

[ एखादया फुटक्या बाईला चांगला नवरा ,संसार लाभला तरी भविष्यातही त्याचा हा चांगला संसार राहील की नाही कितपत टिकेल हे बघायचे आहे या अर्थाने आदिवासी स्त्रिया एखादया बाईला टोमना मारतांना म्हणतात.]

६] **आयबाईमझार राहू दे अन.पाव टूकडा खावू दे**

[ एखादया व्यक्तीला नेहमी स्त्रियांमध्ये उठणे,बसणे व वावर असणे नेहमी बायांमध्ये राहणारा अर्थात बाईलवेडा,चगण्या,व्यक्ती.]

७] **ज्याई घरं कनीयॉ त्याई घरं हज्जार दुनियॉ.**

[ ज्या व्यक्तीच्या घरी सुशिल,लग्नाजोगत्या मुली असलयावर त्यांचेकडे अनेक लोक [वरपक्षाकडील] वधू मिळविण्याकरता जाणारच या अर्थाने ]

८] **हिस्सेदार पाहेजे पन.हुस्सेदार नाय पाहेजे.**

[ आपलयाला काही लागलं पाहिजे असेल तर ते नम्रपणे मागून घेणे त्याचे प्रेमपुर्वक स्विकार करावा.जो व्यक्ती आपणास काही देतो त्याबददल हेवा,तिरस्कार,जळावूवृत्ती मनात निर्माण होवू देवू नका. व्देष भावना मनात नसावी या अर्थाने.]

९] **गायी धोईकन कुत्र्यानताल पाजना.**

[ एखादा व्यक्ती अपार मेहनत करतो परंतु त्याचा फळ व फायदा ,लाभ हा दुसरेच माणसे उचलत असतात त्या व्यक्तीला त्याच्या त्या इच्छीत मेहनतीचे कोणतेही फळ प्राप्त होत नसते त्याच्या प्रयत्नावर मेहनतीवर दुसरे फुकटेच लोक हे मजा मारीत असतात.]

**१०] जित्तांची टावू वरला लोनी खाणारा.**

[ माणसांना लुबडणारा, ठग,भोळयाभाबळया व्यक्तीना ठगणारा फसवीणारा छाकटा,लोभी मनुष्य .]

**११] माई मुत्तांचा लोटा तुई तं**

[ फारच खराब वळणाचा जीच हलकट व्यक्ती,वाईट विचार-आचाराचा हलकट व्यक्ती.]

**१२] हाटकर अन.पाटकर.**

[ निकाह करुन दुसरी घरात करुन आणलेली स्त्रि. अर्थात लग्नाची नसलेली बाई,]

**१३] आजचा न.कालचा बान्डीची सालचा.**

[ मागून आला आणि शहाणा झाला ]

**१४] सुदी न.बुदद्री चुलाव-ह कुदी.**

[ फुशारकी ,हुशारी मिरवणारा अक्कल नसलेला फालतू हुशारी दाखविणारा ]

**१५] आका न.फोका सेनबाई ठोका.**

[ काहीही कामधंदा येत नसणारी नवीन विवाहिता मुलगी,नववधू,अनाडी मुलगी ]

**१६] निस्सवेलयाची गांडीव-ह झाड उगला म्हणं बसवालताल साऊन होली.**

[ बेशर्म व नालायक,वाईट आचार विचाराची माणसाला मानमरतबा इज्जतीची पर्वा नसते ]

**१७] निस्सवेल रांड न.दावली गांड.**



[ बेशर्म स्त्रिला तसेच पतिता स्त्रिला इज्जतीची पर्वा नसते ]

*** आधरताई नादं अन.कामरी कादं बाधं ***

**[ एखादी स्त्रि ही वरवर नांदायला येते. तस्सीच ती लवकर निघूनही जाते - या अर्थाने ]**

**१८] उखाया पाखाय**

[ दुस-याबददल चुकीचे वाईट सांगणे. दुस-याबददल अतिरंजितपणे मीठमिरची लावून सांगणे ]

**१९] अस्सी कसी वो तीन हांडयांची उलतंनं.**

[ बुटकी बाई, बुटक्या हाडाच्या बाईला नांव ठेवताना म्हणतात ]

**२०] तुया बा उसकं अन.तुई ब फुसकं.**

[गदका, भाजी शिजवतांना आलेला गदका.अतिउत्साही व्यक्तीस संबोधन ]

**२१] तुलताल अन.मालताल घाल कुतराल.**

[ दोघांच्या भांडणात तिस-याचा फायदा,लाभ ]

**२२] तोंड कर बाता अन गांड खाये लाथा.**

[ फक्त तोंडात जोर असलेला ,बडबडया, वाचाळपणा करणारा व्यक्ती ]

**२३] अधे कुधे वं देलली खालली वडडी.**

[ ती इकडची नव्हती,कुठली होती कोण जाणे. तिला येथेच कुठे देली असेन विवाहिता बाईबददल सांगताना म्हणतात ]

**२४] जंगल बयतो सबानताल दिखतो पन मन बायतो तो कोनालतालपन दिखात नाय** .[ मनात दडलेलया भावना व मनातील अश्रू कोणालाही कळत नसतात परंतु वरवरचे भावभावना व दिखाऊपणा सगळयाच्या नजरेत सहजच भरत असतो या अर्थाने.]

**२५] झवणा-याताल झवू दे, पन भलया मानसालताल हातपन ना लावू दे.**

[ ग्रामीण व आदिवासी स्त्रिया हे एखादया स्त्रिस सहजच उददेशून म्हणतात.अर्थात जो मदत करतो, ऐनवेळेला मदतीला धावून येतो, कामाला येतो त्याचे उपयोगात न येणे न पडणे या अर्थाने.]

**२६] केयाचा उपटत नाय अन् मुयांचा नाश**

[ महत्वाचे काम करणे सोडून रिकाम्या व बिनकामाची मनिषा व हौस बाळगणे]

**२७] नाचं कुदं वांदरीन खीर खाये फकिर**
एखादयाच्या कमाईवर इतर संगेसोय-यानी मजा मौज करणे ]
**२८] गांडा आई पाहेजे पन तोंडा आई नाय पाहेजे**
कृपावंत झाली तर नशिब घडवेल अवकृपा झाली तर कमनशिबी ठरशिल.
**२९] आंधरताई नादं अन कांबरी कादं बाधं**
एखादी बाई वरवर नांदायला येते तस्सीच ती न नांदता लवकर निघूनही जाते.
**३०] भिललभाई अन् चाललं घाई नाही गाडी तं चलले पन पायी**
साधनसामुग्री असूनही त्याचा उपयोग न करता आपलया मुळ परंपरेनुसार व विचारानुसार वागणे व त्यानुसार कृती ही अंमलात आणण असा या म्हणीचा अर्थ अभिप्रेत आहे.
**३१] बहिणीनं भाऊताल ओटीत लेला**
बहिण हिने आपलया भाऊची मुलगी आपलया मुलावर सून म्हणून घरात आणणे.
**३२] कामाचा ना धामाचा शेरभर आनाजाचा.**
आयतखाऊ. घरात काहीएक कामधंदा न करता रिकामा बसून राहणारा.
**३३] जव्हा सासा तव्हा पोव्हाळा**
ज्या वेळेला काम असेन त्या वेळेला तयारीला लागू
३४] गांडीकन खडं उचलना
अडचणीतून जाणे तसेच विपरीत परिस्थितीतून मार्गक्रमण करणे.
३५] मरणा-याची तोडामझार माटी अन जीत्याची तोडात रोटी
जोपर्यत जीवन आहे तोपर्यत जगण्याची धडपड आहे.मेलयावर सर्वकाही शून्य .
३६] चोराची हांडी सिकावर चध्त नाय.
चोरी केलेला माल हा जास्त काळ टिकत नाही. तसेच वाईट कर्माचे फळ देखील हे वाईटच असते.
३७] विंचूचा बिधर पाठीव-ह
वारंवार आपला रहिवास ठिकाणा बदलणे. ऐका ठिकाणी अधिक काळ वास्त्व्य न करणे.आपले घर वारंवार बदलत राहणे.
३८] गरीबी पाहेजे पन बदनशिबी नाय पाहेजे.
व्यक्ती श्रीमंत नसला तरी चालेल परंतु तो नशिब घेवून आलेला पाहिजे.तसेच तो कमनशिबी नको पाहिजे.



३९] गांव बये अन.हनुमानबाबा बोबी चोये.
आलेलया संकटला सामोरे न जाता मख्ख बसून राहणे किंवा गमंत पहाणे. किंवा निष्काळजीपणाने कोणतीही तत्परता न दाखवता तशी कृती करणे.
४०] पानी दे नाय तं ताहणेल धर
मदत करायची तर कर नाहीतर करु नकोस.
४१] गांवसिव हं तं गांवमेध्या, घर हं तं चुलहा.
गांवागांवाच्या वेशीवर हनुमानबाबाचे देऊळ आहे अन घरोघरी मातीच्या चुली आहेत.
४२] काखंत बच्चा गांवभर ध्डिोरा
एखादी गोष्ट जवळ असूनही त्याकरिता गांवभ्ज्ञश्र विनाकारण बोबाबोब करत फिरणे.
४३] नाक खजावं नकटीताल खिजावं
नकटीचे लग्न साडैसात विघ्न. नकटीला नाकारवर बोट ठेवून तिस खाजील करणे तसेच चिडविणे.
४४] तवावरची मेरी तगारीवरची तेरी
एखादया गोष्टीत दुस-यापेक्षा वरचध् असण्याचे भासविणे.वर्चस्व सिध्द करणे.
४५] खाण तशी माती कुंभार तसा लोटा
-सज्जन माणसांच्या पोटी संतानही चांगलीच संस्कारी असतात
४६] ब्रम्हाची रेघ सटीचा अक्षर कधी चुकत नाय
-नशिबातील लिहिले जाते ते घडल्यावाचून राहत नाही
४७] गिरगीट रंग बदलतो पन आपुली फितरत नाय
-स्वभावाला कोणतेही औषध नाही.
४८] आप मरं नाय अन साफ दिखं नाय
-मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.
४९] रांड हं अन गांवभर फिरणारी सांड हं
-कोणतेही कामधंदा नसणारी उनाडकी करत फिरणारी बाई
५०] ज्या बाईचा घरात चित तंचा संसारात जीत
-संसारात रमणा-या मुलगीचा संसार देखील सुखाचा होतो.
५१] जावाईचा पोर अन हरामखोर
-पोटचा पोरगा कामात येतो जावायाचा नाही

५२] लेकबाय नाांदली तं बरी नाय तं मरली तं बरी
-माहेरचे नांव कमवता नाही आलं तर अशी मुलगी मेलेली बरी
५३] भगतीनचा फुल बारा वरिसच टिकतो
-वाईट परिस्थिती जास्त दिवसत राहत नाही चांगले दिवस हे येतातच
५४] राहना हुईन तं उखळला म्हणीकन राहा
-जेवढे भगवंताने दिलेले आहे त्या परिस्थितीत समाधान मानून जीवन कंठावे
५५] सब चीज खाललली एक चीज नाय खाललली तं काही बिघडत नाय.
-एखादया वस्तूचा त्याग करुन आजन्म त्यावाचून सर्मपित जीवन जगणे.
५६] हत्ती जाय बाजार कुत्रं भुकं हज्जार.
-आपले कर्म करत राहावे विरोधकाची तमा बाळगू नये.
५७] आपला लेकरु मांडीवर हांगला तं मांडी काटीकन फेकत्या नाय.
-लहान मुलांच्या चुका पदरात घेणे
५८] एक न एक दिन उखळलाची दशा पलटवाबिगर राहत नाय.
-वाइट दिवस जावून चांगले दिवस हे येतातच
५९] डोईचा बाल तुटला गूहात पड की मूतात पड
-एखादया गोष्टीचा तिरस्कार करत जीवनातून ती गोष्ट कायम सोडून देणे
६०] गांडीचा गोखला करीकन बसना
-बिनकामाचा.कामावाचून राहणे.
६१] मोठा घास खावा पन बडी बात नाय करवा
-लहान गोष्ट करावी परंतु बधई पैलले जाणार नाही असे काम करु नये.
६२] हिजडा झवाड अन पदरुन खवाडं
-एखादयाच्या मेहनती कामाचा रिकामटेकडया लोकांनी त्याचा उपभोग घेणे
६३] माहया सिकला अन गधडावर भूकला
-बिनभरवशाचा व्यक्तीवर विश्वास ठेवून चुकीचे वागणे व व्यवहार करणे
६४] फकिरापाशी फकिर गेला अन छाती झोडी झोडीकन मरला
-एखादयाने गरीबाकडून मदतीची अपेक्षा बाळगून ठेवणे.
६५] काचचं मणी देख रं धनी मै कैसे बनी
-खोटी शाानशौकतपणा रुतबा मिरविणे.

**सातपुडयातील आदिवासी तडवी**
सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक चालिरिती

६६] गयाचा हार बनी जाना
-विनाकारण एखादयाला बुध्दीपुरस्सर मन:स्ताप देणे.मानसिक शोषण करणे.
६७.दगडताल लाथ मारीन तं पानी काधीन
-कोणत्याही प्रकारचा प्रसंग जीवनात आला तर त्याला सामोरे जाणे.
६८. अक्कल बडी की भैस बडी
-बुध्दीपेक्षा श्रेष्ठ असे जगात काही नाही
६९.खरा सिक्का कुकड पन चालत्वो
- हुशार व कौशल्य प्राप्त व्यक्ती चांगुलपणामुळे जीवनात कोठेही सफल होतात
७०. अंगावर मांस न सत्यानास
-खावून खावून माजने
७१. वांदराची कलेजाचा
-बेरहम व्यक्ती. खूनसी प्रवृत्तीचा.
७२.रांड मरं एकादशी सती मरं तगडयाघशी
-पतिव्रता स्त्री ही अग्नीपरिक्षा देत मरते तर वाईट स्त्री ही चांगल्याप्रकारे मरते.
७३.तोंडाई बकरी गांड खाये कुत्री
-वायफळ बळबळ करुन दुस-याचा मार खाणारी बाई
७४.दिया खालं अंधारा
- सत्यवान माणसाला कठोर यातना सहन कराव्या लागतात.
७५.जीत्यापनी नाय गोडी मरी गेल्यावर बंधन तोडी
- जिवंत असतांना काळजी घेतली नाही परंतु मेल्यावर सात्वंना दयावयास येणे.
७६. गांड धोईकन कधी करना
-कंजूसपणा दाखविणे.करणे.
७७.कोनं सोनाची सरी लेली तं दोराची फाशी लिईकन नाय मरवा
-हेवा बाळगू नये.समाधानी असणे
७८.पोटावर भाकर बांधली तं भूख जात नाय
-ज्या पैशाने भाकर मिळत नसेल तर त्या धनाचा संपतीचा काय उपयोग
७९.बंदाचा खूटी जाय पन अल्लाचा सरं नाय

-माणसांनी केलेली मदत ही काही काळापुरती असते परंतु भगवंताची कृपा सदैव असते
८०.गांडीवर ईचू डासळना
-लग्नाजोगते वय होणे तसेच वर बघण्यास सुरुवात करणे.
८१.ज्याचा नशीब करं जोर त्याचा कुंदा खाणं चोर
-नशीब बलवत्तर तर सर्वकाही कामे ही निर्विघ्न पार पाडले जातात.
८२.घरची करतं देवा देवा न बाहेरची म्हतं चोई शीवा
-घराच्या बायकोच्या संसारास मदत न करता दुस-याचे बघणे.
८३.पहेला वटीचा लेकरु बरोबरीचा तं दुसरा लेकरु घरोघरीचा
-जन्माला आलेला ज्येष्ठ पुत्र आई वडिलांचा म्हातारपणी सांभाळ करतो तर लहान मुलगा हा लाळाचा व बिनकामाचा असतो.
८४.रिकामा वड मुंहमझार पडा खाणाराचा रुबाब बडा
-आयतखाऊ माणसाला उददेशून तसेच आळशी व्यक्ती तसेच घरकाम करणारा.
८५.ठांगेयताल गाभण अन गाभणताल ठांगेय
-नांव ठेवणारी बाई तसेच एखादयाला टोमना मारुन लाछांन देणे ठेवणे
८६.उधळाचा गधडा करी देला
-वरवर कामचलाऊ कामे करुन देणे.
८७.लाळं लाळं हेलगा आला ताक पेवाताल कामं आला
-चमचेगिरी करणा-या व्यक्तीला महत्त्व देवून लाळवून ठेवणे.
८८.माहेरचा कुत्रा पन दरवाजावर आला तं जीव लगतो
-आपलंसं वाटणे, आपुलही सहानूभूती जागृत होणे.
८९.मानूस देखीकन बोल मारवा अन झाड देखीकन घाव मारवा
-तोंड सांभाळून बोलणे. वाईट बोलून कोणत्याही व्यक्तीने मन दुखवू नये.
९०.उबगेल गोरी गेली सवतिच्या माहेरी सवतीनं नाही देला पानी तं मूतानं न्हाली
-आशाची निराशा पदरात पडणे.
९१. गोड गोड बोली ठोपर सोली
- मतलबी व्यक्ती तसेच कामापुरता मामा
९२.मारेल घाव मिटी जातो पन बोलेल घाव मिटत नाय



-एखादयाचे अपमानीत करुन वाईट बोलून मन दुखविणे
९३. ज्याचा भला करवा तं त्याचा घर खोवा
-एखादयाच्या अडचण दूर करल्यावरही तो व्यक्ती आपल्या कामात न येणे
९४.नयातला साप उबगला तं भाऊ कडं जातो
-भाऊला भाऊची आठवण येणे.
९५.हांगी हांगी भरं देवडी ना सोडं
-घरात बसून राहणारा तसेच घर न सोडणारा
९६.गांडीताल हयद लगावना
-लग्नाजोगते वय होणे. लग्नासाठी होकार देणे.
९७.आंगूठीवर पन मूतवाच्या नाय
-थोडीसुध्दा मदत करायला पुढे येवू नये
९८.पाण्यात काठी मारली तं पाणी फाकत नाय
-रक्ताचे नातेसंबंध कितीही दुरावा आला तरी संबंध हे तुटत नाही.
९९.सतराची माय न खाटलावर जीव जाय
-मुलं बाळं असूनही बेवारश्या सारखे मरण येणे
१००.लेकीचा संसार दिलचा काय
-मुलगीच्या संसाराची आई वडिलांना नेहमी काळजी वाटत असते.
१०१.सवत पाहेजे पन सवतीचा जाहार नाय पाहेजे
- सावत्र वागणूक चालेल परंतु वाईटाची संगत नको.

**तडवी म्हणीचे वैशिष्टे व आशय:**

१. तडवी या आदिवासी जमातीतील म्हणी हया कोणा एका व्यक्तीने निर्माण केलेले नसतात त्या समुहाधिष्ठित व समाजनिर्मित असतात. तसेच त्या एका पिधिपासून दुस-या पिधि पावेतो संस्कारित व प्रसारित केल्या जातात.

२. आदिवासी व तडवी जमातीत सामाजिक म्हणी यांना एक वेगळे स्थान आहे. आदिवासी संस्कृतीचा रुधी,परंपरा याबरोबरच मौखिक जिवन शैली

ही व्यक्त करण्याचे ते एक सामाजिक माध्यम आहे. रोजच्या जीवनातील सामाजिक आशय हा रोखठोक पध्दतीने व्यक्त करण्याचे हया म्हणी व लोकगीते हे आदिमाचे मौखिक साधन आहे.

३. आदिवासी व तडवी समाजात भावना हया कोणत्याही प्रकारची मनात श्लील व अश्लील असे प्रकारची मनोभूमिका आदिमाच्या मनात यत्कींचतही नसते उलट त्यांना आपल्या सांस्कृतिक जीवनशैलीचा अभिमान आहे. स्त्री-पुरुष दोघेही सामाजिक चलनवलन करतांना सहजपणे हया म्हणीचा उपयोग करत असतात. त्यांचे मनात व वर्तनात एकप्रकारची नैसर्गिक भावनिक बंध हा गुफलेला असल्याचे प्रकर्षाने जाणवेते.म्हणूनच हया म्हणी आदिम जीवनाचा सामाजिक आरसा आहे यात शंका नाही.



**प्रकरण १२**

# तडवी भिल्लांची लोकगीते

[ या प्रकरणात आपण आदिवासी तडवीचे सामाजीक जीवन तथा लोकगाणी, यांचे स्वरुप बघू या. तसेच तमाशा लोककला व सरकारचे प्रयत्न याबाबतही सांगोपांग विचार करु या. तडवी या जमातीत या लोकसाहित्याला एक वेगळे वैशिष्टेपुर्ण असे स्थान आहे त्याचा आधवा या प्रकरणात घेवू या. ]

## तडवीचे सामाजीक लोकजीवन व लोकगाणी:

**आदिवासी** तडवी जमाती मध्ये त्यांचे सांस्कृतिक जीवनसरणीत लोकगाणी,हा प्रकार लोकप्रिय आहे. विविध प्रसंगी हे लोकगीते गायली जातात.आदिवासीचे जीवनात विशिष्ट आंनदोत्सवाच्या काळात या लोकगीताना आपले एक वेगळी ओळख आहे. हे लोकगीते विशिष्ट आदिवासी तालावर व गेयतेप्रमाणे व आदिवासी वांदयावर म्हटली जातात. ही लोकगाणी, लोकगीते मौखिक स्वरुपात असली तरी ती परंपरेनुसार एका पिधीपासून ते दुस-या पिधीपर्यत एक सांस्कृतिक ठेवा म्हणून सहजपणे पोहचवली जातात व येणारी प्रत्येक पिधी ते आत्मसात करीत

असून हा ठेवा सहजपणे जतन केला जातो यात शंका नाही. हा एक सामाजिक परिवेष आहे. आदिवासी जीवनसरणीचा सांस्कृतिक मौलिकतेचा अविभाज्य घटक आहे. खाली नमुद प्रमाणे लोकगाणी ही तडवी जमातीत दिसून येतात.

**१] सटवी पूजनाची लोकगाणी.**
**२] अंगाई तथा बाळ जन्मलोकगाणी**
**३] आखाजीच्या वेळची झुलागाणी**
**४] लग्नातील लोकगाणी**
**५] लग्नातील थटटामस्करीची लोकगाणी**
**६] आंनदोत्सवातील लोकनृत्यासह गायली जाणारी लोकगाणी**
**७] निसर्ग लोकगाणी [ भरघोस पीक आलेवर आनंद व्यक्त करणारी गाणी]**
**८ ] ऋतू गाणी [ विविध ऋतूच्या काळात गायली जाणारी गाणी ]**
**९] शोकगीते [ मृत्यू झालेवर म्हटली जाणारी अर्थात कशिदे वाचन ]**

अशाप्रकारे आदिवासी तडवीच्या जीवनसरणीत लोकगीते ही गायली जातात. या लोकगीतांना एक परिभाषा व आपले स्वतंत्र असे अधिष्ठान आहे.ही लोकगाणी मोठया प्रमाणात शोध घेवून ती लिपीबध्द करणे ही काळाची गरज आहे तसेच भारतीय सांस्कृतिक खजिन्यात यामुळे समृध्दी येईल .त्यामुळे या आदिम जमातीचे अंतरंगातील बाबीवर प्रकाश पाडण्यात मदत होईल .आदिम जमातीचा व आदिवासी जमातीचा सांस्कृतिक जीवन दर्शन दाखविणारा तो एक आरसा आहे असे म्हटलयास अतिशोक्ती होणार नाही असे माझे मत आहे. या गीतांमधून या आदिम जमातीचे प्रतिबिंब या आरशात उमटतांना आपणास दिसतात.

एकंदर या आदिम जमातीचे जीवनसरणी व सांस्कृतिक जीवन दर्शन बघता तसेच त्याची ईश्वराची कलपना व धर्माची त्यानी केलेली कलपना निसर्गाला दैवत मानून पूजणारी ही आदिम जमात जी आजच्या काळात मानवाला मानवाशी जोडणारी एक महामानवाची आदिम जमात आहे.तसेच यांचे सूपर्ण जीवनाचा साकलयाने सदसदविवेकबुध्दीनुरुप विचार करता तसेच मानवतावादी विचारसरणीतून विचार करता आजच्या ख-या माणूसकीचे दर्शन घडविणा-या या आदिम जमाती आहेत यात कोणी शंका घेणेचे कारणच उरत नाही असे मला म्हणावयास वाटते.



आजच्या २१ व्या शतकाला नितांत गरज आहे ती म्हणजे शांतता, एकोपाची तसेच विशवबंधुत्वाची हया आदिवासी जमातीत या विचारांचे दर्शन घडतांना व माणूसकीचे दर्शन हे या जमाती स्वत:च्या आचारणातून देवून या आदिम जमाती आजच्या सभ्य मानवाला अंर्तुमुख करण्यास बाध्द करत आहे. म्हणूनच आज जगातील अनेक बुध्दीजिवी व मानवतेला श्रेष्ठ मानणारे विचारवंत,समाजशास्त्रज्ञ, संशोधक, अभ्यासक हे या आदिम जमातीना वनवासी व गिरीजन न म्हणता हे या भूतलावरील एक महामानवांच्या जमाती आहेत हे निर्विवादपणे मान्य करत आहे.

काही लोकगीताचा आपण खाली नमुद प्रमाणे आस्वाद घेवू या.

**लोकगीते:**

**१]** हे लोकगीते लग्न समारंभाच्या वेळी गायली जातात. नमुद गीताला *गोयसोयनी लग्नगीत* म्हटले जाते. या लोकगीताव्दारे मृत्यू पावलेलया नातेवाईक,संगेसोय-यांना आमंत्रण देण्यात येते त्याच बरोबर देवी देवता व पीर वली यानाही नैवता ,आमंत्रण देवून हे गीत गायले जाते.

१] *** नियं नियं गयवं**
**ॅनि गहूची सोयवं**
**नूतन घर सोयवं**
**वं हिराबाई निवता येवं**
**खंडेराव, भवानी माय तु निवता येवं**
**वो पीर बाबा जंगली पीर तु निवता येवं**
**... .. .. .. शादी घरं निवता येवं**
**वो माय मनूदेवी निवता येवं..**
**लोनाचा खडा, सुपारी धरा..**
**ॅनियं निय गयवं , नि गहूची सोयवं.**

**२] * तेल रे तेल तेलाची धार**
**ॅनिबूं पड वं माय या नवरीवर**
**तेल रे तेल तेलाची धार**

नेंबू मोती पड वं माय या नवरदेवावर..

३] * नंदताल गहेरा बडा पूर इला
पपई वाहत चललया हं..
पपई वाहत चललया व्होतं सिकंदर भाई लडत उभा हं..
नंदताल गहेर बडा पूर इला
बाजा,पेटी,तबला वाजाळत बरात ई ज्र्हाली हं
नवरीताल संग लिईकन जाणांर हं
नंदताल गहेरा बडा पूर इला
पपई वाहत चललयां हं..

४] * भरुया डब्बा जावू या नंदमझार
नंदमझार गहेरी घाण या बुडक्याताल,
साफ करवाल लावू..
भरु या डब्बा जावू या नंदमझार..
नंदमझार गहेरी घाण या वरात्यांताल साफ करवाल लावू
भरु या डब्बा जावू या नंदमझार..

५] * सिकेल पो-या लय दिखत्वो गुंडा ।
हामची नवरीची बा कडून मांगत्वो हुंडा
बसवाल मांगं पाट,भाकर खावाल मांगं ताट
सिकेल पो-या लय दिखत्वो गुंडा.. ।। घृ ं।।
वरुन मांगं तो टिलचा गिलास व माय
*बा न.पलंग देला, गादीभी देली
व-हून मांगं तो प्रेमाची गाणं.. ।। २ ।।

६] * रतन सरकी जतन केली
चिडी सरकी उडी गेली
ज्याची होती त्यानं नेली



आपुली माया वाया गेली
रतन सरकी जतन केली..
बापू देखत व्होता बारातूंन
ब देखत व्होती खिडकीतूंन
ज्याची होती त्यानं नेली
आपुली माया वाया गेली
रतन सरकी जतन केली
चिडी सरकी उडी गेली..
भाऊ देखतो बारातून
बहिण देखंत खिडकीतूंन
ज्याची व्होती त्यानं नेली
आपुली माया वाया गेली
रतन सरकी जतन केली
चिडी सरकी उडी गेली..

अशाप्रकारे वरील विवाह गीतांमधून नववधूच्या व तिच्या आई-वडीलाच्या मनातील घालमेलीचे , भावनाप्रधानयुक्त मनस्थितीचे चित्रण केलेले आहे. तसेच या विवाह गीतामध्ये नवरदेव-नवरीच्या मंडळीची युवक - युवती हे थटटामस्करी देखी करतात . एकीकडे आंनदोत्सव व नववधूला बिदागिरीचा सोहळा पार पाडला जातो. नववधूचा मैत्रिणी ,आई-वडील, भाऊ,बहिण यांचे भावनिक बंध या वेळी सुटतो व एक अतिशय भावनिक वातावरण निर्मिती झाली असते. सदर प्रसंगी ही विवाहगीते प्रामुख्याने गायली जातात.

७] * आखाजीचा बांधला वं झुला जीजाबाई वं
आखाजी, दिवाई सहा महिनं वं जीजाबाई
आखाजीचा बांधला व झुला जीजाबाई वं..
मामाची गावं जावू, शिखरण-साजोरी खावू वं जीजाबाई
खेतात जंगलात पाखरांवाणी उडू वं जीजाबाई

आखाजीचा बांधला व झुला जीजाबाई
आखाजी, दिवाई सहा महिनं वं जीजाबाई..

८] * माल अळळयाची बळळया
देली व्होती माय..
मालताल साडी बी नेसता येत नाय व्होती वं माय
माल गहू बी पेरता येत नाय व्होती वं माय
माही सासू बी जणू मायी * ब * सरकी माय
माया सासरा बी जणू माहया बापूज वं माय
माल गहेरी मया लावत व्होता वं माय
माल अळळयाची बळळया देली व्होती माय..

९] आयीक बाई बापू नं नादील
नागर घटयाकन शादी माई लगावली
खेतात तो जातो नागरीकन वखरीकन त्वो येतो
पेरवाची परख मालताल करवाल लावतो
आयीक बाई बापू नं नादील..

१०] मन का मोत्यांनं चुबल वं माय
वर माय माटीची गागर वं माय
न तटी माय पाय गया पीसला वं माय
न घरं माय सासूना झुलाल वं माय
न घरं ना घरे ना घुमाने वो माय

मालताल मन लगावं वो लगावं माहेर ना
वाटे वो वाटे वं माय..

११] जंगलमझारील टिटोरी टिव-टिव कर
जंगल बयला चार कुडी खावू



जंगलमझारील टिटोरी टिव टिव कर
जंगल बयला खोपा कुधी करु
जंगलमझारील टिटोरी टिव टिव कर..
खोपाज बई गेला तवां आंडया कुधी धरू
जंगलमझारील टिटोरी टिव टिव कर..
समंदर अटटाला पानी कुधी पीवू
खोपाज बयला बच्च्या कुधी कहाळू
जंगलमझारील टिटोरी टिव टिव कर..

१२] अरं माला जमीन खाली वं
लगाई दे फुलांची डाली
देला पैका उडावाल
देली सायकल चलावाल
अरं माला जमीन खाली वं
लगली वं ठोकर पडली मोटर

उचलता काय व्होता व्होता नादान
अरं माली जमीन खाली ..

**अशात-हेने विविध** लोकगीतामधून आदिवासी तडवी जमातीच्या अंतरमनातील विविध छटांवर प्रकाश पडतो हे लोकगीते तडवीचे जीवनसरणीचे एक अविभाज्य घटक तर आहेतच किंबहुना ती तडवीचे सांस्कृतिक जीवनाचे प्रतीके देखील आहेत. हा दस्ताऐवज जपला गेला पाहिजे. संकलनाबरोबरचा तो लिपीबध्द मोठया प्रमाणात झाला पाहिजे.

आदिवासी तडवी समाजाचा इतिहास बघितला तर औरंगजेबाच्या काळापासून ते ब-हाणपूरच्या फारुकी राजाच्या काळापावेतो तडवी समाजामध्ये तमाशा या लोककलेला एक वेगळे अधिष्ठान व स्थान होते. आदिवासी तडवी समाजात १५० ते २०० वर्षापुर्वीची परंपरा तमाशा या लोककलेला आहे.श्रीमती वजराबाई

तडवी हिचे पतीने लोणी पंचककर ता.चोपंडा जि.जळगांव यांनी आपलया बायकोच्या नावाने *वजराबाईचा तमाशाचा फड * या नावाचा एक तमाशा मंडळ तयार केला होता. खानदेशात स्त्री पुरुषाचा समावेष असलेला हा एकमेव तमाशा अत्यंत लोकप्रिय होता. त्याचबरोबर उस्मानबुवा तडवी कुसूंबेकर ता.रावेर जि.जळगांव तसेच भोकरीकर , यावलकर , जि.जळगांव यांचाही एक एक तमाशाचा मंडळ हा १५० ते २०० वर्षापूर्वी कार्यरत होता. ग्रामीण जनता व आदिवासी मोठया आवडीने सदरचे तमासे बघत असत . तमाशा ही लोककला जिवंत राहिली पाहिजे. ही लोककला महाराष्ट्रीयन ग्रामीण समाजाचा सांस्कृतिक आरसा आहे. तो एक मौलिक दस्ताऐवज आहे या लोककलेचे जतन संवर्धन व प्रचार प्रसार होणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण जीवनाचा व समाजजीवना शोध संशोधक ज्या ज्या वेळी घेतील त्या त्या वेळी त्याना या लोककलेचा अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. हेही तितकेच निर्विवाद खरे आहे. या व अशा अनेक वरील मौलिक गोष्ठी हया तडवी जमातीला एक महामानवाची जमात म्हणून अभ्यासकांना शोध घेणेस प्रेरणा देतात यात तिळमात्र शंका नाही असे मला वाटते.अशा या निरागस व गोड माणसांचा जगाने व भारताने स्विकार करावा ही माफक अपेक्षा सदरहू शोध प्रबंधा मार्फतीने व्यक्त करित आहे.



## संदर्भसूची

१.जळगांव जिल्हा गॅझेटीअर
२.भारतीय आदिवासी - डॉ.गुरुनाथ नाडगोंडे
३.गुप्त भाषा आणि सांकेतिक भाषा - डॉ.प्रभाकर मांडे
४.सातपुडयातील भिल्ल - डॉ.गोविंद गारे
५.खान्देशचा सांस्कृतिक इतिहास - श्री.संजय झेंडे
६.महाराष्ट् शब्दकोश - श्री.व्यं.केतकर
७.जत्रा - अजीज रशिद तडवी
८.अंधारातून उजीळाकडं - अजीज रशिद तडवी
९.आदिवासी तडवीबोलीभाषेतील शब्दसंग्रहकोश तडवी-मराठी-तडवी -अजीज रशिद तडवी
१०. महाराष्ट्ातील आदिवासी - सुरेशचंद्र वारघडे
११.भारतीय संस्कृतीकोष -संपा.पं.लक्ष्मणशास्त्री जोशी खं.६ पृ.५२९
१२.भारत के आदिवासी - प्रकाशचंद्र मेहता, पृ.५५
१३.खान्देशातील अज्ञात आदिवासी वीर पुरुष - सी.सी.राठवा
१४. आदिवासी साहित्य एवं सांस्कृतिक परिषद, नंदूरबार पृ.२२,२४
१५.एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफी - डॉ.अलीम वकील